सोलापूर तरुण भारत
आसमंत



# ज्याचा त्याचा कुंभ आणि दंभ!

विशेष

**राहुल बोरगांवकर**

कुंभमेळ्याला जाणाऱ्या श्रद्धाळूंची वाहतुककोंडीबाबत काही तक्रारच नाहीच. सर्व भेदाभेद विसरून कोट्यवधी हिंदू एकत्र येऊ शकतात, ही गोष्टच विरोधकांच्या पचनी पडत नाही आहे. त्यातून एका योगी साधूने, इतक्या भव्य प्रमाणात एका हिंदू सणाचे भव्य आणि यशस्वी आयोजन केल्यानेही विरोधकांची झोप उडाली आहे. प्रयागराजमध्ये भरलेल्या पूर्णकुंभाची भव्य सांगता महाशिवरात्रीला झाली. तब्बल १४४ वर्षांनंतर भरलेल्या या महाकुंभात, ६६ कोटींपेक्षा अधिक लोकांनी श्रद्धापूर्वक स्नान केल्याचे मानले जाते. इतक्या भव्य प्रमाणावर जगात कोठेच इतकी माणसे एकत्र जमलेली दिसत नाहीत. त्यातही मानसिक आणि आध्यात्मिक समाधानाखेरीज दुसरे काहीच मिळत नसतानाही, अशा मेळाव्यात इतक्या प्रचंड प्रमाणावर सामान्य आणि गरीब-श्रीमंत लोकांनी सहभागी होणे, ही मन थक्क करून सोडणारी घटना आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर जमलेल्या गर्दीचे सुव्यवस्थित नियोजन करणे ही सुद्धा तितकीच मोठी कामगिरी असून, त्याबाबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि त्यांच्या प्रशासनाचे, ढोल-ताशे वाजवून अभिनंदन केले पाहिजे.

योगी आदित्यनाथ यांनी या कुंभमेळ्यावरील टीकेला परखड आणि चपखल उत्तर देताना जे शब्द मांडले, ते लोकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील. विधानसभेत त्यांनी या कुंभमेळ्याच्या यशावर बोलताना सांगितले, गिधाडांना मांस मिळाले, डुकरांना चिखल मिळाला, संवेदनशील लोकांना नात्यांचे सुंदर चित्र मिळाले, श्रद्धाळूंना पुण्य मिळाले, व्यापाऱ्यांना व्यवसाय मिळाला, सज्जनांना सज्जनता मिळाली, भक्तांना परमेश्वर प्राप्ती झाली. थोडक्यात, जी व्यक्ती ज्या भावनेने या कुंभमेळ्याकडे पाहात होती, तिला तिच्या भावनेनुसार फळ मिळाले, असा त्यांच्या बोलण्याचा उद्देश होता. सनातनींच्या प्रत्येक गोष्टीवर टीका करणे, इतकीच आयुष्याची इतिकर्तव्यता मानणार्या विरोधकांना यापेक्षा अधिक मार्मिक उत्तर दुसरे नसेल. 'ज्यां की रही भावना जैसी, प्रभू मूरत देखी तिन तैसी', असे तुलसीदासजींनीच म्हणून ठेवले आहे. तीच भावना योगीजींनी व्यक्त केली.

प्रयागराज हे प्राचीन आणि पवित्र तीर्थस्थळ असले, तरी ते एक छोटे शहर आहे. जेमतेम ४०-४५ लाख लोकवस्ती असलेल्या या शहरात भारतातूनच नव्हे, तर परदेशातूनही आलेल्या कोट्यवधी लोकांना सर्वकाळ राहणे, खाणे-पिणे आणि वीज-प्रवासाची सोय या छोट्याशा शहरात उपलब्ध होती. ६६ कोटी लोक म्हणजे निम्मा भारत, या दीड महिन्यात प्रयागराजमध्ये उपस्थित होता. त्यामुळे प्रवासाची काहीशी गैरसोय झाली, यात शंका नाही. टीका करण्यासाठी अक्कल लागत नाही. पण, इतक्या मोठ्या प्रमाणावरील गर्दीचे नियोजन करण्यासाठी, प्रशासकीय कौशल्याची गरज असते. त्याचा थक्क करणारा अनुभव कुंभमेळ्यात सहभागी झालेल्यांना जरूर आला. या काळात येथे आलेल्या बिगर हिंदूंना, कोणीही हीन आणि भेदभावाची वागणूक दिली नाही. त्यांनाही या पवित्र जळात डुबकी मारण्याची मुभा होती. त्यांच्या खाण्यात कोणी थुंकले नाही की, आपला धर्म सोडण्याचा दबाव त्यांच्यावर टाकण्यात आला नाही. त्यांच्या धर्माचा अपमान झाला नाही की, बिगर-हिंदूंना नष्ट करण्याचे आवाहन करण्यात आले नाही. या मेळाव्यानंतर कोठेही दंगली उसळल्या नाहीत की, मशिदी आणि चर्चेसवर दगडफेक करण्यात आली नाही. तेथे ब्राह्मण, राजपूत, क्षत्रिय, वैश्य, शूद्र किंवा विविध जातींसाठी स्वतंत्र घाट नव्हते. ज्या स्थळावर जौनपूरच्या एखाद्या गरीब परिवाराने डुबकी मारली असेल, तेथेच अंबानी परिवारानेही स्नान केले. इतकेच नव्हे, तर श्रद्धाळूंच्या या अफाट जनसागराची गैरसोय होऊ नये, म्हणून साधू-महंतांनी आपल्या काही धार्मिक परंपरांनाही मुरड घातली. शिवरात्रीपूर्वी प्रयागराजमध्ये साधूंकडून नेहमी मोठी मिरवणूक काढली जाते, ती यावेळी काढण्यात आली नाही. याआधीही मौनी अमावस्येला, साधू आणि आखाड्यांच्या मिरवणुका निघाल्या नाहीत. यामुळे सनातन धर्म धोक्यात आला किंवा बुडाला, असे कोणालाही वाटले नाही. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हाच कुंभमेळ्याचा मूलमंत्र होता.

सनातनींकडून सर्व धर्माच्या लोकांचे येथे स्वागतच केले जात होते. कुंभमेळ्यावर टीका करणारे नेतेही हळूच तेथे जाऊन, संगमात डुबकी मारून आपल्या पापांचे प्रायश्चित्त करताना दिसत होते. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी कुंभमेळ्यावर आणि योगी आदित्यनाथ यांच्यावर बेछूट टीका केली आहे. तरीही तेथे संगमात जाऊन पापक्षालन करण्याची संधी त्यांनी सोडली नाही. तीच गोष्ट अनेक काँग्रेस नेत्यांची, अर्थात याला अपवाद एका परिवाराचा. निवडणुकीच्या काळात मंदिरांच्या पायर्या चढणारे, कपाळावर गंधाचे पट्टे ओढणारे आणि स्वत:ला जनेऊधारी हिंदू म्हणविणार्या या परिवाराचा एकही सदस्य, या मेळ्याकडे फिरकला नाही. यावरून त्यांचे हिंदुत्त्व किती बेगडी आणि सोयीस्कर आहे, तेच सिद्ध झाले. भाजप विरोधकांनी कुंभमेळ्याला न जाताच, तेथे किती गैरव्यवस्था आहे, प्रदूषण आहे, घाण आहे वगैरे बडबड केली. पण, कोट्यवधी श्रद्धाळूंनी ती ऐकूनच घेतली नाही. गंगेत स्नान केल्याने गरिबी दूर होते का? असा प्रश्न विचारणार्या मल्लिकार्जुन खर्गे यांना, त्याचे उत्तर जनतेनेच दिले आहे. या कुंभमेळ्याला आलेल्या श्रद्धाळूंनी उत्तर प्रदेशात, साडेतीन लाख कोटी रुपयांची उलाढाल केली आहे. कुंभमेळ्यामुळे हजारो गरिबांना विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध झाले. गरिबच नव्हे, तर व्यावसायिक विमान कंपन्यांनीही या कुंभकाळात नफेखोरीची डुबकी मारली. या कुंभमेळ्याची काल जरी सांगता झाली असली, तरी तेथे जाणार्यांची गर्दी इतक्यातच ओसरणारी नाही, हे स्पष्टच दिसत आहे. याशिवाय या गर्दीचा रोख प्रयागराजनंतर काशी, अयोध्येकडेही वळला आहे. त्यामुळे येते काही आठवडे, तेथील स्थानिक अर्थव्यवस्थेलाही जबरदस्त चालना मिळत राहणार आहे. (पान ४ वर)

# स्थलांतराचा 'सोनेरी' मार्ग

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'इबी-५' व्हिसा कार्यक्रम संपुष्टात आणण्याचा प्रस्ताव मांडला असून, त्याऐवजी नवीन 'गोल्ड कार्ड' व्हिसा योजना सादर केली आहे. या नव्या योजनेअंतर्गत, पाच दशलक्ष डॉलर्स अर्थात सुमारे ४३.५ कोटी रुपये गुंतवणूक करणार्या परदेशी नागरिकांना, अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी दिली जाणार आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयाने अमेरिकेच्या स्थलांतर धोरणात मोठा बदल घडणार आहे.**




लक्ष्यवेध

**कौस्तुभ वीरकर**

'इबी-५' कार्यक्रमाच्या माध्यमातून अल्प आणि मध्यम गुंतवणूकदारांना अमेरिकेत स्थायिक होण्याची संधी मिळत असे. मात्र, नव्या प्रस्तावामुळे केवळ धनाढ्य गुंतवणूकदारच ही संधी मिळवू शकणार आहेत. त्यामुळे हा निर्णय अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी संजीवनी ठरेल की, सामाजिक विषमतेत अधिक वाढ करेल? हा मोठाच प्रश्न निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या मते, हा बदल अमेरिकेच्या आर्थिक विकासासाठी एक सुवर्णसंधी ठरू शकतो. पाच दशलक्ष डॉलर्स गुंतवणुकीची अट ठेवल्याने अत्यंत संपन्न, धनाढ्य गुंतवणूकदारांनाच अमेरिकेत आकर्षित करता येईल.

परिणामी, सरकारला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळू शकतो, जो राष्ट्रीय तूट कमी करण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, मोठ्या प्रमाणावर भांडवल आल्यास अमेरिकेतील स्टार्टअप्स, तंत्रज्ञान कंपन्या आणि रिअल इस्टेट क्षेत्राला चालना मिळू शकते. स्थानिक रोजगार निर्मितीही या योजनेचा महत्त्वाचा घटक ठरू शकतो. मात्र, या प्रस्तावाचा दुसरा पैलू पाहता, ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णय अमेरिकेच्या स्थलांतर धोरणातील मूलभूत गृहितकाला धक्का लावू शकतो. 'इबी-५' कार्यक्रमामुळे विविध आर्थिक स्तरांतील गुंतवणूकदारांना अमेरिकेत संधी मिळत होती, तर नव्या 'गोल्ड कार्ड' योजनेमुळे, केवळ धनाढ्य गुंतवणूकदारांसाठीच दरवाजे खुले राहणार आहेत. परिणामी, अमेरिकेतील सामाजिक आणि आर्थिक विषमता आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, या योजनेमध्ये स्थानिक रोजगार निर्मितीची स्पष्ट अट नसल्यामुळे, प्रत्यक्षात हा कार्यक्रम अमेरिकन नागरिकांसाठी कसा फायदेशीर ठरेल? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

अमेरिकेच्या स्थलांतर धोरणाचा एक प्रमुख उद्देश म्हणजे, स्थानिक उद्योगांना कुशल आणि उच्च-शिक्षित परदेशी नागरिकांद्वारे चालना देणे. मात्र, नव्या प्रस्तावानुसार, केवळ धनाढ्य व्यक्तींनाच प्राधान्य मिळणार असल्याने, अमेरिकेच्या उद्योगांना याचा प्रत्यक्ष लाभ किती मिळेल? हे अद्यापही स्पष्ट नाही. राजकीय दृष्टिकोनातून ट्रम्प यांच्या या प्रस्तावाला डेमोक्रॅटिक पक्षाकडून प्रचंड विरोध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रस्ताव काँग्रेसमध्ये संमती मिळवेल का? हेदेखील महत्त्वाचे आहे. जर ट्रम्प प्रशासनाने हा निर्णय कार्यकारी आदेशाद्वारे लागू करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला न्यायालयात आव्हान दिले जाण्याची शक्यताही आहेच. अमेरिकेच्या स्थलांतर धोरणातील हा बदल, विविध देशांतील संभाव्य गुंतवणूकदारांवर मोठा प्रभाव टाकू शकतो. या नव्या प्रस्तावामुळे, जागतिक लघु आणि मध्यम गुंतवणूकदारांकडून नवे पर्यायी देश शोधले जाऊ शकतात. (पान ४ वर)




# 'युएसएआयडी'चा नॅरेटिव्ह

**भारताच्या निवडणुकांमध्ये सातत्याने परकीय हस्तक्षेप वाढत असल्याचा आरोप होत असतो. विरोधी पक्षाचे अनेक मुद्दे हे बाहेरून आलेले असल्याचे अनेकांचे निरीक्षण आहे. देशातील निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याला मिळणारी रसद अमेरिकेच्या 'युएसएड' कडून मिळत असल्याचे अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने जाहीर केल्याने, अनेकांचे बुरखे फाटले आहेत...**

वेधक

**पार्थ कपोले**

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून जबाबदारी पार पाडणारे राजीव कुमार नुकतेच सेवानिवृत्त झाले. निरोप समारंभात त्यांनी आपल्या सहकार्यांना संबोधित केले. यावेळी त्यांनी एक अतिशय महत्त्वाची टिप्पणी केली. ते म्हणाले, देशात सध्या एक विशिष्ट पॅटर्न दिसून आला आहे.

मतदानाच्या किंवा मतमोजणीच्या महत्त्वाच्या वेळी, प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियावर खोटे आरोप आणि अफवांची लाट पसरू लागते. यामुळे लोकांची दिशाभूल होते आणि गोंधळ निर्माण होतो. तथ्ये विकृत करण्यासाठी, जाणीवपूर्वक कथा रचल्या जातात. एक संस्था म्हणून, निवडणूक निकाल स्वीकारण्यास तयार नसलेल्या लोकांकडून, अनेकदा आयोगावर चुकीच्या कृत्यांसाठी दोषारोप केले जातात. निवडणूक लढतींनंतर निवडणूक अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याचा वाढता कल, हा गंभीर चिंतेचा विषय आहे. त्याकडे सोयीस्कर बळीचा बकरा म्हणून पाहिले जाते. सर्व उमेदवार आणि पक्ष, प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर पूर्ण पारदर्शकतेने सहभागी आहेत. प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यात कोणताही आक्षेप न घेता किंवा अपील दाखल न करता सहभागी झाल्यानंतर, नंतर शंका निर्माण करण्याचा प्रयत्न करणे अवांछनीय आहे. संवाद हा नेहमीच चांगला मार्ग असतो आणि आयोग समजूतदारपणा आणि संयमाने प्रतिसाद देतो, परंतु ही एक धोकादायक प्रवृत्ती आहे आणि ती ताबडतोब त्यागली पाहिजे. तथापि, निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रतिक्रिया न देता, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आयोग संयमाचे धोरण अवलंबतो.

माजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या भाषणापूर्वी, म्हणजेच दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वी लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी, उबाठा खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी, नवी दिल्लीतल्या 'कॉन्स्टिट्यूशन क्लब'मध्ये पत्रकार परिषद घेतली होती. (पान ४ वर)

# अमेरिकेचा आयात शस्त्राचा (टेरिफ) वापर : भारताकरिता आर्थिक संधी

राष्ट्ररक्षा


ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिकेच्या दौऱ्यामध्ये लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे उपलब्ध करणे, २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर्स व्यापार वृद्धी करणे, तहव्वूर राणा यांचे भारताकडे प्रत्यार्पण, प्रगत न्यूक्लियर तंत्रज्ञानासाठी कायद्यात बदल, ऊर्जा क्षेत्राच्या करारानुसार भारताला तेल आणि वायू पुरवठा, इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक ऑर्डर पुन्हा एकदा सुरू करणे, सुदृढ पुरवठा साखळी निर्माण करणे आणि मागा+मिगा= मेगा अशा अनेक करारांवर सही करण्यात आली. थोडक्यात डोनाल्ड ट्रम्प यांचे लक्ष टेरिफ किंवा आयात कर युद्धावरून काढून भारताच्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यात आपल्याला यश मिळाले. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांचे टेरिफ युद्ध संपणार नाही आणि यापुढे चालूच राहील. अमेरिकेला आयात कर किंवा टेरिफचा वापर करून दोन मोठ्या बाबी साध्य करायच्या आहेत. एक त्यांच्या आणि इतर राष्ट्रांमध्ये असलेल्या व्यापाराची तूट कमी करणे आणि दुसरे अमेरिकेमध्ये होणारी बेकायदेशीर घुसखोरी थांबविणे. या दोन्हीमध्ये अमेरिकेला गेल्या काही दिवसातच बऱ्यापैकी यश मिळालेले आहे.

ट्रम्प यांनी चीन तसेच मेक्सिको आणि कॅनडा या दोन देशांवर भरमसाट आयात कर लावण्याची घोषणा केली. आदेशानुसार चिनी मालावर १० टक्के आणि मेक्सिको-कॅनडातील आयातीवर २५ टक्के कर लावण्यात येणार आहे. कॅनडातून येणारे तेल, नैसर्गिक वायू आणि विजेचा अपवाद करत त्यावर १० टक्के आयातकर असेल. ट्रम्प आयात कर किंवा टेरिफ युद्ध सुरू करून राष्ट्रीय हितांचे रक्षण करीत आहे.

**कॅनडा मेक्सिकोला एका महिन्याचा दिलासा**

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्याशी चर्चा केल्यानंतर ट्रम्प यांनी कॅनेडियन वस्तूंवरील कर ३० दिवसांसाठी स्थगित केला. ट्रुडो यांनी सीमा सुरक्षेवर अतिरिक्त सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कॅनडा १.३ अब्ज डॉलर्सची सीमा योजना राबवत आहे. नवीन हेलिकॉप्टर, तंत्रज्ञान आणि कर्मचाऱ्यांसह सीमा मजबूत करणे आणि फेन्टानीलचा प्रवाह थांबविण्यासाठी संसाधने वाढविणे. १० हजार फ्रंटलाईन कर्मचारी सीमेचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहेत. मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शीनबॉम यांनी घोषणा केली की, अमेरिकेच्या अध्यक्षांनी मेक्सिकन आयातीवरील २५ टक्के कर एका महिन्यासाठी थांबविण्यास सहमती दर्शविली आहे. कारण देशाने ट्रम्प यांच्या इमिग्रेशन आणि ड्रग्ज तस्करीवर कारवाई करण्याच्या मागणीला प्रतिसाद म्हणून सीमा अंमलबजावणी प्रयत्नांना बळकटी देण्याचे आश्वासन दिले आहे. थोडक्यात मेक्सिको आणि कॅनडा या दोन देशांवर भरमसाट आयात कर लावण्याची धमकी देऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी



मेक्सिको आणि कॅनडाला वठणीवर आणले आणि दोन्ही देशांनी त्यांच्या सीमेमधून अमेरिकेमध्ये होणारी घुसखोरी पूर्णपणे थांबविण्याकरिता मोठ्या प्रमाणात सैन्याची तैनाती केली. म्हणजेच डोनाल्ड ट्रम्प यांची चाल अत्यंत यशस्वी झाली आहे.

**अमेरिका-चीन भाई-भाई?**

सध्या तरी ट्रम्पना चीनविरोधात व्यापार युद्ध करता तयार नाही. २०२३ मध्ये अमेरिका व चीन यांचा व्यापार हा ५७५ बिलियन डॉलर्स एवढा वाढला. त्यात अमेरिकेने १४७ बिलियन डॉलर्स चीनला निर्यात केली; तर चीनकडून ४२७ बिलियन डॉलर्स एवढ्या वस्तू आयात केल्या. व्यापारातील तूट भरून काढणे हे अमेरिकेचे नजीकच्या काळातील सर्वात मोठे उद्दिष्ट राहील. अपारंपरिक ऊर्जा स्रोत जसे सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक ऊर्जा यावर चीनचे वर्चस्व आहे. अमेरिकेच्या प्रचंड दबावानंतरही युरोपातील देश चीनशी वाहन उद्योगसंदर्भात करार करत आहेत.

अमेरिकेला देशांतर्गत बाजारपेठसुद्धा चीनच्या इलेक्ट्रिकल मोटार उद्योगापासून कशी दूर ठेवावी याची चिंता आहे. आतापर्यंत या क्षेत्रात अमेरिकेच्या एनव्हिडीया या कंपनीचा वरचष्मा होता. परंतु चीनच्या डीपसीकमुळे हे तंत्रज्ञान विकसित होत आहे. यामुळे चॅट जीपीटी, ओपन एआय यांची मक्तेदारी मोडून डीपसीक ॲपल कंपनीच्या ॲप स्टोअरमध्ये प्रथम क्रमांक मिळविण्यात यशस्वी ठरला आहे. चीनला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील टूल्स आपल्या नागरिकांपासून दूर ठेवायचे आहेत. आपल्या नागरिकांची वैयक्तिक माहिती तसेच राष्ट्र म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली माहिती राजकीयदृष्ट्या अमेरिकेच्या कंपन्यांना देणे चीनला परवडणार नाही. कारण चीन उघडा पडेल.

सध्या चीनच्या बाबतीत अमेरिकेने मवाळ धोरण स्वीकारले आहे. कारण ते चीनबरोबर व्यापार युद्धाकरिता तयार नसावेत. पण हे युद्ध होईल याविषयी कोणाच्याही मनात शंका नको. कारण चीन आणि अमेरिकेमधील व्यापाराची तूट प्रचंड आहे आणि ती कमी करणे ट्रम्प यांच्याकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताने या संधीचा फायदा घ्यावा आणि ज्या वस्तू चीन आज अमेरिकेला आयात करत आहे, त्या भारतात मेक इन इंडिया खाली तयार करून चीनची जागा घ्यावी. अर्थात हे आव्हान पेलण्याकरिता प्रचंड प्रयत्न करावे लागतील. रशियाने युरोपीय युनियन तसेच अमेरिकेसोबत जुळवून न घेता चीनबरोबर मैत्री करताना दुय्यम भूमिका घेणे पसंत केले आहे. भारत या दोन्ही महासत्तांच्या आपसातील तणावाचा फायदा घेत आपल्याला व्यापारविषयक सवलती कशा प्रकारे प्राप्त करून घेता येतील यासाठी प्रयत्नशील आहे. ट्रम्प यांनी 'ब्रिक्स' देशांवर वाढीव करबोजा लादण्याचा इशारा दिला असला, तरी त्यांमधून भारताला वगळण्यात आले आहे. यामागे कारणे आहे. भारताबरोबर असलेली अमेरिकेची व्यापारी तूट तीन देशांच्या तुलनेत कितीतरी कमी आहे. चीन, मेक्सिको आणि कॅनडाची व्यापारी तूट अनुक्रमे ३० टक्के, १९ टक्के आणि १४.५ टक्के असताना भारताबरोबरची अमेरिकेची व्यापारी तूट मात्र केवळ ३.२ टक्के आहे.

भारत आपलं आयात कर धोरण बदलत आहे भारताचं बजेट सादर झालं. त्यात मोटरसायकलवरचा आयात कर कमी करण्यात आला. जड वजनाच्या १६०० सीसीपेक्षा कमी इंजिन क्षमता असणाऱ्या मोटरसायकलवरील कर ५० टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर आणला गेला. १६०० सीसीपेक्षा जास्त क्षमतेच्या बाईकसाठी आणखी जास्त कपात करण्यात आली. या मोटरसायकलमागचा आयात कर ५० टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. या निर्णयाचा फायदा हार्ले डेव्हिडसन या अमेरिकन मोटरसायकलला होणार आहे. या मोटरसायकलची ३० लाख डॉलर किमतीची आयात मागच्या वर्षी भारताने केली होती. २०२३ मध्ये दोन्ही देशांमध्ये १९ हजार कोटी डॉलर्सपेक्षाही जास्त किमतीचा व्यापार झाला. भारताकडून अमेरिकेत निर्यात केल्या जाणाऱ्या विक्री मालात २०१८ पासून १२.३ हजार कोटी डॉलर्सपर्यंत म्हणजे ४० टक्क्यांनी वाढ झाली तर निर्यात केल्या जाणाऱ्या सेवा २२ टक्के वाढीने ६.६ हजार कोटी डॉलर्सपर्यंत जाऊन पोहोचल्या आहेत. याउलट अमेरिकेकडून भारतात एकूण ७ हजार कोटी डॉलर्सची निर्यात झाली आहे. मोटरसायकल सोडता भारतानं उपग्रह बनवण्याच्या उपकरणावरचा आयात करही अगदी शून्यावर आणला आहे. भारताने अमेरिकेच्या इतरही उत्पादनांवरचा आयात कर लक्षणीयरीत्या कमी केला आहे. भारत आपलं आयात कर धोरण बदलून संकटाचे संधीमध्ये रूपांतर करत आहे. यामुळे अमेरिकेची वेगवेगळ्या क्षेत्रातली निर्यात येत्या काळात वाढू शकते, २०२३ मध्ये भारताने बदाम, सफरचंद, हरभरा, डाळी आणि आक्रोड अशा अमेरिकेतील काही कृषी उत्पादनावरील कर कमी केला. बेकायदेशीरपणे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना परत देशात घेण्याची तयारी भारताने दाखवल्यानेही भारताकडून एक सकारात्मक संदेश गेला आहे.

**मोदी-ट्रम्प मैत्रीचा भारताला फायदा**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या वागणुकीमुळे जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रचंड उलथापालथ होत आहे आणि जगातील सगळी स्टॉक मार्केट्स अतिशय खालच्या लेव्हलला येऊन पोचली आहे. मात्र, भारताने अशा प्रकारच्या उलथापालथीला तोंड देण्याकरिता तयारी केली आहे. १ फेब्रुवारीला जाहीर झालेल्या बजेटमध्ये अर्थमंत्र्यांनी इन्कम टॅक्सची लिमिट वाढवून जास्त पैसा करदात्यांच्या हातात खर्चाकरिता ठेवला आहे. याशिवाय वेगवेगळ्या इम्पोर्ट ड्युटी पहिलेच कमी करून आपण अमेरिकेशी व्यापार करण्याकरिता तयार आहोत. आताच झालेल्या मोदी यांच्या भेटीमुळे भारत आणि अमेरिकेमध्ये अनेक व्यापार करार झाले आहेत. यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेला एक मोठा बूस्टर मिळेल आणि त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था पुन्हा वेगाने वाटचाल करू शकेल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

# अध्यात्म शास्त्रातील भक्तीचे उदारत्व

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

अध्यात्म शास्त्रातील भक्तीचे उदारत्व हे भक्तीच्या सर्व पैलूंचे दर्शन घडविणारे आहे. संतांनी जी परमेश्वरावरती निस्सीम भक्ती केली. नवभक्तीच्या वाटा उजळल्या त्या भक्तीचे उदारत्व संत साहित्यामध्ये मांडलेले आहे. भक्तीचे अनुसरण मानवी जीवनाच्या कल्याणासाठी एक सात्त्विक मार्ग आहे.

**अपिचेतसुदुराचारो भजते मामेनन्यभाक । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ७१ ।।** (गीता ९/३०) अतिशय दुराचरणी मनुष्यसुद्धा भक्तिमार्गात अनन्य भक्ती करून उद्धार पावू शकतो. संत ज्ञानेश्वर महाराज **यालागी दुष्कृती जही जाहला। तरि अनुतापतीर्थी न्हाला। न्हाऊनी मजआतु आला। सर्वभावे ७२ ।।** (ज्ञाने.- ९/४२०) जर एखाद्याने हातून झालेल्या दुराचारासाठी अत्यंत



पश्चातापयुक्त अंतःकरणाने तो मनुष्य भगवंताला अनन्यभावे शरण गेला, तर तो माझ्या साक्षात्काराप्रत पोहोचू शकतो, हे भक्तिमार्गाचे उदारत्व आहे. कोणत्याही जातीचा, पंथाचा असो; स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत असा भेदभाव भक्तिमार्गात नाही.

अद्वैत भक्तीचा आनंद अद्वैत भक्तीत देव व भक्तपणा असा भेद उरतच नाही. भक्त हाच देव होऊन देवाची भक्ती करू लागतो. सर्वत्र एकच परमेश्वर भरला आहे. आतही हरी व बाहेरही हरीच दिसू लागतो. या अवस्थेमुळे अवघी सृष्टीच आनंदाची वाटू लागते. कामक्रोधादी सर्व विकार भक्ताला सोडून जातात. स्वतःला ही आनंदाची स्थिती अनुभवावयाला येते. तेव्हा तुकोबा सांगतात **पिकलिया सेंदे कडूपण गेले । तैसे आम्हा केले पांडुरंगे ।।१।। काम क्रोध निमाले ठायीचि । सर्व आनंदाची सृष्टी झाली ।।धु।। आठव नाठव गेले भावाभाव । झाला स्वयंमेव पांडुरंग ।।२।। तुका म्हणे भाग्य या नावे म्हणीजे । संसारी जन्मौजे याचि लागी ।।३।।** अशी अवस्था प्राप्त झाल्यानंतर संत तुकोबांना जेथे दुःखाचा लवलेशही नसतो, अशा आनंदाच्या स्थितीचे वर्णन करतात. अद्वैत भक्तीचा आनंद संतांनी स्वतः लुटला व सर्वांनी या आनंदात सहभागी होऊन लुटण्यास ते सांगताततुका म्हणे खातों आनंदाचे लाडू। नका चरफडू घ्यारे तुम्ही।।

**भक्तिसाधनेचा कळसः** संत साक्षात्कार भक्तीच्या अनेक व्याख्या व भक्तिसाधनेच्या वेगळ्या प्रकारांचा परामर्श घेतला. भक्तीशिवाय साक्षात्काराची अनुभूती येऊ शकत नाही. भक्तिमार्ग हा सर्व स्तरातील लोकांसाठ ीसुलभ व सोपा असा मार्ग आहे. सर्व धर्माच्या संतांनी याच मार्गाची वाट धरलेली आहे. सर्वांसाठी याच मार्गाचे प्रतिपादन केलेले आहे. अद्वैत भक्तीमुळे जग हे जगरूपाने न दिसता ईश्वर रूपाने दिसू लागते. तोच आत्मसाक्षात्कार होय.

**रक्तश्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न। चिन्मय अंजन सुदले डोळा ।।१।। तेणे अंजनगुणे दिव्यदृष्टी झाली। कल्पना निमाली द्वैताद्वैत ।।धृ।। देशकाळवस्तूभेद मावळला। आत्मा निर्वाळला विश्वाकार।।२।। न झाला प्रपंच आहे परब्रह्म। अहंसोहं ब्रह्म आकळले ।।३।। तत्त्वमसी विद्या ब्रह्मानंदी सांग। तेचि झाला अंगे तुका आ ।।४।।**

भक्ती मार्गाच्या द्वारा अनेक संतांना साक्षात्कार झालेला आहे. त्यापैकी संत नामदेव, संत तुकाराम यांना भक्तिमार्गातून असा साक्षात्कार झाला होता.

**बीज भाजुनि केली लाही। आम्हा जन्ममरण नाही।।१।। आकारासी कैचा ठाव। देह प्रत्यक्ष झाला देव ।।ध्रु।। साखरेचा नोहे ऊस । आम्हा कैचा गर्भवास ।।२।। तुका म्हणे अवघा जोग । सर्वाघरी पांडुरंग ।।३।।** (तु. गा. ४२८३)

अंतिम अशा बोधप्रद अवस्थेवर संतमाहात्मे स्थिर होऊन जनकल्याणासाठी भक्तिमार्ग सर्वांना आचरून दाखवतात. जे ज्ञान आत्मस्वरूपाचे अज्ञान नाहीसे करते, ते ज्ञानही गिळून असणे. अशी जी साक्षात्काराची अवस्था ती भक्तीने निश्चित प्राप्त होत असते, असा भक्तिमार्गाचा लाभ आहे.

**तुका म्हणे आता । लाभ नाही यापरता।** (तु.गा.३०५८) या अवस्था प्राप्तीनंतर जीवनामध्ये दुसरा मोठा लाभ काय असू शकतो. संत तुकाराम म्हणतात तुम्ही जीवनामध्ये भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास तुम्हाला निश्चितपणे पांडुरंग (आत्म साक्षात्कार) भेटल्याशिवाय राहत नाही. हा मार्ग सर्वांना आचरण्यास सुलभ व सोपा आहे.

**भक्तिपथ बह सोपा । पुण्य नागवे या पापा ।।** (तु. गा. २२८९)

या मार्गाने कोणीही मार्गक्रमण करू शकतो, म्हणजेच या मार्गाचा अधिकार सर्वांना आहे.

**सकळासी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरिच्यानाम ।।** (तु. गा. २८६४) भक्तिमार्गात नामजपाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. नामजप म्हणजे ईश्वराच्या नामाची अक्षरे वारंवार उच्चारणे नव्हे, हा अक्षरांचा जप झाला. नामजप म्हणजे ईश्वराच्या नावाच्या अर्थाचे मनन करणे होय. हे अर्थाचे मनन व्हावयास पाहिजे. नुसता शब्दोच्चार करू नये त्यामुळेच भक्तिमार्गाचा आग्रह संत तुकारामांनी केला आहे. या मार्गाने सर्वांना साक्षात्कार साध्य करता येतो, असे ते आग्रहाने सांगतात.

**तुका म्हणे तुम्ही चलायाचि वाटे। भरवशाने भेटे पांडुरंग।।** प्रत्येक व्यक्तीला आत्मस्वरूपाचे होण्यासाठी भक्तिमार्ग हाच सोपा व सर्वांना सुलभ असा मार्ग होय. भक्तिमार्गाचे मनोभावे आचरण केल्यास साक्षात्कार प्राप्ती होते. साक्षात्कारामुळे आत्मानंद मिळतो. आत्मानंदातून चित्ताचा लय होतो व देहभावाचा विसर पडतो. देहभावाचा विसर म्हणजेच तो भक्तच मुळी देवरूप होऊन जातो. संत तुकारामांना देहभावाचा विसर पडल्यामुळेच ते देवरूप झाले. भक्तिमार्गामध्ये हातात कर्म, आचरणात धर्म, मुखात हरिनाम व अंतःकरणात भगवंताचे निष्काम प्रेम पाहिजे. ही शिकवण संत तुकारामांनी दिली आहे. भक्तिप्रेमासाठी अंतःकरणामध्ये भगवंताविषयी अपार श्रद्धाभाव आवश्यक आहे. भावाशिवाय भक्ती घडू शकत नाही. जसा ज्याचा भाव असेल तसाच त्याचा देव असतो. भगवंताच्या भक्तिप्रेमाने चित्तवृत्ती निर्मल होतात. चित्तवृत्ती निर्मल झाल्याने कल्पना लोप पावतात. कल्पना निमाल्या म्हणजे परब्रह्म स्वरूप प्रकट होते. भक्तिप्रेमाला संतांनी सर्वश्रेष्ठ मानले आहे. भक्तीपुढे त्यांना मोक्षही तुच्छ वाटतो. पराकोटीच्या भक्तीचा सिद्धपाक अंगी माल्यानंतर ते माहात्मे मरणापूर्वीच जीवनमुक्त होतात. भक्तीशिवाय मुक्ती मिळू शकत नाही. भक्तिप्रेमामुळे अंगी विरक्ती येते. विरक्तीने विषय निवृत्त होतात. विषयनिवृत्ती झाल्या म्हणजे आत्मज्ञान होते व त्यातूनच आत्मसाक्षात्कार प्राप्ती होत असते. संत भक्ती विचारामुळे समाजामध्ये वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून आजही साडेचारशे वर्षांनंतरही सदाचाराचे विचार सम ाजामध्ये पेरण्याचे काम सुरू आहे. आज सर्वत्र विषय स्वैराचाराची लाट आलेली असताना संत भक्तिमूल्य विचार समाजाला सदाचाराच्या भक्तिमार्गाला लावणारा आहे.

---

चित्रपट समिक्षा

आयुषी मोहगांवकर

फक्त एवढेच मर्यादित 'टायटल' असलेला, Mrr. अमुक-तमुक असे पुढे कुठलेही विशिष्ट नांव नसलेला चित्रपट (?) ZEE5 या OTT वर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. या चित्रपटावर स्त्रियांना जास्तीत जास्त शब्दांत व्यक्त होणं जमणार नसल्यास, किमान एका ओळीने तरी व्यक्त व्हायला हवं, स्त्रियांनी असं न केल्यास त्यांचा हा गुन्हा अक्षम्य म्हणून गणला जाईल. असो, उपरोक्त गमतीचा भाग सोडून, चित्रपटा संदर्भात मला जे काय भावलं किंवा जे काय पटण्यासारखं नाही वाटलं त्या बाबत असलेला हा लेखनप्रपंच!

Mrr. या चित्रपटाचा विषय वास्तववादी आहे का?- हो ठीक, पण मग, हा चित्रपट ज्या प्रकारे सादर व्हावयास हवा होता, त्या प्रकारे सादर केला गेला का? तर, याचं उत्तर अजिबात नाही हे आहे. कसं असतं, चित्रपटा संदर्भात बोलायचे झाले तर, एखादा विषय ज्यावेळी खूप सोपा आहे आणि त्यामुळे त्यावर विशेष मेहनत न घेता विषयाच्या बारीक- सारीक पदरांचा विचार न करता तो सहज सादर करू शकू, असं ज्यावेळी पटकथा लेखकाला आणि दिग्दर्शकाला वाटतं, त्यावेळी चित्रपट निष्प्राण होण्याचं प्रमाण जास्त असतं.




Mrr. या चित्रपटाबाबतही हेच झालंय, प्रेक्षकांना गृहीत धरून विषयाची मांडणी केली गेली आहे. मला वाटतं Mrr.चित्रपटाची मांडणी डॉक्युमेंट्री च्या अंगाने झुकणारी आहे. Mrr.मधला विषय ज्या पद्धतीने मांडलाय, तो डॉक्युमेंट्री म्हणून, त्या विषयाला डॉक्युमेंट्रीची ट्रीटमेंट देऊन मांडला असता तर, काळाच्या परिमाणांच्या संदर्भात उदाहरणे देऊन अतिशय उत्कृष्टपणे त्या विषयाची मांडणी करता आली असती. पण, लेखक आणि दिग्दर्शक दोहोंनाही चित्रपट असे लेबल लावण्याचा मोह आवरला नाही. विषयाचा सर्व बाजूने विचार करून, Period Movie केली असती तर, ती कालातीत वास्तव म्हणून 'ऑस्कर' वारी करताही जाऊ शकली असती. उपरोक्त मी म्हंटले कि, 'विशिष्ट कालावधी'तील कथा म्हणून सादर केला असता हा विषय तर योग्य झाले असते कारण, आज ज्या झपाट्याने यांत्रिकीकरण होते आहे किंवा झाले आहे, त्या काळात हि कथा अवास्तव वाटते. अ, रे, पण, मीच मघाशी वर नमूद केले, कि, कथेचा विषय वास्तव आहे, आणि आता हे काय, आता मी अवास्तव म्हणतेय या विषयाला? तर, हो, बहुसंख्यांच्या जगण्याचा विचार करता आजच्या काळात हा विषय 'आजच्या समाजातील बहुसंख्य स्त्रियांचे वास्तव' या सदरात मोडणार नाही. फार- फार तर एका कुटुंबाची कथा असा 'टॅग' चित्रपटाला आपण लावू शकतो.

चित्रपटात दाखवलेल्या कौटुंबिक वातावरणात बहुसंख्य स्त्रिया ज्या काळात जगल्या तो काळ चित्रपटात दाखवण्यात आलेला नाही, चित्रपटात दाखवलेला काळ हा आधुनिक काळ आहे. ऋचा विशीतली आहे आणि दिवाकर सुद्धा, आज विशीतल्या बहुतांश मुलामुलींचे ऊत्तर चाळीशी आणि पन्नाशीतील आईवडील स्वतःच एवढे विविध आघाड्यांमध्ये गुंतलेले असतात, कि, घरकाम करणार्या कामवाल्या बाईची मदत घेतल्याशिवाय हि मंडळी घरचा आणि बाहेरचा व्याप (कारभार) सांभाळूच शकणार नाहीत.

आज हयात असलेल्या, चाळीशी ते ऐंशी, या वयोगटातील बहुसंख्य स्त्रियांनी त्यांच्यात सतत काही ना काही खोट काढणाऱ्या, त्यांना त्यांच्यातील कलागुणांना किंवा शैक्षणिक पात्रतांना न्याय आणि वाव न देणाऱ्या कौटुंबिक वातावरणात राहावे लागले. मग ते माहेर असो कि सासर. उपरोक्त वयोगटातील अनेक स्त्रिया आजही अप्रिय वागणुकीचा, कौतुक रहित वागणुकीचा स्वीकार करून, कुटुंब व्यवस्था टिकवून ठेऊन आहेत. स्वानुभवावरूनच या वयोगटातील बहुसंख्य स्त्रियांनी, त्यांच्या लेकी सुनांना एकेक धागा सुटा करत मोकळे जगण्याची सवय लावण्याचा प्रयत्न केला, आजच्या पन्नाशी, साठीतील आया (आई), किंवा सासवा (सासू) त्यांच्या-त्यांच्या लेकी- सुनांच्या शिक्षणाला, कलागुणांना प्रोत्साहनच देतात. ऋचा आणि दिवाकरमध्ये असलेले नवरा बायकोचे नातेही, आज चाळीशी, पन्नाशीत असलेले कपल, त्यांच्या तरुणपणात ज्या प्रकारे एकमेकांशी वागले आणि जगले त्या प्रकारचे दाखवले आहे.

हल्ली कोणत्याच विषयाचे सोवळे राहिले नसल्याने, माझे वडील नाही म्हणतात म्हणून माझ्या बायकोने नोकरी करू नये किंवा तिचा छंद जोपासू नये, असे किमान आज तरी कुठला नवरा म्हणणार नाही. वडील नाही म्हणतात म्हणून बायकोने नोकरी करू नये असे फतवे काढले गेले, पण ते काही पिढ्यांअगोदर, आजच्या पिढीतील उच्चशिक्षित नक्कीच या विचारसरणीला खतपाणी घालणार नाही. कथानकात खरंतर एक कुटुंब म्हणून कोणीही कोणाशी भावनिक रित्या 'अटॅच' दाखवलेले नाही. पण, संपूर्ण चित्रपटभर सर्व पात्र अगदीच यंत्रवत वावरत असतात. दिवाकरची आई, आत्या किंवा वडील असोत कि ऋचाचे आई वडील भाऊ असोत, सगळी पात्र 'रोबोटिक' वाटतात.

दोहोंमधील 'सेक्स लाईफ' संदर्भात दाखवलेल्या प्रसंगांमागची घुसमटवणारी मानसिकता मात्र योग्य आहे, पण, घुसमटवणारी मानसिकता होण्यामागे जी कारणं चित्रपटात दाखवली, ती कारणं मागच्या पिढ्यांची होती. आज विशीतील किंवा तिशीतील दाम्पत्यांमध्ये बेबनावाची कारणे वेगळी आहेत, किंवा त्यांचा अहंकार दुखावला जाऊन त्यांच्यात होणार्या अबोल्याची कारणे वेगळी आहेत. पुरुष त्याचे चुकले तरी स्वतःची चूक कबूल करण्यास तयार नसतो, आज विशी, तिशीतला पुरुषही स्वतःच्या बायकोला 'सॉरी' म्हणण्यात कमीपणा मानतो, नातं टिकवायला चूक नसताना आजही स्त्रियाच नमतं घेत पुढाकार घेतात, हे वास्तव असले तरी, आज दोघांमध्ये असलेला तिसरा, हा जो तिसरा घटक आहे तो बहुतांश कुटुंबांमध्ये बदललेला आहे. आज मात्र बहुसंख्य कुटुंबांमध्ये दोहोंच्या नात्यात बेबनाव निर्माण करणारा तिसरा घटक बदलला आहे. आजच्या नवदाम्पत्यांमध्ये बेबनाव होण्यास कारणीभूत असणारा तिसरा घटक, नवऱ्याचे नातेवाईक नसून, मुख्यत्वे १)- पैसा, २) अन्य भिन्नलिंगी समवयस्कांशी असलेली नवर्याची किंवा बायकोची मैत्री ३) करियर च्या भ्रामक संकल्पनेपायी पैशाच्या मागे धावताना नात्याला न देता येणारा वेळ ४) एकमेकांना आम्ही 'स्पेस' देतोच्या नावाखाली एकमेकांना स्वातंत्र्य कि स्वैर वागण्यास दिलेली मुभा ५) एकमेकांचे शक्तीस्रोत न होता, एकमेकांचे स्पर्धक आहोत, कोण जास्त उत्तम हि मानसिकता बाळगणे ६) बेशिस्त जगताना, जगण्याचा उद्देशच न समजणे.

(पान ६ वर)

# आस यशाची; कास प्रशिक्षणाची!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८



**१.** एका मोठ्या शिक्षण संस्थेत इंजिनीअरिंग, एमबीए, एमसीए या विविध अभ्यासक्रमात उपलब्ध जागांच्या तुलनेत कमी प्रवेश झाले होते. या समस्येचे समाधान शोधण्यासाठी संचालक मंडळाने मला पाचारण केले. विद्यार्थी, शिक्षक, पालक सगळ्यांना भेटून पूर्ण परिस्थितीचा सखोल आढावा घेतला तसेच कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी कॉलेजमध्ये येऊन गेलेल्या अनेक कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून त्यांचे निरीक्षण जाणून घेतले. त्यातून खालील मुद्दे लक्षात आलेत.

१) कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी आलेले ९० टक्के विद्यार्थी इंडस्ट्री रेडी म्हणजे नोकरी देण्यायोग्य नव्हते. कारण प्रत्यक्ष कारखान्यात किंवा नोकरीसाठी आवश्यक असणारे बेसिक टेक्निकल स्किल्स म्हणजे कौशल्य त्यांच्यात नव्हते. कारण त्यांच्या ९८ टक्के शिक्षकांना कुठल्याही कारखान्यात काम करण्याचा अनुभव नव्हता. युजीसीच्या नियमांनुसार ते नेट, सेट परीक्षा पास होते, पीएचडीधारक होते किंवा पीएचडी मिळविण्याच्या प्रयत्नात होते. त्यांना प्रत्यक्ष इंडस्ट्रीत काम करण्याचा अनुभवच नसल्यामुळे ते जे शिक्षण देत त्यात प्रत्यक्ष कारखान्यात लागणाऱ्या कौशल्याचा पूर्ण अभाव होता. टेक्निकल इंटरव्ह्यू आणि व्हायवा या दोन्हीत काय फरक आहे, हेच त्यांना कळत नव्हते. २) याशिवाय शिक्षकांचे संवाद व इतर शिक्षण कौशल्याचे प्रशिक्षण झालेले नसल्यामुळे ते शिक्षक म्हणून प्रभावी नाहीत. ३) बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या अज्ञानामुळे करिअर कौन्सेलिंग न करता त्यांनी आपल्या मनाने तांत्रिक विषयात प्रवेश घेतला. त्यात मुलांची क्षमता अपुरी पडल्यामुळे त्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कारण एखाद्या कोर्समध्ये आवड (?) आहे म्हणजे क्षमता आहे असे नाही आणि त्या क्षेत्रात खूप चांगला स्कोप असला, तरी निवडलेल्या करिअरमध्ये त्या विद्यार्थ्याची क्षमता चांगली आहे असेही नाही. तसेच पालकांनी मुलांसाठी करिअर कसे निवडावे याचे प्रशिक्षण घेतलेले नाही. ४) कंपनीमधील अधिकाऱ्यांनी सांगितले की, काही मुले अभ्यासात जरी हुशार असली, तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास मात्र नीट झालेला नसतो. त्यांना सॉफ्ट-स्किल्सचे महत्त्व माहीत नसल्यामुळे त्याचे प्रशिक्षण घेतलेले नाही. त्यामुळे सामाजिक कौशल्य व कार्पोरेट स्किल्समध्ये ते कमी पडतात.

**थोडक्यात काय?** रोजगाराची खात्री नसल्यामुळे प्रवेश संख्या रोडावली. उत्तम रोजगार व यशासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक, प्रिन्सिपॉल, संस्था संचालक प्रत्येकालाच प्रशिक्षणाची प्रचंड आवश्यकता आहे. त्यामुळे खालील फायदे होतात.

२. सुप्रसिद्ध राष्ट्रीयीकृत बँकेचे एक कर्मचारी माझ्या कार्यालयात आले आणि म्हणाले, माझा अनुभव आणि उत्तम कार्यक्षमतेमुळे मला बढती मिळायला हवी, पण तरीही मला बढती हुलकावणी देते आहे. मी माझ्यापेक्षा वयाने व अनुभवाने मोठे असणाऱ्या नुकत्याच निवृत्त झालेल्या ओळखीच्या अधिकाऱ्यांना भेटलो व वरिष्ठांच्या दृष्टीने बढती मिळण्यासाठी कुठल्या बाबतीत मी कमी पडतोय ते जाणून घ्यायचा प्रयत्न केला. तेव्हा ते म्हणाले, पुढच्या बढतीसाठी फक्त स्वतःपुरते चांगले काम करणे पुरेसे नाही. त्यासाठी इतरांकडूनसुद्धा काम करून घेता आले पाहिजे. त्यासाठी प्रभावी व्यक्तिमत्त्व असणे आवश्यक आहे. त्यासाठी मी काय करावे असे विचारल्यावर, त्यांनी मला तुमच्याकडे पाठवले. काही साधने वापरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बारकावे नीट जाणून घेतल्यावर खालील गोष्टी आढळल्या. १) वक्तृत्व कला व कौशल्याचा अभाव, २) नेतृत्व कौशल्याचा अभाव, ३) व्यावसायिक संबंध निर्माण करता येत नाहीत व टिकवता येत नाहीत, ४) हाताखालच्या लोकांकडून वेळेच्या मर्यादेत काम करून न घेणे, ५) प्रेस कॉन्फरन्स घेता येत नाही, ६) अतिआवश्यक असूनही हाताखालच्या लोकांना शिस्त लावू शकत नाही, ७) कामामुळे निर्माण होणाऱ्या तणावाचे व्यवस्थापन करता येत नाही, ८) हाताखालील लोकांमध्ये कामाची नीट विभागणी किंवा डेलिगेशन करता येत नाही, अनेक गोष्टी स्वतःच करायचा प्रयत्न करतात. ९) हाताखालील लोकांची प्रभावी चमू किंवा टीम तयार करता येत नाही. १०) प्रभावी संवाद कौशल्य नाही. ११) आत्मविश्वास कमी आहे. १२) वेळेचे नियोजन नीट नसल्यामुळे प्रलंबित कामांची संख्या वाढत जाऊन तणाव वाढत जातो. त्यांचे समुपदेशन करताना त्यांना मी समजावून सांगितले की, बढती मिळण्यासाठी फक्त कामासंबंधी माहिती व अनुभव असणे पुरेसे नाही. बढतीसोबत येणाऱ्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी व स्वतःमध्ये चांगले बदल घडवून आणावे लागतील त्यासाठी योग्य प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. विविध प्रकारचे सॉफ्ट स्किल्स म्हणजे कौशल्य हस्तगत करावे लागतील. मग आमच्या स्मार्ट फिनिशिंग स्कूलच्या ट्रेनर, लाईफ कोच किंवा कार्पोरेट ट्रेनर म्हणजे प्रशिक्षक तयार करणाऱ्या एक वर्षाच्या अभ्यासक्रमाची त्यांना माहिती दिली. त्यांनी तो कोर्स पूर्ण केला.

**२.** रक्षाचे आईवडील अचानक अपघातात वारले. त्यावेळी ती बीबीएच्या शेवटच्या वर्षाला होती. उत्पन्नाचे काहीच साधन नव्हते. मग तिच्या मामाने तिला आधार दिला. मामाची आर्थिक स्थिती बेताचीच होती. आता पुढे काय करता येईल, याचे मार्गदर्शन घेण्यासाठी ती माझ्याकडे आली. तिच्या चाचण्या केल्यावर तिला सॉफ्ट-स्किल्स ट्रेनर व्हायचा सल्ला दिला. तिने उत्साहाने आमच्याकडे ते प्रशिक्षण पूर्ण केले. लगेच एका अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात तिला सॉफ्ट-स्किल्स ट्रेनरची नोकरी मिळाली. ती स्वत: एमबीए झालेली नसूनही सॉफ्ट-स्किल्सच्या ट्रेनिंगसाठी तिची निवड झाली व आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या विद्यार्थ्यांना तिने सॉफ्ट-स्किल्सचे ट्रेनिंग दिले. नंतर तिने आपले पुढचे शिक्षण पूर्ण केले. तिने इतकी छान प्रगती केली की, आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलची प्रमुख संचालिका म्हणून तिने जबरदस्त सादरीकरण केले. यश प्राप्तीसाठी सॉफ्ट-स्किल्स प्रशिक्षण प्रत्येकाला अत्यंत आवश्यक आहे.

जगातील कुठल्याही क्षेत्रात किंवा विषयात प्रशिक्षण द्यायचे असेल तर ते घडअ मध्येच द्यावे लागते. K = Knowledge म्हणजे ज्ञान (स्वत:बद्दल, कार्यक्षेत्राबद्दल) S = Skills म्हणजे कौशल्य A= Attitude म्हणजे मानसिकता किंवा विचारांची पद्धत. आपल्या मानसिकतेनुसारच आपले जीवन घडत जाते. सॉफ्ट-स्किल्स म्हणजे मनो-भावनिक-व्यवहार-बुद्धीकौशल्ये! म्हणजेच आपल्या मनाचा, तनाचा, बुद्धीचा, भावनांचा आणि उपलब्ध संसाधनांचा उत्तम उपयोग करून आपल्या वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी लागणारी कौशल्ये! अगदी बाळापासून तर अतिवृद्ध वयापर्यंत सर्वांनाच सॉफ्ट-स्किल्स खूप आवश्यक आहेत. ही कौशल्ये शिकता येतात. खरं तर सॉफ्ट-स्किल्स आणि हार्डस्किल्स दोन्ही प्रकारांसोबतच इतरही महत्त्वाचे विषय व्यक्तिमत्त्व विकासाचाच भाग आहेत. सॉफ्ट स्किल्सच्या प्रत्येक प्रकारात अनेक विषय येतात.

**सॉफ्ट-स्किल्सचे प्रकार :** इंट्रा-पर्सनल सॉफ्ट-स्किल्स किंवा व्यक्तिगत कौशल्ये म्हणजे मनातल्या मनात विचार करायला उपयोगी पडणारी सॉफ्ट-स्किल्स आहेत. आपल्या मनात जे विचार येतात, ज्या भावना जाणवतात, ताण-तणाव निर्माण होतात आणि त्याचं निवारण करायला आपण काय-काय करतो, कुठल्याही प्रकारची योजना तयार करतो, स्वयंपरीक्षण करतो, ध्येय ठरवतो वगैरे. ही कौशल्ये वापरताना किंवा त्यांचा विकास करताना आपल्या मनात होणारे हे सर्व मानसिकव्यवहार दुसऱ्या व्यक्तीला बाहेरून दिसत नाहीत. या प्रकारात अनेक महत्त्वाची कौशल्ये आहेत. थोडी कल्पना येण्यासाठी त्यापैकी काही विषयांची नावे दिली आहेत.

1. Change Management जीवनात होणाऱ्या बदलांचे व्यवस्थापन, 2. Self Analysis (SWOT Analysis) स्वयं-परीक्षण, 3. Goal Setting ध्येय निर्धारण कौशल्य, 4. Attitude Management Skills विचार व दृष्टिकोन व्यवस्थापन कौशल्य, 5. Self-Motivation Skills- स्वयं प्रेरणा कौशल्य, 6. Managing Emotions; भावनानियंत्रण व व्यवस्थापन कौशल्य, व्यसन प्रतिबंध व नियंत्रण कौशल्य, 7. Self Confidence- आत्मविश्वास संपादन कौशल्य, 8. Self Hypnotism- स्व-संमोहन कौशल्य, 9. Learning & Developing Grasing, Memory, Concentration, Will & Cognitive Mind Powers - एकाग्रता, ज्ञान-संपादन व स्मरणशक्ती आणि इतर मानसिक-शक्ती विकास कौशल्ये, ११. वेळेचे व्यवस्थापन, १२. निर्णय घेण्याचे कौशल्य म्हणजेच Decision Making Skills, वगैरे २१ विषय आहेत.

**इंटर-पर्सनल सॉफ्ट-स्किल्स किंवा सोशल किंवा सामाजिक कौशल्ये :** एका व्यक्तीचे दुसऱ्या एक किंवा अनेक व्यक्तींशी होणारे मनो-कायिक सामाजिक व्यवहार यांच्याशी संबंधित कौशल्ये म्हणजेच इंटर-पर्सनल सॉफ्ट-स्किल्स किंवा सोशल किंवा सामाजिक कौशल्ये. काही उदाहरणे खाली दिली आहेत. त्यावरून सॉफ्ट-स्किल्सच्या या प्रकारची कल्पना येईल.

1. Communication Skills संवाद कौशल्यं, 2. Managing Inter Personal Relations उत्तम सामाजिक नाते संबंध जपण्याचे कौशल्यं, ३. Personal Effectivenesी - प्रभावी व्यक्तिमत्त्व, ४. Emotional Intelligence- भावनिक बुद्धिमत्ता, ५. Assertive Skills सकारात्मक व्यवहार कौशल्यं, ६. Counseling Skills समुपदेशन कौशल्यं, ७. Etiquettes & Manners शिष्टाचार, ८. Artificial Intelligence कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग, ९. Language Mastery भाषा प्रावीण्य वगैरे या प्रकारात २२ कौशल्य आहेत. प्रोफेशनल सॉफ्ट-स्किल्स : यात नोकरी व व्यवसायात यशासाठी आवश्यक असणाऱ्या ३८ कौशल्यांचा समावेश आहे.

उदा. मानव-संसाधन व्यवस्थापन, विपणन व्यवस्थापन, टीम बिल्डींग व नेतृत्व कौशल्ये... शिकायचे काय ? श्रीरामच नव्हे, तर त्यांच्या आधीच्या ५२ पिढ्यांनी शस्त्र व शास्त्र दोन्हींचे प्रशिक्षण घेतले होते. श्रीकृष्ण यांनी सांदिपनी ऋषी तर पांडवांनी द्रोणाचार्यांकडून प्रशिक्षण घेतले होते.

श्रीदत्त महाराजांनी तर २४ गुरू केले होते. आपल्याला जन्मजात सगळी आवश्यक कौशल्ये जीवनात यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण घेणे खूप आवश्यक असते. मात्र कोणते प्रशिक्षण केव्हा घ्यावे हे आपल्या वैयक्तिक, व्यावसायिक व सामाजिक गरजा, ध्येय आणि परिस्थितीवर अवलंबून असते. आज सर्व देशभक्तांना शास्त्रांसोबतच शस्त्रांचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. असेल आस यशाची तर कास धरा प्रशिक्षणाची! (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## चित्तात रमावा । पांडुरंग ।।

सदासर्वकाळ । येऊ नाम वाचे ।।
ध्यान विठोबाचे । सोडू नये ।।१।।

श्वासाच्या वीणेशी । टाळांचे बोलणे ।।
वैराग्याचे जीणे । हरिनाम ।।२।।

साधावा संवाद । एकांती आत्म्याशी ।।
आणि संसाराशी । मौन व्हावे ।।३।।

स्थितप्रज्ञ व्हावी । मनोवृत्ती देवा ।।
चित्तात स्मरावा । पांडुरंग ।।४।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२०१७८

## रांगोळी

ठिपके ठिपके बघा कसे ते सहज येत साकार
मना मनातील सौंदर्य विलसे विलक्षण विश्वाकार
थक्क चकीत तो क्षण कशाशा वळती रेषा
पुढे साज रेखीव लेणे मांडणी पिढ्या पिढ्यांची भाषा
रांगोळी अशी नेटकी सांगे महती राज्यांची
सौंदर्यबोध जना खुलवतो
ज्योत बहुतेतील एकतेची
रंग अनोखे अशी विविधता अधिक
सुशोभित मिलन होता ठाव घेऊनी
मनामनाचा सोहळा सणांच्या जणू अंतरी होता
देव शोधावा चित्राकृतीतून वसे हृदयी सुखे
विसावला विखरे वस्तू वस्तूमधूनी
त्या कृपे तो रांगोळीत अवतरला..

अतुल ठाकरे

## एक होती अ‍ॅना

एक होती अ‍ॅना, गुलाबी गोबऱ्या गोऱ्या गालांची, खुद्कन हसणारी फुलपाखरांच्या मागे धावणारी ! गावापासून दूर होते घर तिचे, हिरव्या वनराईत, उतरणीवर गोल लांब वळण येत वाट लाल मातीची, घरापर्यंत नेणारी ओढ्यावरच्या पुलावरून गावात शिरणारी ! आगगाडीची झुकझुक आणि इंजिनाची कुक्कुक ऐकली की अ‍ॅना धावत सुटायची लाल वाटेने, शुभ्र पांढऱ्या फ्रॉकमध्ये, मागे टाकून गुलाबी बोगनवेली, दगडांची भिंत असलेला चर्च ओलांडून ती स्टेशनच्या आवारात शिरताना आवाज द्यायची 'पप्पा' हात पसरून मिठी मारायची काळ्या कळकट पप्पाला ! लाल वाटेने जाताना हातात हात घालून चिवचिवत घरी यायचे बापलेक ! पप्पा पप्पा म्हणत झोपाळ्यावर बापाच्या कुशीत गोष्ट ऐकत झोपून जायची अ‍ॅना, गोबऱ्या गुलाबी गालांची, ...एक होती अ‍ॅना....! राजीवलोचन पुंडलिक

शशी त्रिभुवन



# अमेरिकेचा ठसा, वाढीचा वसा

सध्या एकूणच अर्थनगरीवर अमेरिका व्यापून राहिली आहे. इथले गुंतवणूकदार, या देशाकडून लादले जात असलेले शुल्क या देशाशी मोदींनी केलेल्या वाटाघाटी याचीच चर्चा अर्थविश्वात सुरू आहे. दरम्यान, अमेरिकेने चीनवर निर्बंध लादल्याचा भारत, चीन आणि थायलंडवर कसा परिणाम होत आहे, याबद्दल मनोगते समोर येत आहेत. त्याच वेळी सोने एक लाख रुपया तोळे दराकडे वाटचाल करीत असल्याची दखलही घेणे गरजेचे आहे.

अर्थोद्योग
महेश देशपांडे

सध्या एकूणच अर्थनगरीवर अमेरिका व्यापून राहिली आहे. इथले गुंतवणूकदार, या देशाकडून लादले जात असलेले शुल्क या देशाशी मोदींनी केलेल्या वाटाघाटी याचीच चर्चा अर्थविश्वात सुरू आहे. किंबहुना, अमेरिकेने चीनवर निर्बंध लादल्याचा भारताला कसा फटका बसतो आहे. एकूणच टेरिफ वॉरचा भारत, चीन आणि थायलंडवर कसा परिणाम होत आहे याबद्दल मनोगते समोर येत आहेत. त्याच वेळी सोने एक लाख रुपया तोळे दराकडे वाटचाल करत असल्याची आणि भारत आणि ब्राझीलची अर्थव्यवस्था वेगाने वाढणार असल्याचे निरीक्षण समोर आले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला दिलेल्या धक्क्याचा फटका भारताच्या पोलाद क्षेत्राला बसला.

ट्रम्प यांनी चीनला धडा शिकवण्यासाठी स्टीलवर २५ टक्के दर लावण्याची घोषणा केली. हा दर १२ मार्चपासून लागू होणार आहे. या निर्णयानंतर जगभरातील बाजारात घसरण पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांच्या धमकीचा सर्वात मोठा परिणाम धातू क्षेत्रातील शेअर्सवर दिसून येत आहे. त्यांनी केलेल्या घोषणेनंतर त्याच्या अंमलबजावणीची तारीखही जाहीर करण्यात आली. त्यामुळे मुंबई शेअर बाजाराचा मेटल निर्देशांक २.२३ टक्क्यांनी घसरला. हा निर्देशांक ६२७.८१ अंकांनी घसरून २७,५२६.०८ अंकांवर बंद झाला. हा इंडेक्स सुमारे सहा टक्क्यांनी घसरला. हिंदुस्थान झिंक, जेएसएल, नॅशनल अ‍ॅल्युमिनियम कंपनी, एनएमडीसी, कोल इंडिया, वेदांत लिमिटेड, टाटा स्टील, ॲपल पोलो, जिंदाल स्टील, जेएसडब्ल्यू स्टील, हिंदाल्को या कंपन्यांच्या शेअरमध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. भारत हा अमेरिकेचा अव्वल पोलाद निर्यातदार देश नाही. अमेरिका बहुतेक स्टील कॅनडा, ब्राझील, मेक्सिको, दक्षिण कोरिया आणि व्हिएतनाममधून आयात करते. भारताच्या व्यापार मंत्रालयाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे की, २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत भारताच्या अमेरिकेतील निर्यातीत लक्षणीय घट होत आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने २०२२-२३ च्या तुलनेत अमेरिकेला स्टीलची ४७.६८ टक्के कमी निर्यात केली आहे, तर लोखंड आणि पोलाद वस्तूंच्या निर्यातीतही नऊ टक्क्यांनी घट झाली आहे. ही घसरण या आर्थिक वर्षातही कायम आहे. असे असूनही अमेरिकेने पोलादावर लादलेल्या शुल्काबाबत पोलाद कंपन्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

ट्रम्प प्रशासनाला माहीत आहे की, स्टीलवर शुल्क लादले गेले तर त्याचा थेट परिणाम चीनवर होईल. भारतीय पोलाद क्षेत्र दीर्घकालीन मजबूत असले, तरी अल्पकालीन तोटा टाळणे कठीण दिसते आणि पुढील उतार- चढावाची जोखीम कायम आहे. भू-राजकीय अनिश्चितता आणि आर्थिक धोरणांमधील बदल बाजाराच्या ट्रेंडवर प्रभाव टाकत राहतील. ताज्या 'टॅरिफ वॉर'चा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. भारत, चीन आणि थायलंडसारख्या उदयोन्मुख बाजारपेठांना त्याचा सर्वाधिक फटका बसू शकतो. 'नोमुरा' या ब्रोकरेज फर्मने दिलेल्या अहवालानुसार या देशांचे प्रभावी 'टॅरिफ' दर अमेरिकेपेक्षा खूप जास्त आहेत. त्यामुळे ते अधिक प्रभावित होऊ शकतात.

भारतातर्फे अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवर तीन टक्के शुल्क आहे. थायलंडमध्ये ०.९ टक्के विरुद्ध ६.२ टक्के तर चीनमध्ये २.९ टक्के विरुद्ध ७.१ टक्के अशी आकडेवारी आहे. अमेरिकेसोबत मुक्त व्यापार करार करणारे सिंगापूर आणि दक्षिण कोरियासारखे देश ट्रम्पच्या प्रत्युत्तर शुल्काच्या धमकीपासून अधिक संरक्षित आहेत. जगभरातील भारताच्या निर्यातीपैकी १८ टक्के निर्यात अमेरिकेला होते. २०२४ मध्ये सुमारे ३८ अब्ज इतका व्यापारी अधिशेष वाढला आहे. भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत इलेक्ट्रिकल/औद्योगिक यंत्रसामग्री, रत्ने आणि दागिने, औषधी, इंधन, लोखंड आणि पोलाद, कापड, वाहने, वस्त्रे आणि रसायने यांचा समावेश होतो. यांपैकी लोह, पोलाद आणि अ‍ॅल्युमिनियमचा वाटा एकूण ५.५ टक्के आहे, असे 'नोमुरा'मधील विश्लेषकांनी सांगितले.

आता या बातम्यांशी विसंगत अशी वेगळी बातमी. जागतिक नाणेनिधीच्या ताज्या आकडेवारीनुसार २०२५ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे बदल पाहायला मिळतील. अमेरिका आपले अव्वल स्थान कायम ठेवेल, तर भारत आणि ब्राझील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्था असतील. या दोन देशांचा जीडीपी वाढीचा दर गेल्या पाच वर्षांमध्ये सर्वोच्च आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेचा आकार वाढला आहे; पण कर्जाचा बोजाही झपाट्याने वाढला आहे. दुसरीकडे कॅनडा, जर्मनी आणि इटलीने कर्ज कमी करण्यात यश मिळविले आहे. त्याच वेळी जपानच्या अर्थव्यवस्थेत घसरण नोंदविली गेली आहे. त्यामुळे जपानची आर्थिक परिस्थिती आव्हानात्मक राहिली आहे. हे विश्लेषण २०२० ते २०२५ दरम्यानच्या आर्थिक डेटावर आधारित आहे. जागतिक नाणेनिधीच्या अंदाजानुसार अमेरिकेचा जीडीपी २०२५ मध्ये ३०.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचेल. २०२० मध्ये तो २१.४ ट्रिलियन डॉलर होता. म्हणजे पाच वर्षांमध्ये त्यात ४२ टक्क्यांची वाढ आहे. याशिवाय अमेरिकेने कर्जजीडीपी गुणोत्तर १३२ टक्क्यांवरून १२४ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. यातून अमेरिकेची मजबूत आर्थिक स्थिती दिसते.

चीनचा जीडीपी २०२५ पर्यंत १९.५ ट्रिलियन डॉलर असण्याचा अंदाज आहे. तो २०२० मध्ये १४.९ ट्रिलियन डॉलर होता. गेल्या पाच वर्षांमध्ये त्यात ३१ टक्के वाढ झाली आहे; परंतु चीनचे कर्ज-जीडीपी प्रमाण ७० टक्क्यांवरून ९४ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, चीनचा विकास दर कर्जावर अवलंबून आहे, जो दीर्घकाळासाठी धोकादायक ठरू शकतो. भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. भारताचा जीडीपी २०२० मध्ये २.७ ट्रिलियन डॉलरवरून २०२५ मध्ये ४.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. याचा अर्थ भारताने पाच वर्षांमध्ये ६० टक्क्यांची प्रभावी वाढ साधली आहे. तसेच, कर्ज-ते-जीडीपी गुणोत्तर ८८ टक्क्यांवरून ८३ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. हे भारताची आर्थिक स्थिरता दर्शवते. युरोपची सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या जर्मनीचा जीडीपी २०२० मध्ये ३.९ ट्रिलियन डॉलरवरून २०२५ मध्ये ४.९ ट्रिलियन डॉलर राहण्याचा अंदाज आहे. शिवाय कर्ज ते जीडीपी गुणोत्तर ६८ टक्क्यांवरून ६२ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. ब्राझीलची अर्थव्यवस्था वेग घेत आहे. ब्राझीलचा जीडीपी २०२० मध्ये १.५ ट्रिलियन डॉलरवरून २०२५ मध्ये २.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. ही वाढ पाच वर्षांमध्ये ५६ टक्के असेल. ब्राझीलने कर्ज-ते-जीडीपी गुणोत्तर ९६ टक्क्यांवरून ९२ टक्क्यांपर्यंत कमी केले आहे. त्यामुळे त्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. ब्रिटनचा जीडीपी २०२० मधील २.७ ट्रिलियन डॉलरवरून २०२५ मध्ये ३.७ ट्रिलियन डॉलर होण्याची अपेक्षा आहे.

११ फेब्रुवारी रोजी सोन्याची फ्युचर्स किंमत ८६ हजारांच्या आसपास होती. आता १० ग्रॅम सोन्याची किंमत ९० हजार रुपये प्रतितोळा होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अनेक अहवालांमध्ये सोन्याचा भाव ९० हजार रुपये प्रतितोळा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भारतात सोन्याला सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. बाजारातील परिस्थिती सतत बदलत राहते आणि गुंतवणूकदार आणि व्यापारी या बदलांवर लक्ष ठेवतात. ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यामुळे भू-राजकीय तणाव वाढला आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाल्याने सोने महाग होत आहे. वाढत्या महागाईमुळे सोन्याच्या किमतीलाही आधार मिळत आहे. शेअर बाजारातील वाढत्या चढउतारांमुळे लोक सोन्यात गुंतवणूक वाढवत आहेत. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# कोरा कागज था...



कोणत्याही वस्तूचा शोध कुठे लागला; असा प्रश्न आला की, पाश्चिमात्य विद्वान प्रथम रोम आणि ग्रीसकडे बोट दाखवतात. कारण आजची पश्चिम, यात युरोप आणि अमेरिका दोन्ही आले, ही रोमन आणि ग्रीक वैचारिक वारशावर उभी आहे. पण समजा रोमन साम्राज्य किंवा ग्रीक साम्राज्य यांच्याही अगोदरच्या काळातला एखादा शोध आहे; तर मग त्यासाठी इजिप्त किंवा चीन यांच्याकडे बोट दाखवले जाते. म्हणजे समजा, तत्सम रेशमी किंवा सुती कापडाचा शोध कुठे लागला; असा प्रश्न आला, तर बेधडक इजिप्तकडे निर्देश केला जातो. कारण काय तर इजिप्तच्या पिरॅमिडच्या उत्खननात राजे-राण्यांच्या मृतदेहांना तशा कपड्यात गुंडाळलेले आढळले.

रोषणाईसाठी वापरले जाणारे फटाके किंवा बंदुकीची दारू म्हणजेच बारूद यांचा उगम कुठे झाला; तर म्हणे, चीनमध्ये झाला. तसेच कागदाचा शोध कुठे लागला; तर म्हणे, चीनमध्ये लागला. इसवी सनाच्या सुमारे १०५ व्या वर्षी चीनमध्ये त्साई लुन किंवा काई लुन या इसमाने कागद सर्वप्रथम बनवला. त्याने म्हणे मासे पकडण्याची जुनी जाळी आणि जुन्या कपड्यांच्या चिंध्या यांचा एकत्र लगदा करून तो वाळवला. मग त्या वाळलेल्या लगद्यावर त्याने काहीतरी लिहिले. ते लिखाण पसरले नाही किंवा फुटले नाही. मग त्याने पुन्हा लगदा बनवून त्यात काही विशिष्ट झाडांचा रस किंवा लगदा मिसळला. यातून बनलेला सुका लगदा आणखीनच चांगल्या दर्जाचा झाला आणि अशा रीतीने कागदाचा जन्म झाला. हा त्साई किंवा काई लुन कोण होता; तर राजाच्या अंतःपुरावर देखरेख ठेवणारा अधिकारी होता. या सगळ्याला पुरावा काय; तर चिनी इतिहासकारांनी म्हणे हा सगळा वृत्तांत लिहून ठेवलाय.

बरे मग, चीनमधून हा कागदाचा शोध पश्चिमेकडे कसा पोचला? त्याचाच वृत्तांत अलेक्झांडर मन्रो नावाच्या विद्वानाने पेपर ट्रेल या आपल्या ताज्या पुस्तकामध्ये दिलाय. इ. स. १०५ मध्ये चीनमध्ये कागद निर्माण झाला खरा; पण इ. स. ७५१ पर्यंत तरी पश्चिमेला त्याची काहीच माहिती नव्हती. म्हणजे तोपर्यंत पश्चिमेतले लोक चामड्याचे तुकडे, वेगवेगळ्या प्राण्यांची कातडी किंवा भूर्जपत्रे यांच्यावरच लिखाण करत होते. इसवी सनाच्या सातव्या शतकात इस्लामचा जन्म झाला. इस्लामच्या झेंड्याखाली अरबांचे साम्राज्य मध्य आशियात वेगाने फैलावू लागले. अरबांच्या सत्तेचे म्हणजे खिलाफतीचे मध्यवर्ती केंद्र मक्का-मदिनेहून बगदाद या प्राचीन शहरात गेले. तिथे अब्बासी वंशाचे खलिफा राज्य करू लागले. ते पूर्वेकडच्या तुर्कवंशीय प्रदेशांवर स्वाऱ्या करून राज्यविस्तार आणि धर्मप्रसार करू लागले. अशा घटनाक्रमात इ. स. ७५१ साली बगदादी अरब आणिचीन यांच्या सैन्यांची गाठ मध्य आशियातल्या तलास इथल्या रणांगणांवर पडली. अरब जिंकले. त्यांनी बऱ्याच चिन्यांना कैद केले नि गुलाम म्हणून बगदादला नेले. या चिनी गुलामांकडून अरबांना कागद बनवण्याची कला प्राप्त झाली.

इ. स. ७९५ मध्ये अब्बासी घराण्यातला सगळ्यात प्रसिद्ध खलिफा हारून अल् रशीद याचा कारकीर्दीत बगदादमध्ये पहिला कागद कारखाना निघाला. मग मुसलमानांची आणखी दोन प्रसिद्ध केंद्रे म्हणजे दमास्कस किंवा दमिश्क आणि अलेक्झांड्रिया किंवा इस्कंदरिया अशा दोन शहरांमध्ये कागद निर्मिती सुरू झाली. इजिप्तपासून मोरोक्कोपर्यंत म्हणजे संपूर्ण उत्तर आफ्रिकेत पुढच्या ४०० वर्षांमध्ये भरपूर कागद निर्मिती केंद्रे निघाल्यानंतर मोरोक्कोतल्या मूरीश अरब मुसलमानांनी सन ११५० च्या सुमारास कागद स्पेनमध्ये नेला. अशा रीतीने एकदाचा कागद युरोपात पोचला. यानंतर सन १४३९ साली गटेनमर्गने मुद्रण यंत्राचा शोध लावून त्या कागदावर सर्वप्रथम बायबल छापले. पुढच्या काळात युरोपीय संशोधकांनी कागद निर्मितीचे इतके असंख्य यांत्रिक-तांत्रिक प्रकार नि प्रक्रिया शोधून काढल्या की इसवी सनाच्या १२ व्या शतकाच्या मध्यापर्यंत या लोकांना कागदच माहिती नव्हता; यावर विश्वासच बसू नये. कागदाच्या निर्मितीचा हा इतिहास तसा सर्वज्ञात आहे. मग अलेक्झांडर मन्रो या विद्वानाने आपल्या ताज्या पुस्तकात नवे काय शोधले आहे? मन्रोचे म्हणणे असे आहे की, इलेक्ट्रिसिटी, पेनिसिलीन, काचेचा चष्मा, ऑटोमोबाईल कम्बश्चन इंजिन हे आधुनिक शोध जरी फार क्रांतिकारक मानले जात असले, तरी खरा क्रांतिकारक शोध आहे. तो म्हणजे कागदाची निर्मिती हा. आणि हा शोध चीनने दोन हजार वर्षांपूर्वीच लावला म्हणून मन्रो चीनची भरभरून स्तुती करतो आहे. मन्रो म्हणतो, इसवी सनाच्या चौथ्या शतकात जेव्हा आमचे रोमन नि ग्रीक विद्वान पपायरसच्या तुकड्यावर किंवा चामड्यावर लिहीत होते, तेव्हा चीनमध्ये सर्वसामान्य माणसेसुद्धा सर्रास कागद वापरत होती. लिहिण्यासाठी आणि टॉयलेट पेपर म्हणून सुद्धा. अनेक उत्तमोत्तम बौद्ध ग्रंथ कागदावर ग्रंथित होऊन जपान आणि कोरियापर्यंत पोचलेदेखील होते. इसवी सनाच्या १५ व्या शतकात इटलीमध्ये झालेला रिनायसान्स म्हणजे पुनरुज्जीवन हा सध्याच्या आधुनिक विज्ञान युगाचा प्रारंभ मानला जातो. या क्रांतिकारक विकासक्रमात कागदाचा वाटा फार मोठा आहे. मन्रोच्या या सर्व प्रतिपादनात तथ्य आहेच; पण आपल्या दृष्टीने महत्त्वाचा भाग म्हणजे मन्रोसकट सगळे पाश्चिमात्य विद्वान रोमन, ग्रीक, इजिप्त, चीन यांचा आवर्जून उल्लेख करताना भारताला अगदी आठवणीने विसरतात. चीनमधला एक अधिकारी त्साई लुन याने इ. स. १०५ मध्ये कागदाचा शोध लावला. या चिनी इतिहासकारांच्या म्हणण्यावर मन्रोसारखे विद्वान विश्वास ठेवतात. पण मग इ. स. पूर्व ३२७ मध्ये ग्रीक आक्रमक अलेक्झांडर याच्याबरोबर भारतात आलेला निआर्कस याने, हिंदू लोक कापूस कुटून त्यापासून कागद बनवतात, असे स्वच्छपणे लिहून ठेवले आहे, याकडे मात्र ते आठवणीने दुर्लक्ष करतात. इसवी सनाच्या चौथ्या शतकात चिनी विद्वानांनी बौद्ध ग्रंथ कागदावर लिहून जपान आणि कोरियात नेले, असे मन्रो म्हणतो. पण स्वतः चिनी बौद्ध परंपरा तसे म्हणत नाही. चिनी बौद्ध परंपरेनुसार फाहियान हा पहिला चिनी बौद्ध भिख्खू इ. स. ३९९ ते इ. स. ४१४ या काळात चीनमधून भारतात आला. त्याने इथून अनेक उत्तमोत्तम ग्रंथ चीनमध्ये नेले. मग त्याने आणि बुद्धभद्र नावाच्या एका भारतीय भिख्खूने मिळून त्यांचे चिनी भाषेमध्ये भाषांतर केले. युरोपमध्ये कागद सन ११५० मध्ये गेला, असे मन्रो म्हणतो. पण इसवी सनाच्या ११ व्या शतकात मध्य भारतात भोजपाल हे स्वतःच्या नावाचे शहर बसवणाऱ्या परमारवंशीय भोजराजाला कागद बनवण्याची कला चांगलीच अवगत होती. राजा भोज परमार कमळांच्या देठांपासून कागद बनवत असे आणि म्हणून कमळांची शेती करण्यासाठी भोपाळ शहर नि आसपासच्या प्रदेशात त्याने असंख्य तलाव बांधले होते. युरोपात स्पेनमध्ये मूर मुसलमानांनी कागद नेण्यापूर्वी शंभर वर्षे म्हणजे इ.स. १०५३ मध्ये राजा भोज मरूनसुद्धा गेला होता. आणि केवळ भारतीयांनाच कागद माहिती होता असे नव्हे. युरोपियन लोकांना इजिप्तबद्दल जवळीक वाटते. कारण इजिप्तचे टॉलेमी राजे हे मूळचे इजिप्शियन नसून ग्रीक वंशीय होते. इसवी सन पूर्व २८३ या वर्षी मरण पावलेला राजा टॉलेमी सॉटर याने अलेक्झांड्रियामध्ये एक भव्य ग्रंथालय सुरू केले. त्याचा मुलगा टॉलेमी फिलाडेल्फस याने त्या ग्रंथालयात देशोदेशींचे ग्रंथ आणवले. रोमन सम्राट ज्युलियस सीझरने इजिप्तवर स्वारी केली, तेव्हा अलेक्झांड्रियाच्या या विख्यात ग्रंथालयात ७ लाख ग्रंथ होते, अशी नोंद रोमनांनीच केलेली आहे.

आता हे एवढे सगळे ग्रंथ पपायरसवर किंवा चामड्यावर लिहिलेले होते, असे समजणे मूर्खपणाचे ठरेल. या ग्रंथालयाला रोमन सैनिकांनी आग लावली. तरी बरेच ग्रंथ बचावले. ते पुढे इ. स. ३९१ मध्ये ख्रिश्चन सैन्याने जाळून टाकले. म्हणजे पुढे मुसलमानांनी युरोपातली आणि भारतातली ग्रंथालये बेचिराख केली, त्याची सुरुवात युरोपियनांनीच केलेली होती. असो. एकंदरीत पाश्चिमात्य विद्वान, लेखक, साहित्यिक हे भारताला मुळी मोजतच नाहीत. भारताची ही तऱ्हा, तर महाराष्ट्राबद्दल बोलायलाच नको! महाराष्ट्रातले जीर्णनगर, जुण्णनगर किंवा जुन्नर हे शहर अत्यंत प्राचीन आहे. कल्याण, स्थानक म्हणजे ठाणे, शूर्पारक म्हणजे सोपारा या कोकणातल्या बंदरांमार्फत जुन्नरचा व्यापार थेट रोमपर्यंत चालायचा. जुन्नरमध्ये अतिशय उत्कृष्ट दर्जाचा कागद बनायचा, जो संपूर्ण महाराष्ट्रात तर वापरला जायचाच, पण मुसलमानी राजवटीत उत्तर भारतातही जायचा. अलेक्झांडर मन्रो किंवा तत्सम युरोपीय-पश्चिमी विद्वानांच्या खिजगणतीतही जुन्नर, भोपाळ किंवा एकंदरीतच भारत नाही. इजिप्तमधल्या पिरॅमिडमधल्या राजा-राणींच्या मृतदेहांभोवती रेशमी आणि सुती कापड गुंडाळलेले आहे. म्हणून ते म्हणे सर्वात प्राचीन. अरे पण ते कापड बनले भारतात, वाराणशीत आणि बौद्ध जातक ग्रंथांमध्ये त्या अतितलम कापडाचा उल्लेख काशी कुत्तीय या नावाने केलाय, त्याचे काय? नाही! अशा उल्लेखांकडे दुर्लक्ष करायचे. भारतीय हिंदूबौद्ध लेखक काय म्हणतात त्याच्याकडे दुर्लक्ष करायचे. मग तो पुरावा लिटररी एव्हिडन्स असो, नाहीतर आर्किऑलॉजिकल एव्हिडन्स असो. तो अनुल्लेखाने मारायचा. पण भारताबद्दल आणि त्यातही भारताच्या उणिवांबद्दल मॅगेस्थिनीस, प्लिनी, अल् बेरुनी वगैरे परकीय प्रवासी लेखक काय म्हणतात ते मात्र अगदी ठळकपणे दाखवून द्यायचे; कारण? सरळ आहे.

भारत हा दुर्लक्ष करण्यासारखाच देश आहे. पण मग चीनची एवढी तारीफ का? कारण चीन ही उभरती महासत्ता आहे. चीन ही प्रचंड मोठी बाजारपेठ आहे. ती काबीज करायची असेल तर चिनी समाजाला, राज्यकर्त्यांना ओंजारून-गोंजारूनचुचकारून घ्यायला पाहिजे. म्हणजे इतिहास लेखनाचे उद्दिष्टही अखेर वर्तमान व्यापारी स्वार्थ साध्य करणे हेच आहे. सत्यशोधन हे नाही. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

पान १ वरून

## ज्याचा त्याचा कुंभ आणि दंभ!



कुंभमेळ्यासारखे उत्सव हा श्रद्धेचा विषय आहे. त्यासाठी कोणावरही सक्ती केली जात नाही. केवळ श्रद्धावान सनातनीच नव्हे, तर अन्य धर्मीयांनाही तेथे मुक्त प्रवेश आहे. आपल्या विश्वाचा आकार केवढा, या प्रश्नावर एका नामवंताने ज्याच्या त्याच्या मेंदूएवढा असे उत्तर दिले होते. तेच अशा भव्य सणांबाबत खरे आहे. ज्याची जशी श्रद्धा आहे, त्याला तसे फळ मिळाले आहे. ज्याला या कुंभमेळ्यातून जे हवे होते, तेच मिळाले आहे. त्यामुळे ज्यांना केवळ तेथील चिखलच तुडवायचा आहे, त्यांना त्याचीही मुभा आहे. हीच सनातन मानसिकता आहे.

## स्थलांतराचा 'सोनेरी' मार्ग

याचा फायदा निश्चितपणे भारतालाही होऊ शकतो.

एकूणच पाहता, ट्रम्प यांचा 'गोल्ड कार्ड' व्हिसा प्रस्ताव अमेरिकेच्या स्थलांतर धोरणातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या निर्णयामुळे अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर भांडवल निश्चित मिळेल. परंतु, त्याचवेळी तो केवळ श्रीमंत गुंतवणूकदारांसाठीच लाभदायक ठरेल की, रोजगार निर्मितीही करेल हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. स्थलांतर धोरणाचे व्यापक सामाजिक परिणाम असतात. त्यामुळे हे बदल अमेरिकेच्या स्थानिक उद्योगांना आणि जागतिक गुंतवणूकदारांना कसे प्रभावित करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रस्ताव अद्याप केवळ प्रारंभिक टप्प्यात आहे. त्याची अंमलबजावणी कशी केली जाते? राजकीय, कायदेशीर स्तरावर कोणते अडथळे येतात? याचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो? हे पाहणेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे. स्थलांतर धोरण हा कोणत्याही देशाच्या दीर्घकालीन विकासाचा कणा असतो.

ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णयही अमेरिकेसाठी आणि जागतिक स्थलांतर व्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे, हे निश्चित.

## 'युएसएआयडी'चा नॅरेटिव्ह

त्यामध्ये राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये, मतदारांच्या संख्येत अवास्तव वाढ झाल्याचा आणि त्यामुळे मतदानाचा टक्का वाढून भाजप सत्तेवर आल्याचा आरोप केला होता. त्या आरोपाला पाठिंबा देऊन, उबाठा खासदार संजय राऊत यांनी तर हे 'फ्लोटिंग मतदार' असून, महाराष्ट्रानंतर ते आता बिहार आणि अन्य राज्यांमध्ये निवडणुकीच्या वेळी जातील असाही दावा केला होता.

अर्थात, हे आरोप काही नवे नाहीत. देशात २०१४ साली झालेल्या सत्तांतरानंतर 'ईव्हीएम' हॅकिंगचे आरोप जवळपास २०२४ सालापर्यंत, करण्यात येत होते. त्यासाठी अगदी परदेशातही, पत्रकार परिषदा वगैरे आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे, 'ईव्हीएम'ला सर्वोच्च न्यायालयातही आव्हान देण्यात आले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने, 'ईव्हीएम' हॅकिंगचा दावा सपशेल फेटाळून लावला. त्याचप्रमाणे जनतेच्या दरबारातही 'ईव्हीएम'चा दावा अपयशी ठरला. त्यामुळे काँग्रेस आणि विरोधी पक्षांकडून 'ईव्हीएम' हॅकिंगऐवजी, मतदारयादीमध्येच घोळ असल्याचा नवा दावा करण्यास प्रारंभ झाला. त्याचा प्रारंभ झाला तो हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान. हरियाणा आणि महाराष्ट्रात 'इंडी' आघाडी आणि मविआचा धुव्वा उडाल्यानंतर, मतदारयादीमध्ये घोळ असल्याच्या आरोपांना धार देण्यात आली. त्याचवेळी केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदारनोंदणीची प्रक्रिया, मतदारयाद्या अद्यतनीत करण्याची प्रक्रिया, त्यामध्ये राजकीय पक्षांचा असलेला सहभाग याविषयी सविस्तर उत्तर दिले आहे. मात्र, त्याकडे जाणीवपूर्क दुर्लक्ष करून आपलाच अजेंडा पुढे रेटण्याचाच प्रकार करण्यात आला. त्याचे कारण म्हणजे, घटनात्मक मार्गाने सत्ता मिळत नसल्याने, घटनात्मक संस्थांचीच विश्वासार्हता कमी करण्याचा प्रयत्न करणे होय. या सर्व प्रकारांमागे परकीय शक्ती असू शकतात, अशी शंका वेळोवेळी व्यक्त करण्यात येत होती. अमेरिकेमध्ये ट्रम्प प्रशासनाने सुत्रे हाती घेतल्यानंतर, त्या शंकेत तथ्य असल्याचे पुढे आले.

ट्रम्प प्रशासनाने अमेरिकेतर्फे जगभरात वाटली जाणारी 'युएसएड' नामक खिरापत, बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हे करत असताना 'युएसएड'च्या साथीने जगभरात काय काय करण्यात आले, त्याची माहितीही आता बाहेर येऊ लागली आहे. भारतामध्ये 'इंटरनॅशनलस फाऊंडेशन फॉर इलेक्टॉरल सिस्टीम', 'इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्शन मॅनेजमेंट' आणि 'सीईपीपीएस' या संस्थांनी जॉर्स सोरोससोबत संगनमत करून, भारतामध्ये २०११ पासून दरवर्षी जवळपास तीन ते साडेतीन लाख डॉलर्स ओतल्याचे स्पष्ट झाले आहे. या सर्व पैशांचा वापर, भारतामध्ये निवडणूक प्रक्रियेमध्ये ढवळाढवळ करण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप, भाजपतर्फे करण्यात येत आहे. हा पैसा प्रामुख्याने 'व्होटर टर्नआऊट' अर्थात मतदानाच्या टक्केवारीसाठी, विविध संस्थांमार्फत वापरण्यात येत होता.

वरिष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी देखील याविषयी संशय व्यक्त केला आहे. ते म्हणाले, 'डॉजला आढळले की, 'युएसएड'ने भारतात मतदानासाठी २१ दशलक्ष डॉलर्सचे वाटप केले होते. मात्र, खरे तर हा प्रकार म्हणजे, मतदारांना पैसे देऊन मतदान करण्यासाठी भाग पाडणे आणि त्याद्वारे सत्ता बदलण्याचा प्रयत्न करणे, असा आहे. वीणा रेड्डी यांना २०२१ मध्ये, 'युएसएड'च्या भारतीय मिशनच्या प्रमुख म्हणून भारतात पाठवण्यात आले. त्या २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर अमेरिकेत परतल्या. कदाचित त्यांचे मतदारसंख्येत वाढ करण्याचे, ध्येय पूर्ण झाले असावे. मात्र, हा सर्वच प्रकार अतिशय संशयास्पद आहे. त्यामुळे तपासयंत्रणांनी चौकशी करावी, असे जेठमलानी यांनी म्हटले आहे. अर्थात, 'युएसएड'ने केवळ निवडणूक प्रक्रियेतच ढवळाढवळ केलेली नाही, तर भारतात गेल्या काही वर्षांमध्ये झालेला फॅक्टचेकर्सचा सुळसुळाट, यामागेही 'युएसएड' असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे, 'संविधान बदलले जाणार' हे आणि असे अनेक नॅरेटिव्हदेखील, वेळोवेळी नियोजनबद्ध पद्धतीने सक्रिय होत असतात. त्यामुळे 'युएसएड' आणि अशा अनेक घटकांवर

कथा

रश्मी वाघमारे

## असाही एक करार...

आभा चिंताग्रस्त अशी रस्त्यावरून सैरभैर मनाने चालली होती, विचारांच्या आवर्तनात. तिचे कुठेही लक्ष नव्हते. कुठून आणायचे एवढे पैसे, तेही एक रकमी? तेवढ्यात गाडीचा कर्कश ब्रेक दाबल्याचा आवाज आला. केवढ्याने तरी ओरडला तेजस... 'अहो मिस, माझीच गाडी सापडली काय समोर यायला?'' तिचे डोळे नकळत भरून आले. तो खाली उतरला आणि विचारले, ''काय झाले. या बसा गाडीत. मी सोडतो तुम्हाला घरी.'' ''छे छे, बरी आहे मी आता, जाईन व्यवस्थित घरी.'' ती बोलली. वडिलांची तुटपुंजी फॅमिली पेन्शन; त्यात अचानक उद्‌भवलेला आईचा दुर्धर आजार. नुकतेच पूर्ण केलेले शिक्षण... कसे होणार सारे काही? आभाला काळजी वाटत राहिली. कुणाकडून तरी कळले, या दुर्धर आजारावर निष्णात असा एकच डॉक्टर आहे, जो संपूर्णपणे हा रोग बरा करू शकतो.

आभा आईला घेऊन डॉक्टर तेजसच्या दवाखान्यात उपचारासाठी आली. तिचा नंबर आल्यावर आईला घेऊन ती आत गेली. डॉक्टर तेजस तिला बघताच आश्चर्यचकित होऊन म्हणाले, 'अरे तुम्ही? या या. बसा सांगा काय झाले?' आभाने सर्व काही सांगितले. शिवाय कागदपत्रेही दाखविली. आपण करूया पूर्ण उपचार, मात्र हे उपचार अतिशय खर्चिक आहेत, एवढं मात्र निश्चित! घरी येताना आभा आशा-निराशेच्या झुल्यावर झुलत होती. एक आनंद की आईला उपचार मिळणार; मात्र दुसरी काळजी की पैशाची सोय कशी होणार? रायबहादूर देशमुख मोठे जमीनदार! अनेक उद्योग समूहाचे मालक. त्यांचा एकुलता एक वारस, त्यांचा नातू डॉक्टर तेजस. सर्व दृष्टीने योग्य, होतकरू, हुशार, स्मार्ट; मात्र लग्नसंस्थेवर अजिबात विश्वास नसलेला.. त्याने आपल्या आई-वडिलांचे दुभंगलेले नाते पाहिले होते. त्याच्या आईचा उच्छृंखल स्वभाव, क्लब, पार्ट्या, त्यामुळे वडिलांची होणारी घुसमट पाहिली होती. तो जाणत्या वयात प्रवेश करतानाच ते दोघे वेगळे झाले. त्याच्या आईने नवा डाव मांडला, ती परदेशी निघून गेली. वडिलांची जीवन इच्छा संपली. त्यांनी स्वतःला दारूत झोकून दिले. तो पोरका झाला. तो मोडलेला डाव, अर्धवट संसार, त्याची दुरवस्था तेजसने फार जवळून अनुभवली होती. आबाजीशिवाय त्याचे या जगात कोणीही नव्हते. एरवी अत्यंत कठोर असणारा तो, आबाजींवर त्याचे जिवापाड प्रेम! आबाजी मागे लागले होते, 'लग्न कर पंधरा दिवसांच्या आत. माझी शेवटची इच्छा समज. नाही तर मी अन्न-पाण्याचा त्याग करीन.' आज बारा दिवस झाले होते.





आबाजी शब्दांचे किती पक्के आहेत, हे तेजसला चांगलेच माहीत होते. आभा आईला घेऊन आली दवाखान्यात चिंताक्रांत अशी, जवळचे पैसे संपायला आले होते. तेजसच्या डोक्यात एक विचार आला. तो म्हणाला, ''मी उपचार करीन, पण माझी एक अट आहे, तुम्ही मला मदत करा.'' पुढचे सारे भराभर घडले. दोघांनी मॅरेज रजिस्ट्रारसमोर दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत सह्या केल्या करारपत्रावर आणि एकमेकांच्या गळ्यात हार घातले. तिने एक हलकी गुलाबी जरीची साडी, गळ्यात एक मोत्यांची माळ घातली होती. ती एक सुंदर सोज्वळ नवरी दिसत होती. तेजसने गडद निळ्या रंगाचा सूट परिधान केला होता. 'चला' एका मोठ्या गाडीचे दार उघडून शोफर उभा होता. गाडी एका भल्या मोठ्या बंगल्याच्या आवारात थांबली. आत्याबाई चांदीचे मोठे तबक घेऊन औक्षण करायला उभ्या होत्या आणि बाजूला उभे होते रायबहादूर देशमुख. अत्यंत प्रसन्न व प्रेमळ नजरेने नवदाम्पत्याकडे बघत! एरवी कठोर वाटणारे आबाजी खूप कौतुकाने बघत होते दोघांकडे. इतका आनंद असतो नातवाचे लग्न बघण्यात. त्याने मान उडवली आणि आत्याबाईंनी औक्षवण केले. ''या, या. सूनबाई तुमचे स्वागत आहे तुमच्या घरात! यांना देवघरात न्या...'' आबाजी म्हणाले. आभाने गार पाण्याचा शिपका चेहऱ्यावर मारला. एक चंदेरी साडी नेसली. केस मोकळे केले, कुंकू नीट केले आणि ती विसावली. मी केले ते योग्य की अयोग्य.. क्षणभर ती विचारात पडली. तेवढ्यात एक गडी वाफाळता चहा घेऊन आला. ''घ्या वहिनीसाहेब, तुम्हाला आवडेल.'' ''अरे वा!'' तिने चहा घेतला. खरेच किती जरूर होती या चहाची. तेवढ्यात आबाजी आले. ती उठून उभी राहिली. तिने वाकून त्यांना नमस्कार केला. ''कसा वाटला आपला बंगला?'' त्यांनी विचारले. ''छान आहे.'' ती संकोचत म्हणाली.

आपल्या हातातला एक जाडजूड हार तिच्या हातात देऊन आबाजी म्हणाले, ''हा आपला पिढीजात हार. आता तुम्ही वापरा सांभाळून!'' तिने मान हलवली. तिला अपराधी वाटले, आपण चक्क फसवतो आहे या मोठ्या माणसाला. तिने बाजूला उभ्या असलेल्या तेजसकडे पाहिले. त्याने शांत राहण्याची खूण केली. हा तर करार आहे, मी माझ्या आईसाठी आणि तेजसने त्याच्या आबाजींसाठी केलेला! देवावर विश्वास नसल्यामुळे पुढचे धार्मिक कार्यक्रम आपसूकच टळले आणि आभाने देवाला मनोमन हात जोडले. गेले तीन दिवस चाललेली दगदग, ताण, थकून आभा झोपी गेली. तिला गाढ झोप लागली होती. तिला उठायला बराच उशीर झाला. तिने घाईने आपले आवरले व नवी साडी नेसून धडपड करीत जिना उतरू लागली. साडी नेसायची सवय नसल्यामुळे तिचा पाय साडीत अडकला आणि ती धाडकन आपटणार या आधीच एका मजबूत हाताने तिला सावरले. तेजस म्हणाला, ''जरा जपून चाला, हे ठिकाण तुम्हाला नवीन आहे.'' तिसऱ्या दिवशी आत्याबाईंनी एक हिरवीकंच रेशमी नऊवार आणि अनेक दागिने घालून आभाला तयार केले. तेजसही सोवळे नेसून व उपरणे घेऊन राजबिंडा दिसत होता. आभाने देवाला नमस्कार केला आणि आत्याबाईंनी एका मोठ्या दालनात आभाला नेऊन बसवले. आता मात्र आभाचे धाबे दणाणले. तेजस आला आणि लांब जाऊन झोपला. ''तुम्ही येथे झोपू शकता.'' तो म्हणाला. पुढच्या पंधरा मिनिटात तेजस गाढ झोपला होता. मात्र आभाच्या डोळ्यात झोप नव्हती. एक अनोळखी पुरुष, एक करार आणि विचित्र मनस्थिती... केव्हा तरी पहाटे डोळा लागला. जवळजवळ एक महिना झाला. आभा आता इथल्या दिनचर्येला सरावली होती. अधून मधून ती आईला भेटून येत असे. दोन महिने गेले. ''आता तुमची आई संपूर्णपणे बरी झाली आहे.'' डॉक्टर तेजसने सांगितले. ''तुम्ही त्यांना घरी घेऊन जाऊ शकता.'' ''अरे वा!'' आभा म्हणाली. मात्र आता तेजसची भेट रोज होणार नव्हती. ती नकळत त्याच्यात गुंतत चालली. आभा आईला घेऊन घरी आली. आज तेजस मात्र टक्क जागा होता. आभाचे अवतीभवती असणे, काळजी घेणे, आबाजींशी असलेले तिचे भावबंध, सुसंस्कारी वागणे, त्याला तिची खूप आठवण येत होती. नव्हे, आत्ताच जाऊन तिला घरी आणावे असे वाटत होते. तेवढ्यात आबाजी वर आले. ''काय तेजस, सूनबाई नाही तर झोप येत नाही वाटतं?'' त्यांनी विचारले. ''नाही आबाजी, तसं काही नाही.'' तो उत्तरला. ''उद्या सकाळी जा आणि त्यांना घेऊन या. आता मात्र सात जन्माचा करार करा.'' ते गडगडाटी हसून म्हणाले. ''म्हणजे आबाजी तुम्हाला माहीत होतं? 'त्याने आश्चर्याने विचारले. '' हो तर'' आबाजी म्हणाले... माहेरी जायच्या आधी सूनबाईने त्यांचे मन मोकळे केले होते. तेजस मनाने केव्हाच पोहोचला होता आभाकडे!

दक्षिण भारतातील कर्नाटक राज्यातील 'कन्नड' भाषा एक सशक्त व समृद्ध भाषा आहे. या भाषेतील वचन साहित्याचा ठेवा कन्नड भाषेचे वैभव आहे. महात्मा बसवेश्वर, योगिनी अक्कमहादेवी, संत पुरंदास, आदी संतांचे कन्नड साहित्यात विशेष योगदान आहे. कर्नाटक मध्ये शैव आणि वैष्णव अशा दोन्ही भक्तीधारा पूर्वी पासून विद्यमान आहेत. वनवास काळात, किष्किंधा अरण्यातील वानराज वाली-सुग्रीव यांच्या राज्यात श्रीरामावचे वास्तव्य होते. किष्किंधा विद्यमान कर्नाटक राज्यातील हम्पी परिसरात आहे. अशा प्रकारे कर्नाटकची भूमी श्रीराम- लक्ष्मणांच्या चरणस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. कन्नड भाषेत अनेक रामायणे लिहिली गेलेली आहेत. 'तोरवे रामायण' त्यापैकी एक मुख्य साहित्यकृती काव्यग्रंथ आहे. त्याचा अल्पपरिचय...

लेखांक ६०

# कन्नड भाषेतील 'तोरवे रामायण'


...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

रामायणामध्ये किष्किंधा अरण्याचे विशेष महत्त्व आहे. वाल्मिकी रामायणामध्ये जी सप्तकांडे आहेत, त्यामध्ये एका कांडाचे नावच 'किष्किंधा कांड' आहे. भगवान विष्णू अवतार श्रीराम आणि भगवान शेषाचा अवतार रामबंधू लक्ष्मण या दोन रघुकुल सुपुत्राच्या पदस्पर्शाने-वास्तव्याने परम पावन झालेले 'किष्किधा' आज विद्यमान कर्नाटक राज्याचा भूभाग आहे. विद्यमान हम्पी परिसर त्रेता युगातील किष्किंधा आहे असे अभ्यासकाचे मत आहे. 'किष्किंधा' म्हणजे 'वानर राज्य'. या वानरसेनेच्या सीता शोधात व युद्धातील सहभागामुळेच रामाला लंका विजय संभव झाला. या वानर राज्याचे अधिपती वानरराज 'वाली' आणि त्याचा भाऊ 'सुग्रीव' हे सुद्धा ईश्वरी अवतार मानले जातात. वाली हा देवराज इंद्र तथा सुग्रीव सूर्यदेवाचा पुत्र मानले जातात. एकाच मातेचे हे दोन पुत्र होते त्यांच्या मातेचे नाव 'ऋक्षराज'.

कर्नाटकची 'कन्नड' भाषा एक सशक्त संपन्न भारतीय भाषा आहे. जगतज्योती महात्मा बसवेश्वर आदी शिवशरणांचे 'वचन साहित्य' कन्नड भाषेचा अमृतठेवा व ऐश्वर्य आहे. कर्नाटक ही शैव- वैष्णवांसह अनेक भक्ती विचाराची संगमस्थली आहे. अशा या भक्तीभूमीत श्रीरामाला दैवत मानून त्याचे चरित्रगायन अनेक कवींनी- संतांनी केलेले आहे. कन्नड भाषेमध्ये सुमारे २० रामायणे व रामकथा लिहिल्या गेल्या. त्यामध्ये 'कुमुदेन्दु रामायण', 'रामचंद्र चरितम्', 'बत्तलेश्वर रामायण' आणि 'तोरवे रामायण' ही काही प्रमुख रामायणे मानली जातात.

श्रीरामाची विष्णूचा अवतार, देव म्हणून विविध संस्कृत रामायणातून स्तुतीपाठ गायल्या नंतरच्या काळातील ही सर्व रामायणे आहेत. त्यामुळे या सर्व रामकथांमध्ये रामाचे 'परब्रह्म', 'देवता' अशा श्रद्धाभावाने चित्रिण आढळते. त्यामुळे या रामायणात अनेक चमत्कार कथांचा सढळपणे समावेश दिसतो. अनेक ठिकाणी रामापेक्षा, रामनामाला तारकमंत्र, संजीवकमंत्र म्हणून उपासनेच्या अंगाने विशेष प्राधान्य दिलेले आहे. नामस्मरण भक्तीचे मुख्य साधन म्हणून रामनामाचे महत्त्व विशद करण्यात आलेले आहे.

'तोरवे रामायण' हे १५ व्या शतकाच्या दरम्यान




लिहिले आहे. ते कुणी लिहिले, त्या कर्त्याचे ठामपणे संपूर्ण नाव अद्यापी अज्ञात आहे. पण 'कुमार वाल्मिकी' या कवीने ते लिहिले असे मानले जाते. काहींच्या मते 'तोरवे' हे लेखक-कवीच्या गावाचे नाव आहे. ते गाव कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यात आहे. हा कवी 'कुमार वाल्मिकी' गुरू नरहरी यांचा शिष्य होता असे म्हणतात.

काहींच्या मते कवीचे नरहरी हे उपास्य दैवत होते. स्वतः कवीने स्वतःबद्दल स्पष्टपणे काहीही लिहिलेले नाही. त्यामुळे संशोधकामध्ये हे विविध प्रकारची मतमतांतरे आहेत. बहुतेक कवी स्तुतीस्तोत्रे, ग्रंथ लिहून ईश्वरार्पण करीत असत. या साहित्याचा कर्ता करविता ईश्वर असून मी निमित्तमात्र आहे. अशा भावाने ते लिहित होते. म्हणून ते स्वतःचे नाव, गाव, मातापिता, लेखन काळ, स्थान याचा उल्लेख करीत नसत. कुमार वाल्मिकीचे 'तोरवे रामायण' छंदोबद्ध काव्य आहे. 'भामिनीषटपदी' या छंदामध्ये ते महाकाव्य रचलेले आहे. त्यात ११२ प्रकरणे असून ५०० छंद (ओळी) आहेत. 'तोरवे रामायण' मध्ये कवीने श्रीरामाला परब्रह्म, देवाचा अवतार मानूनच एकूण लेखन केलेले आहे. बऱ्याच ठिकाणी या कवीने कवीकुलगुरू कालिदासाच्या रघुवंश संस्कृत महाकाव्याचे अनुकरण केलेले आहे. विशेषतः श्रीरामाची वंशावळीचा सारा तपशिल या कवीने कालिदास काव्यातून घेतलेला आहे असे दिसते. या रामायणातील अर्धा अधिक भाग राम-रावण युद्धावरच आहे. त्यामुळे या रामायणात वीर रसाचा अत्याधिक उपयोग केल्याचे दिसते. १५ व्या शतकातील हिंदू समाजात, धर्मांध मुस्लिम राजवटीतील अत्याचारामुळे निर्माण झालेले भयाचे, न्यूनगंडाचे जे वातावरण निर्माण झाले होते. त्या स्थितीमध्ये हिंदू समाजात रामाच्या पराक्रम कथाद्वारे जनजागरण करण्याच्या हेतूने ही रामायणे लिहिली गेली आहेत. धर्म रक्षण, धर्मभावन जागृती हेच या रामायणांमागे मुख्य उद्देश असावा.

तोरवे रामायणाचे वैशिष्ट्य- वेगळेपण म्हणजे, कवीने यामध्ये दर्शवलेले 'श्रीरामाचे द्रष्टेपण'. श्रीरामाला भविष्यात घडणाऱ्या घटनांचे स्वप्नदृष्टांताने पूर्व सूचन होते. उदा.-

१) युवा श्रीरामाला मिथिलेला जाण्यापूर्वीच, एका स्वप्नदृष्टांतात आपण सीते समवेत एका उद्यानामध्ये विहार करीत आहोत असे दृश्य दिसलेले असते आणि त्याबद्दल रामाने आपले कुलगुरू वसिष्ठ, गुरू विश्वामित्र यांना पूर्व कल्पनाही दिलेली असते. असे चित्रण या तोरवे रामायणात आहे.

२) सीता हरण करण्यास रावण संन्याशाच्या वेषामध्ये सीतेच्या कुटीबाहेर येतो, तेव्हा पितृतुल्यविभुती समजून सीता त्या रावणास वंदन करते. पाया पडते.

३) रावणाला आपण युद्धात मरणार आहोत याची कल्पना असते म्हणून तो युद्धापूर्वी प्रमुख सल्लागारांची बैठक घेऊन माझ्या मृत्यूनंतर बिभिषणाचाच आपण राज्याभिषेक करावा असे बजावून सांगतो. एवढेच नव्हे तर आपले सारे दागदागिने लोकांमध्ये वाटून टाकतो. असा प्रसंग घालून रावणाची प्रतिमा उजळून टाकण्याचा प्रयत्न केला.

४) राजा जनकास शेत नांगरताना एका पेटीत एक बालिका सापडते, तेव्हा हिचे काय करायचे प्रश्न पडतो? अशा वेळी 'तोरवे रामायण', तेथे देवषी नारद प्रगटतात आणि जनक-नारद संवाद होतो. त्यानंतर राजा जनक त्या बालिकेस आपली मुलगी मानून राजवाड्यात तिचे संगोपन करतो. हे प्रसंग,तोरवे रामायणाचे वैशिष्ट्य आहे.

१५ व्या शतकातील हे 'तोरवे रामायण' कन्नड साहित्यातील एक श्रेष्ठ कलाकृती मानले जाते. या रामायणानंतर कन्नड मध्ये रामकथा व रामायण लेखनाचा सुकाळ झाला.




नोंद

कौस्तुभ वीरकर

देशातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून दलालांच्या नादी लागून, बाजारात फसवला जात होता. त्याच्या घामाचा पैसा मधल्या दलालांनी आणि सत्तेतील भ्रष्ट मंडळींनी लुबाडला. परिणामी, शेतकरी कर्जबाजारी होत गेला. त्यावर उपाय म्हणून, कर्जमाफीचे मोठमोठे गाजर दाखवण्यात आले. पण, खरी मदत कोणालाच झाली नाही. उलट, या कर्जमाफीच्या नावाखाली त्याकाळातील सत्ताधारीच स्वतःच्या तुंबड्या भरत राहिले. जे लोक शेतकऱ्यांचे खरे शत्रू होते, ज्यांनी शेतकऱ्याला दलालांच्या दावणीला बांधले, तेच आता शेतकरी आंदोलनाच्या आडून गळे काढत आहेत.

भाजप सरकारने जेव्हा शेतकर्यांसाठी थेट बाजाराची दारे उघडली, तेव्हा हेच विरोधक गोंधळ घालायला पुढे आले होते. कारण, त्यांनी उभारलेली दलालांची साखळी मोडली जाते, त्यांचा काळाबाजार संपतो आणि शेतकरी यापुढे त्यांच्यावर अवलंबून राहणार नाही, हेच त्यांना पचत नाही! 'ई-नाम'च्या नव्या विस्तारामुळे शेतकर्यांना गव्हाचे पीठ, बेसन, हिंग, ड्रॅगन फ्रूट, चणा सत्तू, वाळलेली तुळस व मेथी यांसारख्या उत्पादनांना थेट बाजार मिळेल. या दहा वस्तूंना 'ई-नाम' मंडईमध्ये समाविष्ट केल्याने एकूण २३१ कृषीमाल आता या मंडईमध्ये मिळणार आहे. यामुळे मधले दलालांची मुजोरी नाहीशी होऊन, शेतकर्याच्या खिशात अधिक पैसा जाईल. यामुळे शेती अधिक फायदेशीर होईल आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्याही सक्षम होण्यास साहाय्य होईल. विरोधकांनी अनेक दशके शेतकर्यांना झुलवत ठेवले. पण, मोदी सरकारने शेतकर्यांना आत्मनिर्भर बनवण्याचे ठरवले आहे. 'ई-नाम'च्या माध्यमातून शेतकरी पारंपरिक बाजाराच्या जोखडातून मुक्त होत, देशभरात थेट व्यापार करू शकणार आहे. देशातील शेतकरी जागृत आहे, तो आता कोण स्वार्थासाठी बोलतो आणि कोण खरोखर मदतीचा हात देतो, हे चांगलेच ओळखून आहे. त्यामुळे, विरोधकांनी कितीही आकांडतांडव केला, तरी सुज्ञ शेतकरी आता भुलणार नाही हेच खरे!

स्मार्ट इंडिया, स्मार्ट शेतकरी भारताची ओळख कृषिप्रधान देश अशी असली, तरीही शेतीचे आधुनिकीकरण ही दीर्घकाळ टाळाटाळ केलेलीच बाब. २०१४ सालानंतर मोदी सरकारने शेतीच्या आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले. शेतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर हा त्यातीलच एक भाग. शेतीच्या आधुनिकीकरणाचा ध्यास घेतलेल्या मोदी सरकारने, 'डिजिटल ग्रीकल्चर मिशन'च्या अंतर्गत जवळपास अडीच कोटी शेतकर्यांना डिजिटल ओळखपत्रे तयार करून दिली आहेत. हे केवळ कागदावरचे काम नाही, तर भारतातील शेती क्षेत्रात मोठा बदल घडवणारी एक महत्त्वकांक्षी योजना आहे. यामुळे सरकारी योजनांचा थेट लाभ शेतकर्यांना मिळणार असून, पंतप्रधान कृषी सन्मान निधी, पीक विमा आणि अनुदानासारख्या इतर योजनांचा त्यात समावेश असेल. आधुनिक तंत्रज्ञानामुळे ही मदत अडथळ्यांशिवाय थेट शेतकर्यांच्या खात्यात जमा होईल. शेतकऱ्यांची ओळखपत्रे डिजिटल असल्यामुळे, बँकांकडून कर्ज घेणे, विमा प्रक्रिया किंवा शेतीसाठी आर्थिक मदत मिळवणे सोपे होईल. दस्तऐवजांची गरज कमी होईल आणि प्रक्रियेतील पारदर्शकताही वाढेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, शेतीसंबंधी सर्व महत्त्वाची माहिती डिजिटल स्वरूपात राहील. म्हणजे, शेतजमिनीच्या नोंदी, पीकपद्धती, अनुदानाची नोंद यामध्ये पारदर्शकता येईल आणि गैरव्यवहारही टाळले जातील. डिजिटल कृषी विकास हा फक्त एका योजनेपुरता मर्यादित नाही, तर ती अखंड चालणारी प्रक्रिया आहे. भविष्यात ही योजना महत्त्वाची भूमिका बजावेल. या मिशनच्या अंतर्गत भारताचा शेतकरी जागतिक स्तरावर नक्कीच स्पर्धात्मक होईल यात शंका नाही. काही वर्षांपूर्वी 'डिजिटल इंडिया' या भूल थापा असून, हे काही भारतात शक्य होणार नाही, असे सांगणार्या विरोधकांचे देशातील डिजिटल क्रांतीने डोळे दिपावले गेले आहेत. एकेकाळी या 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमाची खिल्ली चिदंबरमसारख्या नेत्यांनीदेखील उडवली होती. मात्र, आज 'डिजिटल इंडिया'चा प्रभाव सर्वच क्षेत्रात जाणवू लागला आहे. आज डिजिटल क्रांतीमुळे शेतीही आधुनिक आणि सक्षम होत आहे. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा पर्यायाने शेतकर्यांचा थेट सहभाग वाढत आहे. हे बदल म्हणजे फक्त विकासाची सुरुवात असून, 'आत्मनिर्भर भारता'च्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे!


# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३६)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

मा रवींद्रनाथ टागोरांना आपण थोर कवी, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ आणि एक महान प्रतिभाशाली व्यक्तिमत्व म्हणून ओळखतो. त्यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाला नोबेल पुरस्कार मिळाला हेही आपल्याला माहीत असते आणि आपले राष्ट्रगीत जनगणमन हे त्यांनी लिहिले हेही आपण जाणतो. परंतु यापलीकडे जाऊन रवींद्रनाथांची ओळख एक रोमारोमात देशभक्ती असलेली व्यक्ती म्हणूनही आहे हे आपल्याला फारसे माहिती नसते. त्यांचा देशाभिमान, स्वराज्य आणि स्वदेशी बद्दलचे असलेले प्रेम आणि त्याचा आपल्या जीवनामध्ये अवलंब करणारे महान व्यक्तिमत्व म्हणून परिचय करून देण्याचा प्रयत्न या लेखामध्ये आहे.

रवींद्रनाथांच्या जडणघडणीत त्यांच्या कुटुंबाची असलेली पार्श्वभूमी अतिशय महत्त्वाची आहे. त्यांचे आजोबा द्वारकानाथ ठाकूर म्हणजे कलकत्त्यातील अतिशय प्रभावशाली असे व्यक्तिमत्व होते. 'राजा' या उपाधीने त्यांचा गौरव केला जात होता. प्रसिद्ध समाज सुधारक राजा राममोहन राय यांच्या सती विरोधी मोहिमेत त्यांचा सहभाग होता. रवींद्रनाथांचे वडील देवेंद्रनाथ हे अत्यंत सचोटीने वागणारे आणि ऋषितुल्य जीवन जगणारे व्यक्ती होते. त्यामुळे लोक त्यांना महर्षी याच नावाने ओळखत. रवींद्रनाथांच्या जोराशंको या वाड्यात अनेक नामवंत कलाकार, गायक, लेखक, तत्त्वज्ञ आणि त्या काळातील प्रतिष्ठित लोक हजेरी लावीत. त्यामुळे संगीत, नृत्य, नाट्य इ. कला आणि त्यासोबतच देशप्रेमाचे संस्कार लहानपणापासूनच त्यांच्या मनावर झाले. त्यांचे वंदे मातरम आणि आनंदमठ ही कादंबरी देशप्रेमाची प्रेरणा देणारी होती. या सगळ्या वातावरणात रवींद्रनाथ स्वतःला अलिप्त ठेवू शकले नाहीत. स्वातंत्र्यलढ्याशी ते आपोआप जोडले गेले. अनेक स्वातंत्र्य लढ्यात पुढाकार घेऊन काही चळवळीचे नेतृत्वही त्यांनी केले. ज्या-ज्या वेळी प्रसंग आला. त्या-त्या वेळी इंग्रजांवर सडकून टीका करण्याचे रवींद्रनाथांनी सोडले नाही. इंग्रजांनी भारतीयांचे स्वत्वच नाहीसे केले याचा संताप त्यांच्या उरात दाटला होता. खरंतर तो स्वातंत्र्यापूर्वीचा काळ इंग्रजांचा विरोध करणाऱ्यांसाठी अत्यंत धोकादायक होता. अशा परिस्थितीतही रवींद्रनाथांनी वेळ पडली तेव्हा इंग्रजांना आणि प्रसंगी आपल्याकडील काँग्रेसच्या पुढाऱ्यांना खडे बोल सुनावले होते. याचे एक उदाहरण पु.ल. देशपांडे यांनी आपल्या रवींद्रनाथ: तीन व्याख्याने या पुस्तकात दिले आहे. १८८४ मध्ये काँग्रेसचे नेते इंग्रजांसमोर agitation करायला चालले होते. त्याबद्दल लिहिताना रवींद्रनाथ म्हणतात, इंग्रजांसमोर agitate करायला जायचं काय? रस्त्यातून चालताना समोरून इंग्रज आला की आम्ही संकोचून बाजूला होऊन त्याला मोकळी वाट करून देतो. ऑफिसात इंग्रज मालकाच्या शिव्या सहन करतो. त्याच्या घरात गेलो, तर त्याला मायबाप म्हणून त्याच्या पायाशी उमेदवारी करतो. त्याचाच खानसामा एखादा रसूल बक्ष असतो त्याला सलाम खा-साहेब चाचा म्हणून खुश ठेवतो. सरकारी बागेत आम्ही बाकावर बसलो तर इंग्रज आमचं मानगुट धरून उठवायला लागतो. इंग्रज त्याच्या क्लबात आम्हाला प्रवेश करू देत नाही. आगगाडीत इंग्रजांचे डबे निराळे, gentleman या शब्दाचा अर्थ इंग्रज आणि बाबू म्हणजे शाई जीवी भित्रा (कारकून) असाच तो करतो. इंग्रज आमच्या प्राण्यांची किंमत त्याच्या ताटात पडणाऱ्या पशूच्या प्राणाहूनही कमी मानतो, आमच्या घरात येऊन आमचा अपमान करून जातो. आम्ही त्याला उत्तर देऊ शकत नाही. अशा इंग्रजांपुढे agitate करायला जाऊन आम्ही त्याला सांगणार आहोत की आम्हाला तुमच्या जोडीने बसायचं आसन द्या. इंग्रजांशी बरोबरी करायची मागणी करायला हात जोडून त्याच्या पुढे जायचं हा कसला तमाशा? हे सगळं लिहिलं तेव्हा रवींद्रनाथ केवळ २४ वर्षांचे होते. रवींद्रनाथांचं स्वभाषेचे प्रेम केवळ बोलण्यापुरतं नव्हतं त्यांना स्वतःला उत्तम इंग्रजी येत असूनही त्यांनी फक्त बंगालीतूनच लिहिणं आणि बंगालीतूनच भाषण करणं पसंत केले. अनेक पाश्चात्य कवींच्या कविता त्यांनी आपल्या देशवासीयांना उत्तम साहित्याची माहिती व्हावी म्हणून बंगालीत भाषांतरित केल्या. संस्कृत मंत्रातली सुंदरता लक्षात यावी म्हणून अनेक संस्कृत मंत्रांचं बंगालीत भाषांतर केलं. तुकारामांच्या काही मराठी अभंगांचं बंगालीत भाषांतर केलं. त्यांचं इंग्रजांशी असणारं वैर इंग्रज माणसांच्या त्यांनी आपल्या देशावर आणि देशबांधवांवर केलेल्या अन्यायाविरुद्ध होतं. सामान्य इंग्रज माणूस त्यांचा शत्रू नव्हता. साधारणपणे १९०७-०८ मध्ये रवींद्रनाथ हे सक्रिय राजकारणापासून दूर झाले तरी देखील संपूर्ण देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला कलाटणी देणार्या वंगभंग विरोधी चळवळीचे नेतृत्व सुरुवातीला त्यांनी केले होते. त्या आंदोलनाच्या सुरुवातीला त्यांनी दोन देशभक्तीपर गीत रचनाही केल्या होत्या. त्यांचा वंगभंगविरोधी आंदोलनात




असलेला पुढाकार म्हणजे कर्झनच्या दडपशाही वृत्ती विरोधातली तीव्र प्रतिक्रिया होती. पण ही प्रतिक्रिया एकाएकी आलेली नव्हती. कारण त्यापूर्वीही जवळपास २०-२२ वर्षे रवींद्रनाथ स्वातंत्र्यासाठी सुरू असणाऱ्या विविध चळवळींमध्ये आणि लढ्यांमध्ये सहभागी होते. १८९७ मध्ये इंग्रज सरकारने लोकमान्य टिळकांवर राजेद्रोहाचा खटला दाखल केला. त्यावेळी रवींद्रनाथांनी बंगालमध्ये लोकमान्य टिळकांच्या बचावासाठी पुढाकार घेऊन त्या चळवळीचे नेतृत्व केले. लोकमान्य टिळकांच्या बचावासाठी निधी जमवण्यात त्यांनी पुढाकार घेतला. नंतर लोकमान्य टिळकांना जेव्हा अठरा महिन्यांची शिक्षा झाली, तेव्हा लोकांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली. लोकांचा हा विरोध मोडून काढण्यासाठी सरकारने १८९८ मध्ये सेडिशन बिल तयार केले. इंग्रज सरकारच्या या गोष्टीचा जाहीर सभांमध्ये विरोध होऊ लागला. अशाच झालेल्या एका सभेत कलकत्त्यामध्ये रवींद्रनाथांनी 'कंठरोध' या नावाचा जहाल लेख लोकांसमोर वाचून दाखवला.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री लोकांना सांगितली. तिचाच अवलंब पुढे महात्मा गांधींनी केला. या चतु:सूत्रीची बंगालमध्ये सुरुवात करणाऱ्यांमध्ये रवींद्रनाथ अग्रभागी होते. कलकत्त्यामध्ये त्यांनी त्यासाठी स्वदेशी वस्तू भांडार सुरू केले. तिथे होणाऱ्या सार्वजनिक सभांमध्ये इंग्रजीचा वापर न करता बंगालीचा वापर करावा असा आग्रह धरला.

इंग्रजांनी आपले राज्य करताना फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब केला. यावेळी लॉर्ड कर्झन हा भारताचा व्हाईसरॉय होता. इंग्रज सरकारने हिंदू आणि मुसलमानांची वस्ती असलेल्या बंगालची राज्यकारभाराच्या सोयीसाठी म्हणून दोन भागात फाळणी करण्याचा निर्णय घेतला. पण इंग्रज सरकारचा अंतस्थ हेतू वेगळाच होता. हिंदू आणि मुसलमानात फूट पाडण्याचा त्यांचा डाव होता. या बंगालच्या फाळणी विरोधात लोकांमध्ये प्रचंड असंतोष होता. त्यासाठी आयोजन केले गेले. या सभेत फाळणीचा निषेध करून स्वदेशीची शपथ सर्वांनी घेतली. 'वंदे मातरमचा' जयघोष सर्वांच्या मुखी निनादू लागला. वंगभंग विरोधाची चळवळ ही केवळ बंगाल पुरती मर्यादित न राहता तिला देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले. १६ ऑक्टोबरच्या दिवशी हजारो लोक गंगा नदीच्या काठावर जमले आणि बंधूभावाचे प्रतीक म्हणून एकमेकांना राखी बांधू लागले. वंदे मातरमचा घोष सर्वत्र निनादत होता. या जनसमुदायाच्या अग्रभागी होते रवींद्रनाथ. या ठिकाणी वंगभंग आंदोलन विरोधी एक सभा घेण्यात आली. या सभेत रवींद्रनाथांनी लिहिलेले एक नवीन गीत प्रार्थनेच्या स्वरूपात गायले गेले. या गीताचे शब्द होते...

बांगलार माटी, बांगलार जल, बांगलार वायू, बांगला फल पुण्य होउक, पुण्य होउक, पुण्य होउक, हे भगवान.

हे गीत स्वतः रवींद्रनाथ आपल्या पहाडी आवाजात गात होते आणि हजारो लोक त्यांच्या सुरात सूर मिसळून गात होते. रवींद्रनाथ हे या दिवसाचे खरे नायक ठरले.

बंगालच्या फाळणीनंतर झालेली मुस्लिम लीगची स्थापना आणि हिंदू मुस्लिमात वाढत जाणारी दरी यामुळे रवींद्रनाथांचे संवेदनशील मन कमालीचे अस्वस्थ झाले होते. पुढे या स्वातंत्र्यासाठी होणार्या चळवळीत अरविंद घोष देखील सामील झाले. अरविंद घोष यांच्यासारख्या महान व्यक्तीच्या आगमनाने स्वातंत्र्य चळवळीला आणि वंगभंग विरोधी आंदोलन चळवळीला एक योग्य नेता मिळाला असे रवींद्रनाथ यांना वाटले आणि राजकीय चळवळीतून निवृत्त होण्याचा त्यांनी निर्णय घेतला. असे असले तरी रवींद्रनाथ हे बंगाली जनतेच्या हृदयाचे अनभिषिक्त सम्राट होते.

१९११ च्या डिसेंबर महिन्यात कलकत्ता येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात त्यांनी जन-गण-मन हे गीत सादर केले. जन-गण-मन हे गीत लोकांसमोर सर्वप्रथम येण्याचा हा ऐतिहासिक दिवस होता. त्यांच्या काव्य प्रतिभेने सर्वच लोक प्रभावित झाले होते. त्यांनी लिहिलेल्या जन-गण- मनमध्ये असलेला 'भारत भाग्यविधाता' कोण? तर या देशाचा भाग्यविधाता कोणी ब्रिटिश राजा नव्हे तर खुद्द ईश्वर आहे हे मी सांगतो अशी रवींद्रनाथांची स्पष्ट भावना होती.

रवींद्रनाथांना नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर इंग्रज सरकारने त्यांचा गौरव करण्यासाठी १९१५ मध्ये त्यांना 'सर' हा किताब दिला. पण जेव्हा जनरल डायरने जालियनवाला बाग हत्याकांडात निष्पाप लोकांचे बळी घेतले हे रवींद्रनाथांना समजले तेव्हा ते कमालीचे अस्वस्थ झाले. त्यांनी या हत्याकांडाचा वैयक्तिक पातळीवर तीव्र निषेध तर केलाच पण त्याबद्दलचे आरोपपत्र तयार करून ते व्हाईसरॉय लॉर्ड चेमस्फर्ड यांना पाठवले आणि ब्रिटिशांनी दिलेली 'सर' ही पदवी परत केली. रवींद्रनाथ आपल्या आयुष्यातील अखेरच्या घटका मोजत असताना त्यांनी इंग्लंडमधून आलेल्या मिस एलिनोर राथबोन या बाईंच्या पत्राला अत्यंत जळजळीत उत्तर दिलं. ते पत्र बहुतेक सर्व इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालं होतं. त्या पत्रात ते लिहितात, आम्ही ब्रिटिशांबद्दल कशासाठी कृतज्ञता बाळगायची? आम्हाला भाकरी देणं जमत नसलं तरी कायदा आणि बेड्या यांचं रक्षण केलं म्हणून? चारी बाजूला पहा दंगेधोपे, दडपशाही. हवे तितके लोक ठार मारले जात आहेत. आमची संपत्ती लुटली जाते आहे. बायकांच्या जीविताला धोका. तरीही शक्तिमान इंग्रज त्यांच्या संरक्षणासाठी जराही हालचाल करीत नाही. उलट आम्हालाच आमच्या कुटुंबाचं रक्षण करता येत नाही अशी परदेशात बसून आरडाओरड करतो आहे. आमच्या देशातला दरिद्री, नि:शस्त्र शेतकरी- रडून आक्रोश करणार्या मुलाबाळांच्या भाराने वाकून गेलेला शेतकरी, हजारो गुंडांपासून आपलं संरक्षण न करू शकल्यामुळे जीवाला भिऊन पळतो आणि इंग्रजी सरकारी अधिकारी त्याची भयग्रस्त अवस्था पाहून फिदीफदी हसत आहेत. या सगळ्या गोष्टीतून त्यांच्यातील निर्भिडपणाचा आणि जाज्वल्य देशभक्तीचाच प्रत्यय आपल्याला येतो. ापल्या आयुष्याच्या पुढील काळात रवींद्रनाथ जरी राजेकीय क्षेत्रात सक्रिय सहभागी नसले तरी त्यांनी साहित्य आणि शिक्षणासहित विविध क्षेत्रात जे काही कार्य केले त्यातून त्यांची जाज्वल्य देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, स्वदेशी आणि स्वभाषेबद्दलचे प्रेमच प्रकट होते.

# ग्रहसंकेत

(रविवार, २ मार्च ते शनिवार, ८ मार्च २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार,** २ मार्च- चक्रेश्वर यात्रा टिटवे, भैरवनाथ जागर मळगे बुद्रुक, रमजान मासारंभ, रामकृष्ण क्षीरसागर महाराज जयंती नगर ✻ **सोमवार, ३ मार्च-** विनायक चतुर्थी, जागतिक वन्यजीव दिन, छत्रपती संभाजीराजे धर्मवीर दिन धर्मवीर गड, श्री गणेश उत्सव मळण (गुहागर), धर्ममठ यात्रा जुनवाड, बसवेश्वर रथोत्सव शेडबाळ ✻ **मंगळवार, ४ मार्च-** राष्ट्रीय सुरक्षा दिन, महर्षी याज्ञवल्क्य जयंती, बिरदेव यात्रा मसूर, शिरकाई देवी यात्रा तारदाळ, उघडनाथ महाराज पुण्यतिथी शिगांव ✻ **बुधवार, ५ मार्च-** दत्त महाराज समाधीकाल अष्टा, कुलस्वामिनी उत्सव अणसूर ✻ **गुरुवार, ६ मार्च-** पूज्य गोळवलकर गुरुजी जयंती (तिथीप्रमाणे) ✻ **शुक्रवार, ७ मार्च-** दुर्गाष्टमी, परमहंस श्री योगानंद पुण्यदिन, श्री भैरवनाथ यात्रा नागराळे, कैवल्याश्रम स्वामी पुण्यतिथी कणकवली ✻ **शनिवार, ८ मार्च-** जागतिक महिला दिन, बिरदेव यात्रा रेंदाळ, श्री जानाई देवी यात्रा निवकणे (पाटण)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २, ७ मार्च ✻ **डोहाळ जेवण-** ३ मार्च (१८ नंतर), ७ मार्च ✻ **बारसे-** २ मार्च ✻ **जावळ-** २ मार्च (९ नंतर), ७ मार्च ✻ **गृहप्रवेश-** २, ६ मार्च (११ पर्यंत )

### मेष :- घाईने निर्णय नकोत

सगळेच विषय सांभाळणारी वही रफ म्हणून ओळखली जाते. कुटुंबातील जबाबदार व्यक्तीची पण अशीच अवस्था असते. धनस्थ गुरुमुळे आर्थिक विकासाच्या संधी लाभतील. शिक्षण व अनुभवातून चांगली प्रगती साधता येईल. उत्साह, धडाडी वाढणार आहे. नव्या कामांना गती देता येईल. उद्दिष्ट साध्य करू शकाल. घाईने निर्णय नकोत. शुभ ता. ४, ७

### वृषभः- अपेक्षित संधी लाभतील

आपण कोणाला फसवलं नाही, याचा आनंद लांब काळापर्यंत राहतो. राशीतील गुरुमुळे आपला मार्ग चांगलाच राहील. खर्चाचे प्रसंग वाढले, तरीही प्राप्तीही तशी चांगली होत राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. संततीबाबत शुभ घटना घडतील. प्रतिकूलतेवर मात कराल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. २, ४

### मिथुनः- नव्या कामांना गती

भविष्य चांगले घडविण्यासाठी आज भरपूर कष्ट करावे लागतील. राशीतील मंगळामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. अशक्य काही वाटणार नाही. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. चिकाटीने प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात मतभेदाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. २, ७

### कर्कः- आर्थिक स्थितीत सुधारणा

आज चुका करून सभ्यतेचे डोंग घेणारा योग्य ठरत असतो. अष्टमात शनि तर व्ययात मंगळ यामुळे उडदा मागे काळे-गोरे नीट पारखून घ्या. एकाच चेहर्यात अनेक चेहरे लपलेले अथवा लपविलेले असतात. नीट पारखून व्यवहार करावेत. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २, ७

### सिंहः- अनुकूलता वाढेल

माणूस पोटापुरता स्वार्थी असावा, पण कोणाचे जीवन बरबाद होण्यासाठी कपटी नसावा. कर्मस्थ गुरु लाभातील मंगळ लाभदायक आहेत. नोकरी व्यवसायात नव्या संधी लाभतील, लाभ घ्यावा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. व्यर्थ चिंता करू नका. कौटुंबिक जीवनात व्यथा संभवतात. अनावश्यक खर्च टाळावा. विलंबाने पण चांगल्या घटना घडत जातील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ७

### कन्याः- प्रगतीच्या संधी लाभतील

शब्दांपेक्षा काही तिखट नाही आणि मौनासारखं उत्तम साधन नाही. कर्मस्थ मंगळामुळे कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. वैद्यकीय, संरक्षण, कृषी अशा क्षेत्रात असणार्यांना विशेष अनुकूलता राहील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. अडचणींवर मात कराल. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. २

### तुलाः- नव्या विचारांना चालना

घरात संपत्ती नांदली म्हणून सुख नांदेलच असं नसते, मनात समाधान असणे जास्त महत्त्वाचे असते. प्रगतीच्या संधी लाभतील. लाभ उठवावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रकृतीच्या तक्रारींची वेळी दखल घ्यावी. अपेक्षित कामे मनासारखे होतील. वादाचे प्रसंग टाळावेत. अचानक प्राप्ती वाढेल. अडचणी सुटतील. शुभ ता. ४, ७

### वृश्चिकः- नव्या कामांना गती

कठीण प्रसंगात न मागता मिळालेली साथ नेहमीच मोलाची ठरते. चौथा शनी, आठवा मंगळ यामुळे शारीरिक तक्रारी संभवतात. प्राप्तीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. कलेतून अर्थाजन घडेल. नवे विचारपूर्वक मार्गी लावावेत. समस्या संभावतात. शुभ ता. २, ७

### धनुः- प्रतिकूलतेवर मात

चेहरा साप, मन मे दाग, सामने ताली, पीछे गाली असा लोकांचा रिवाज आहे. सावधान, सप्तमात मंगळ असल्याने कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. प्रतिकूलतेवर मात करू शकाल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ४, ७

### मकरः- अनुकूलता वाढेल

चांगल्या सोबत चांगलेच व्हा, पण वाईटाशी वाईट नाही. धनात शनि, षष्ठात मंगळ त्यामुळे चिकाटी व धडाडीने विविध कामे मार्गी लावता येतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. स्पर्धांमध्ये सहभाग घ्या. यशस्वी व्हाल. केलेली गुंतवणूक शुभ फलदायी ठरेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ४, ७

### कुंभः- नव्या कामांना गती

आयुष्याचा मार्ग निवडताना आई-वडिलांचे मत नक्की घ्या. त्यांचा अनुभव मोठा असतो. राशीत राशी स्वामी शनी आहे. त्यामुळे चिकाटीने चांगले मार्गक्रमण करू शकाल. नव्या कामाला गती मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रगतीच्या घटना घडतील. गायन, वादनादि कलेत प्रगती घडेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ७

### मीनः- चांगल्या संधी लाभतील

कोणी माझे वाईट केलं तर ते त्याचे कर्म आहे. कोणाचेही नुकसान न करणे हे माझे कर्तव्य आहे. चौथा मंगळ, बारावा शनी यामुळे कितीही प्रतिकुलता वाढली, तरी कर्तव्य धर्म सोडू नका. विचाराने रहा, म्हणजे योग्य मार्ग निघत जाईल. अडचणीतून मार्ग निघेल. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ४

!! शुभ भवतु !!



# पालेभाज्यांचे औषधी उपयोग

आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

आपल्या जीवनात पालेभाज्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी शरीर यंत्राला हवा, पाणी, उष्णता तसेच सकस व समतोल आहाराची गरज असते. आपला आहार, आचार व विचार 'निर्सगाच्या नियमाप्रमाणेच ठेवणे आवश्यक आहे. भाजीपाला म्हणजे रोगांपासून रक्षण करणारी ढाल आहे. भाज्यापाल्यात 'ब' जीवनसत्व अधिक प्रमाणात असते. तसेच कॅल्शियम, सोडियम, क्लोरीन आदी उत्तम खनिज पदार्थ असतात. हे क्षार दुसर्या कोणत्याही आहारातील पदार्थातून मिळत नाहीत. ह्या क्षाराच्या अभावी काही दुखणी व विशेषतः मलावरोध ह्यांचा उपद्रव सुरू होतो, अशी परिस्थिती येऊ नये ह्यासाठी पालेभाज्या खाणे आवश्यक आहे. भोजनात किमान ५० टक्के फळ व पालेभाज्या असणे आवश्यक आहे.

भाज्यांचे मुख्य कार्य म्हणजे अन्नाचे पचन करून बाकी राहिलेला चोथा शरीरातून बाहेर काढण्याचे असते. त्यामुळे कोठा साफ राहतो. शिवाय जीवनसत्त्वांची उणीव भरून काढण्यासाठी त्याचा उपयोग कोशिंबिरीच्या रुपाने पण करता येतो. पालेभाज्यात माठ, तांदुळजा, मेथी, चाकवत आदी पालेभाज्या उत्तम आहेत. शरीर स्वास्थ्यासाठी आहारात पालेभाज्यांचा जसा उपयोग होतो तसेच विविध पालेभाज्यांचा विविध आजारावर चांगला उपयोगही होतो. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पालेभाज्यांचा आहारात उपयोग केला जातो. साधाच पण सकस आहार, मोकळी हवा, यामुळे ग्रामीण जीवनातील लोक शरीराने सुदृढ असतात. शहरातील लोकांनीही नित्य आहारात फळभाज्या व पालेभाज्या घ्याव्यात तसेच किरकोळ आजारांवर या पालेभाज्यांचा घरगुती औषधोपचार म्हणून उपयोग करावा.

**औषधींचे ज्ञान हवेः-** पालेभाज्यांचे कितीतरी औषधी उपयोग आहेत. पण कित्येकांना ते माहीत नाहीत. अशा वनौषधीचे, वनस्पतीचे ज्ञान सर्व जनतेपर्यंत नेण्याचा हा प्रयत्न आहे. जनतेने हे ज्ञान यथाशक्ती आत्मसात करून उपयोगात आणावे. तसेच इतरांनाही द्यावे. घरोघरी 'आजीबाईचा बटवा' सुरू होण्यासाठी वनौषधीची ओळख व त्यांचे औषधी उपयोग जनतेला होणे आवश्यक आहेत. दूरदर्शनवर 'घरेलु नुस्खे' सांगितले जातात. आकाशवाणीच्या केंद्रावरून 'घरोघरी धन्वंतरी' या मालेत विविध औषधी वनस्पतींची माहिती दिली जाते. वृत्तपत्रांतून, विविध मासिकांतून हे ज्ञान जनतेपर्यंत जावे, विद्यालयातील मुला-मुलींनाही वनौषधींचा परिचय याच वयात करून दिला जावा. वनौषधींचे ज्ञान जनतेपर्यंत गेले तर अशा वनौषधींचे संरक्षण व संवर्धनही होई. त्यामुळे वृक्षारोपणाच्या कार्याबरोबरच आयुर्वेद प्रसाराचे कार्यही होईल. असो!

**पालेभाज्यांचे औषधी उपयोगः-**

**अळूः-** अळूच्या पानाच्या तळलेल्या वड्या सर्वांनाच आवडतात. अळूच्या पानाचे भजेही केले जातात. भारतात सर्वत्र पाणथळ भागात येणारी अळू ही वनस्पती असून पाने, देठ व कंद उपयोगी अंग आहेत. अळूचे अग्निदीपक, मलावष्टभक व बल वाढविणारे असे गुणधर्म आहेत.

अळूच्या पानापासून शेंगदाणे, चिंच आदी घालून मरगटी भाजी केली जाते. देठाचीही भाजी करतात. कंदाची उकडून भाजी करतात.

**औषधी उपयोगः-** कृमीवर, रान अळूचा कांदा, भाजून त्याची राख पाण्यातून द्यावी. पित्तावर अळूच्या पानाचा रस जिरेपूड घालून द्यावा, फोड फुटण्यास अळूचे देठ जाळून त्याची राख तेलातून लावावी. कर्णपीडेवर पांढऱ्या अळूचा रस दोन थेंब कानात घालावा. केस गळत असल्यास काळ्या अळूच्या कांद्याचा रस डोक्यास चोळावा. याने केस गळणे थांबते व नवीन केस येतात. भगंदर विकारात अळूची भाजी किंवा अळुचे सांबर रोज भोजनात घ्यावे. नारू विकारावर अळुचा कंद वाढून २० ग्रॅमची चकती करून नारूवर बांधावी. सात दिवसात नारू बाहेर पडतो. लहान मुलाच्या आईने रोज अळूची भाजी थोड्या प्रमाणात खावी. त्यामुळे बाळासाठी भरपूर दूध येते.

**पालकः-** पालकाची भाजी पावसाळ्यात भारतात सर्वत्र होते. मधुर, पथ्यकर शीतल वातळ, ग्राहक, भेदक आदी पालकाचे गुणधर्म आहेत. दमा, कफ, रक्तपित्त, विषदोष आदी विकारावर पालकाची भाजी उपयुक्त आहे. ही भाजी लवकर पचते. आतड्याच्या रुग्णांनी पालकाची भाजी नियमीत खावी.

**औषधी उपयोगः-** घशाची आग, श्वासनलिका सूज या आजारात पालकाच्या रसाने गुळण्या कराव्यात. मुतखड्यावर पालकाच्या पानांचा रस १० ग्रॅम द्यावा. करट, गळू यावर पालकाची भाजी वाटून बांधावी. त्यामुळे गळू लवकर फुटते. उदर शुध्दीसाठी पालकाची कच्ची भाजी दह्याबरोबर खावी. खरुज, गजकर्ण वगैरे त्वचारोगावर, पालकाच्या बियांचा समभाग खसखसीव बोंड घेऊन एकत्र वाटून लावावे. आतड्यातील गोल कृमीवर पालकाच्या बिया १० ग्रॅम, वावडिंग २ ग्रॅम टाकून घ्याव्यात. पालकाची भाजी सारक असून ती ज्वराच्या रुग्णांना व अशक्त




लोकांनाही देता येते. तसेच पांडुरोग, शोथ, रक्तपित्त आदी विकारावरही उपयोगी आहे.

**तांदुळजाः-** तांदुळनाची भाजी सर्वांना हितकर आहे. तांदुळजाच्या पुष्कळ जाती होतात. माठाची भाजी हा तांदुळजाचा प्रकार आहे. भारतात सर्वत्र होणारी ही भाजी असून पाला व मूळ हे उपयोगी अंग आहेत. तांदुळजा मधुर, शीतल, रुचकर, अग्निदीपक, पथ्यकर सारक आहे.

**औषधी उपयोगः-** अग्निदग्ध व्रणावर तांदुळजाच्या पाल्याचा रस लावावा. प्रदर रोगात तांदुळजाचे मूळ तांदूळाच्या धुवणात आळून द्यावे. कोणत्याही विषावर याचे मूळ उगाळून देता येते. तांदुळजाच्या भाजीने कोठ्यातील उष्णता कमी होते. लहान मुलांच्या आगपैणवर तांदुळजाची पाने व दुर्वा वाटून लेप करावा.

**मेथीः-** मेथीच्या रोपाची उंची वीत-दीड वीत असते. मेथीचे बी मसाल्यात वापरण्यासाठी आणि पाला पालेभाजी म्हणून उपयुक्त आहे. भारतात सर्व होणारी भाजी असून पाला तसेच अंग आहे.

मेथीचे तिखट, उष्ण, पित्तकारण, मलस्तंभक, दीपक, लघु, बलकारक आदी गुणधर्म असून वात रक्त, ज्वर, कफ, खोकला, क्षय, वायू, कृमी मुळव्याध आदी विकाराचा नाश करणारी आहे.

**औषधी उपयोगः-** अंगातून हातापायातून कळा येतात. तेव्हा रोज एक मेथीचा लाडू खावा. बाळंतिणीस शक्ती येण्यासाठी रोज एक मेथीचा लाडू खाण्यास द्यावा. सर्व रुग्णांना मेथीची भाजी पथ्याला चांगली आहे. आव, मुरडा, यावर मेथीच्या भाजीचा ५ तोळे रस खडीसाखर घालून प्यावा. रक्तातिसारावर मेथीच्या रसात काळी द्राक्षे कोळून प्यावीत. बद, गाठ यावर सुक्या मेथीच्या बिया वाटून लेप करावा. श्वेत प्रदर (पांढरी धुपणी) यावर मेथीच्या बियांचे चूर्ण ५ ग्रॅम तितक्याच गुळासोबत २१ दिवस द्यावे. आमवात, उन्हाची झळ, बहुमुत्र आदी विकारावरही मेथीची भाजी उपयोगी आहे. मिठाची केलेली मेथीची भाजी व गरम भाकरी चवीला फारच छान लागते. 'भाजीत भाजी मेथीची माझ्या प्रितीची...हा पतीने पत्नीचे नाव घेण्याचा उखाणा सर्व पतीदेवांना नाव घेण्यास सुटसुटीत सोपा आहे.

**शेपूः-** शेपूस संस्कृतमध्ये शतपुष्पा म्हणतात. भारतात सर्वत्र होणारी ही भाजी असून पंचांग हे उपयोगी उग आहे, स्निग्ध, कडू, तिखट, दीपक, उष्ण पाचक, पथ्य, दुग्धवर्धक, वायू, गुल्म, शूळ, ताप यांचा नाश करणारी ही भाजी आहे.

**औषधी उपयोगः-** शेपू कफ, वात, शूळ, दाह, दिपा, वांती अतिसार यावर उपयुक्त असून अपचन व पोटदुखीवर शेपू वापरतात. लहान मुलांच्या अपचनाच्या विकारावर शेपूचा अर्क देतात. सर्व वात विकारावर शेपूचे तेल उपयोगी आहे. बाळंतिणीस शेपूची धुरी देण्याची पध्दत आहे. म्हणून त्यास बाळंतशेपू म्हणतात. गळू पिकण्यासाठी शेपूची भाजी वाटून गळून लावल्यास गळू लवकर पिकतो. शेपूची गरगटी भाजी चांगली लागते. वात असलेल्यांनी ही भाजी अवश्य खावी.

**अंबाडीः-** अंबाडी महाराष्ट्रात घाटावर, उष्णप्रदेशात तसेच कर्नाटक राज्यात होते. पंचांग हे उपयोगी अंग अंबाडीचे आंबट, रुचकर, सारक, आग्निदीपक आदी गुणधर्म आहेत. अंबाडीची भाजी कोवळीपणी खाण्यासाठी करतात. याच्या बियांपासून तेल काढतात. झाडे वाळल्यावर त्याचा उपयोग गुर्हाळात करतात.

**औषधी उपयोगः-** डोक्याची स्वच्छता नीट ठेवली नाहीतर डोक्या खवडे होतात. या विकारात अंबाडीच्या पाल्याच्या रसात गंधक खलून लावावे. पाण्याशी नेहमी संपर्क येत राहिला तर हातापायास जळवात, चिखल्या होतात. त्यावर अंबाडीच्या पाल्यात मीठ मिसळून त्याचा वाफारा द्यावा व गरम, असतानाच तो हातापायावर बांधावा, अजीर्णावर अंबाडीची भाजी तांदळाच्या कण्या घालून शिजवून द्यावी. अंबाडीच्या बियापासून काढलेले तेल गजकर्ण इसब इत्यादी त्वचारोगावर पान कोबी कोबी भारतात सर्वत्र होतो. पान हे उपयुक्त अंग आहे. मधुर, कडू, ग्राहक, शीतलू, पाचक, आदी गुणधर्म असून कफ, पित्त, ज्वर, कुष्ठ, खोकला, रक्तदोष, याचा नाशक आहे.

**औषधी उपयोगः-** मधुमेहाच्या रुग्णांना कच्चा पानकोबीची कोशिंबीर दिल्यास फायदा होतो. पान कोबीत 'ब' जीवनसत्व मोठ्या प्रमाणात असते. फुलकोबी (फ्लॉवर), नवलकोल, हे कोबीचेच वेगळे प्रकार आहेत. पानकोबीची भाजी शक्यतो कोशिंबीर करूनच खावी. पित्तज्वर, रक्तविकार, यावर फायदा होतो. जखमा व घाव भरून येण्यासाठी कोबीची पाने वाटून लावावी. मूळव्याध असलेल्यांनी पान कोबीची भाजी घ्यावी. त्यामुळे शौचास साफ होते. कोबीत पॉस्फरस, लोह, कॅल्शियम व 'क' जीवन सत्त्वेही भरपूर प्रमाणात. असल्याने या भाजीचा आहारात उपयोग करावा.

नवलकोल, प्रमेह व श्वासाच्या रुग्णांना गुणकारी आहे.

**चाकवतः-** चाकवत मधुर, शीत, खारट, रुचकर, सारक, पाचक, असून मल, मूत्र, शुध्द करणारी आग्निदीपक बलकर, ज्वरनाशक कृमी, रक्ताविकार, पित्त दूर करणारा आहे. कडधान्यापैकी, जे धान्य शिजविण्यास कठीण असते त्यात शिजविताना चाकवतीची पाने घालावीत म्हणजे लवकर धान्य शिजते.


अग्निने भाजून दाह झाल्यास चाकवताच रस काढून जखमेवर लावावा. मुरड्यावर दह व चाकवताची भाजी खावी.

**पाथरीः-** पाथरीची भाजी डोळ्याचे विकार, शीतक श्वानविष, मूत्रशुध्दी, जुनाट खोकला आदी विकारावर उपयोगी आहे.

**चुकाः-** चक्याची भाजी दातदुखी, विंचू दंश, आग्निमांद्य, आमवात, कफ, वात आदी उपयोगी आहे. कानदुखीत चुक्याच 'रस ४-५ थेंब कानात घालावा.

पान २ वरून

## Mrr.



मध्ये Mrr. ऋचा दिवाकरला आलेल्या अनुभवांचे आजच्या विशीतील पिढीच्या अनुषंगाने सार्वत्रिकीकरण करणे शक्य नाही, त्यामुळेच, Mrr. चा विषय जरी वास्तव असला तरी, बहुसंख्य स्त्रियांनी कोणे एकेकाळी जगलेले हे जगणे, आज विशी किंवा तिशीतल्या नवविवाहित स्त्रियांचे जगणे नाही, त्यामुळे हे आजचे वास्तव नाही. आजच्या नवविवाहित Mrr.च्या समस्यांमागे चित्रपटात दाखवलेले हे वास्तव आजच्या वास्तवातल्या नवविवाहित Mrr.च्या जगण्यातले वास्तव नाही.


७) विवाह नेमका का कशासाठी हेच उमगलेले नसणे ८) व्यसन ९) ज्या काळात परस्परांना समजून घेण्यासाठी वेळ द्यायचा, त्या काळात एकमेकांना वेळ न देणे. १०) समाजमाध्यमांवर आभासी नात्यात रमणे अशा अन्यही अनेक कारणांमुळे हल्ली घटस्फोटांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे, Mrr.

## रस्ता




रस्ता चालतो,
रस्ता पळतो
वेदना पचवुन रस्ता
हसतो
रस्त्याची नसते तक्रार
रस्ता न करी आरोप
संकुचित नव्हे व्यापक
असतो रस्ता
लांबच लांब रस्ता
रस्ता सहनशीलतेचे नाव
रस्ता सुखाचा गाव
रस्ता नाका समोर
रस्ता अद्यात न मध्यात
रस्ता सेवाभाव
रस्ता हृदयाचा ठाव
रस्ता कुठेही जात नाही
आहे तिथेच असतो रस्ता
मात्र तोच पथिकाला मंझिल
पर्यंत पोहचवितो रस्ता...
तरीही वेडयावांनी माणसं
पुसतात कुठ जातो रस्ता?
भरकटत नाही रस्ता
भरकटलेल्या जिवांना
दाखवी रस्ता
रस्ता पोहोचवे घरी
रस्ता दावी मार्ग मोक्षाचा
जीवनाचा रस्ता
परम सत्याचा रस्ता
रस्त्याची दुःखे रस्त्याला माहित
रस्त्याने खाल्लेल्या खस्ता जगी
कुणालाच नाहीत माणुस
नाही,असतो चालत रस्ता
खातो जीवाला खस्ता एकाच
वेळी अनेकांना अनेक
गावांना पोहोचवतो रस्ता
जपतो रस्ता पाऊलखुणा
रस्ता मार्गस्थ व्हायचे आपण
फक्त मागच्यांना पुसून
पुन्हा पुन्हा सोडू नये कधींही
सन्मार्गाचा रस्ता सोडला कधी
तर बांधावा लागतो अंतिम
बस्ता वाट्याला आला तो
आंनदाने चालतो रस्ता
पांथस्थांना चकवा देत नाही
रस्ता
रस्त्याचीही असतात दुःखं,
रस्त्याचं असतं सुख मुठभर
खरच सांगतो दोस्ता!
कुणाच्या रस्त्यातला दगड
झालो नाही ना कुणाचा
अडविला नाही रस्ता
कुणाच गाव किती कोस
राहीलयं हे सांगणारा रस्त्या
कडेचा मैलाचा दगड मात्र मी
झालोय
आडवळणाचा कधी धरला
नाही रस्ता
रस्ता पुण्याईची शिदोरी असते
ज्याना त्याना लाभे भलाईचा
रस्ता
नाकासमोर नाकानं चालत
राहिलो पुर्वसुरींचा रस्ता
सत्याचाच असतो ना अखेर
रस्ता
का? नाही चालत मग
जग हे पामर सत्याचा रस्ता!
हा रस्ता दुर जातो
खरंच सांगतो दोस्ता!
माझ्या कवितेलाच केलंय
हतबल वंचितांनी सन्मार्गाने
जगण्याचा रस्ता
कधी रस्त्यात भेटलोच तर
असेच भरभरुन बोलुयात
मित्रांनो!
काय माहीत कधी संपेल हा
जिनगानीचा माझ्या रस्ता.....

देवेंद्र औटी



# गणूचा वडापाव

कथा

दिलीप धायगुडे
भ्र. ७७३८०३९१९५


फक्त दहा रुपये, फक्त दहा रुपये... अशी आरोळी देत कडईतल्या तेलात पाण्याचा फटकारा मारत गणू मोठमोठ्याने जाहिरात करत होता. 'ओ साहेब, देऊ का गरम वडापाव? आत्ताच काढलाय बघा, चटणी लावू का? अहो, खाऊन तर बघा! अशा प्रेमळ शब्दात हसत- हसत गणू सर्वांना आदरानं हाक मारीत आपला व्यवसाय करत असे.

आई वडिलांना एकुलता एक. बहिणींची लग्न होऊन त्या आपापल्या सासरी गेल्या होत्या. बायको हौसा आणि गणू आणि यांचा हा वडापाव स्टॉल कोळीवाड्याच्या नाक्यावर प्रसिद्ध होता. स्वस्तात मस्त असल्याने आवडीनं खाणारी माणसंही स्टॉलवर वडापाव फस्त करीत असत. ना लाईट, ना मेणबत्ती, भिंती जवळच्या झाडाच्या बुंध्या लगत एक पाच बाय पाचचा टेबल लावून स्टोवर एकटाच वडापावची तयारी करत. रस्त्यात येणारी जाणारी माणसंही 'गणू, वडापाव झाला की नाही, म्हणून गणूला आवाज देत. फुल शर्ट, पॅन्ट आणि डोक्यावर पांढरी टोपी घालून प्रत्येक माणसाचं लक्ष वेधून घेत होता. जवळजवळ २५-३० वर्षे झाली कोळीवाड्याचा फेमस वडापाव म्हणून गणूचा बोलबाला होता. कधी कोणाकडे पैसे नसले तरी पण नंतर द्या.. काका, मामा, ओ..साहेब म्हणून डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर ठेऊन आपला व्यवसाय गणू करत होता. एके दिवशी गणूला थोडी कणकण आल्याने त्यांने आपला स्टॉल बंद ठेवला होता. वयानं पन्नाशी उलटलेल्या गणूने आपल्या स्वभावाने सर्वांची मनं जिंकत होता. गणू आजारी असताना गणूनं चार-पाच दिवस आपला धंदा बंद केला. येणारी-जाणारी खाऊके मंडळी मात्र त्याच्या मोकळ्या जागेकडे डोळे वटारून पाहत पुढे निघून जायची. आजूबाजूला विचारपूसही व्हायची. एकाच तेलात अनेक वडे तळून दहा रुपयाला एक वडापाव विकणारा गणू दिसत नसल्याने सगळे बेचैन व्हायचे. इतकी लोकांना त्याच्या वडापावची सवय झाली होती. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी वडापावसारखा धंदा जोमानं चालवणारा गणू आज खुशीत दिसत होता. रात्रीचे बारा वाजले तरी अंधारातच आपला धंदा चालू ठेवत हौसा आपला पती गणूला हातभार लावत होती, असा हा गणू आणि त्याचा वडापाव कोळीवाड्याला भुरळ घालणारा किंग बनला होता. शाळेत जाणारी मुलं, नोकरीला जाणारी तसेच कामधंद्यावर जाणारे लोकही गणूच्या वडापावची चव घेतल्याशिवाय पाय काढत नव्हती. तेलकट वडापाव खाताना आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करतोय हे कधीच खवैय्यांना कळत नसे, गणू मात्र आपला धंदा गोड बोलून करत असे.

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# आनंदाचा सापळा

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५६



ग्रीक तत्ववेत्ता अरिस्टोटल आनंदाचे विज्ञान शोधणारा पहिला मानव असावा ज्याने मानवाच्या आनंदाच्या चिरंतन पाठलागावर भाष्य केलं. अथेन्स मधील एका संस्थेत त्याने व्याख्यानांमधून आपली आनंदाची संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्याने तेव्हा श्रोत्यांसमोर प्रश्न उपस्थित केला. मानवी अस्तित्वाचे प्रयोजन काय? त्याच्या मते जगभरातील मंडळी अशा उद्दिष्टाच्या साध्यासाठी प्रयत्न करीत असतात जे स्वतःमध्ये खोलवर सामावलेलं असतं आणि ते इतरांसाठी नसतं. अर्थात फक्त आंतरिक आनंदाचा शोध घेत राहावे या मताशी तो असहमत होता, असं १९९३ साली वॉटरमनने प्रतिपादित केलं.

निसर्गाच्या माहितीवरून स्वतःच्या आनंदाचे तत्व-ज्ञान मांडता येते. मानव आणि पशू यांना एकच गोष्ट विभक्त करते. तर्कशुद्ध विचार! मानवाची एकमेव ओळख असावी. तर्कनिष्ठता. सुख एकमेव आनंदाचे कारण असू शकत नाही. तसे तर अन्य प्राणीही सुखाचा पाठलाग करीत असतात पण मानवाची श्रेणी त्याही वरची असते.

हवं असलेलं मिळालं तरीही आपण अतृप्तच असतो आणि आनंदाचा पिच्छा सुरु ठेवतो. दिल मांगे मोअर अशीच आपली अवस्था असते. कदाचित चांगले निर्णय घेता आले तर अपेक्षाभंग कमी होऊ शकतो. पण काय हवंय याच्यामागील प्रेरणांचा कसून शोध घेतला तर कदाचित सध्याच्या कोणत्या गरजा अजून पूर्णत्वाला गेलेल्या नाहीएत हे खचित सापडू शकते. एक उत्तर सापडू शकते कृतज्ञतेमध्ये. आपल्यापाशीच्या गाठोड्यात आधीच काय आहे याचे अवलोकन केलं तर आपल्याला इतरांच्या तुलनेत मुबलक मिळालंय याचा शोध लागतो. मग अपेक्षेशी असलेलं आपलं नातं बदलतं.

तत्वज्ञान मूलतः प्रश्न विचारण्यासाठी असते. त्यातून मानवी विचारांचे स्वरूप आणि त्यांच्याशी विश्वाचे स्वरूप जोडता येते कां हे बघण्यासाठी असते. थोडक्यात आनंदाच्या मागोव्याविषयी चर्चा करताना आनंदाचेच स्वरुप धुंडाळावे लागते आणि विश्वासाठी त्याचा अर्थ काय असतो हेही शोधावे लागते. आनंद ही संकल्पना अर्वाचीन जगात गृहीत धरली जाते. आपल्याकडे सगळ्या भौतिक गोष्टी असतील तर आपण आनंदी असायला काय हरकत आहे? शेवटी जीवनाचे ध्येय केवळ जगणं नसतं तर चांगल्या तऱ्हेने जगणं असं असतं. माणसं खरंच आनंदी असू शकतात कां? असतील तर त्यांना आनंदी राहायला आवडते कां? जर मानवाला आनंदी राहण्याची इच्छाही असली आणि तो आनंदी असला तर त्याचा असा अर्थ काढायचा कां की म्हणून त्यांनी स्वतःसाठी आणि इतरांसाठी आनंदाचा पाठलाग करीत राहावे. हे सत्य असेल तर त्यांनी त्यासाठी काय करायला हवे?

### आनंदाचा इतिहास-

सुरुवात करू या, डेमॉक्रिटस या प्राचीन ग्रीस तत्वज्ञापासून ज्याने आनंदाच्या स्वरूपाचा वेध घेण्याचा पहिला प्रयत्न केला. त्याने सुचविले- आनंदी असण्यासाठी नशीब चांगलं, बलवत्तर असण्याची गरज नसते. किंवा ते बाह्य घटकांवरही अवलंबून नसते. ती मनाची अवस्था असते.

पुढे सॉक्रेटिस आणि त्याचा विद्यार्थी प्लुटोने या विषयाकडे अधिक वस्तुनिष्ठपणे बघण्याचा मार्ग शोधला. त्यांनी सुचविले- सत्य आणि शिवाचे मिलन झाले तर एक निश्चिन्त मार्ग असतो, तो म्हणजे आनंद. प्लुटोने अशी संकल्पना मांडली की जेव्हा व्यक्ती आनंदाचा मागोवा घेत असते आणि त्यासाठी बुद्धिमान मार्ग अवलंबित असते तेव्हा ते जीवन सुंदर असते, पण नंतर अरिस्टोटल या संकल्पनेशी असहमती दाखविली.

सुख हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असं मानण्याकडे मानवजातीचा कल असतो असं विवेचन केसेबीर आणि डीएनेर यांनी २००८ साली केलं. त्याआधी वॉटरमॅन यांनी १९९३ साली असं प्रतिपादन केलं की आनंदाचा पिच्छा हा एकमेव हेतू असतो जगण्याचा. हा काहीसा मतलबी आणि नकारार्थी दृष्टिकोन होता. शारीरिक, बौद्धिक, सामाजिक गरजा भागल्या की आनंद मिळतो आणि जीवन सार्थकी लागते. स्वतःसाठी महत्वाच्या असलेल्या गोष्टी मिळणे ही समजूत हाच सुखवादाचा पाया असतो.

प्राचीन काळच्या समजुतीनुसार नीतिमत्तेशिवाय चांगले जगणे संभवतच नाही. आपल्या नीतिमूल्यांशी तडजोड न करता जगणे आणि आनंद यांचा अंतर्गत संबंध असतो. मध्ययुगात ख्रिश्चन तत्वज्ञ म्हणू लागले की नीतिमूल्ये, आस्था चांगल्या जीवनासाठी मूलभूत असतातच पण तेच आनंदाचे एकमेव कारण असू शकत नाही. त्यांचे म्हणणे होते की आनंद देवाच्या हाती असतो आणि शाश्वत आनंद हा फक्त स्वर्गातच संभवतो.

ज्ञानोदयाच्या चळवळीने आनंदाचे वर्णन अधिक संयतपणे केले. पाश्चात्य जगाच्या नजरेतून आनंद हा सुखाचा मार्ग असतो हे त्यांनी उद्धृत केले.

वेदनेवर मात करायचा रस्ता म्हणजे आनंद असतो. नीतिमत्ता व कायदेकानून यांच्या आधारे अधिकाधिक लोकांचे भले होत असेल तर तो आनंदाचा अर्थ असतो हा त्यांचा विश्वास आहे.

अभिप्रेत असलेल्या जीवनहेतूंपासून आपल्याला आनंद मिळेल अशी भ्रामक समजूत असलेल्या मंडळींची ते हेतू साध्य झाल्यावर वाटली होती तितकी कृतार्थता त्यांना अनुभवाला येत नाही म्हणून निराशा होते. या प्रक्रियेला गैरलागू, दिशाभूल करणाऱ्या इच्छा असं म्हणतात. चुकीच्या अपेक्षांमधून निराशा जन्मते आणि हे चक्र थांबत नाही.

### आनंद म्हणजे नेमके काय?

आनंदाची व्याख्या करणे अवघड आहे. आधुनिक मानसशास्त्र म्हणते- स्वतःच्या आयुष्याचे मूल्यांकन करताना समाधानाचे आकलन आणि मानवी स्वभावाच्या मूड्सचे आणि भावनांचे भावनिक परीक्षण म्हणजे आनंद असतो.

### यातील घटक-

१) आयुष्याविषयी सर्वंकष समाधान

२) काम, नाती, प्रकृती अशा घटकांविषयी समाधान

३) सकारात्मकतेचे अधिष्ठान

४) नकारार्थी विचारांचा पगडा नसणे

माणसे आनंदी असू शकतात कां?

आदर्श आणि प्रत्यक्षातील आनंदात फरक करता येणे हे संशोधकाचे प्राथमिक कर्तव्य असते. आदर्श आनंद म्हणजे पूर्णत्व, परिपूर्ण टिकाऊ अवस्था. बहुधा कोणाच्याही आवाक्यात नसणारा असतो तरीही साधारणतः माणसांना सकारात्मक भावनांची अनुभूती येते आणि म्हणून आनंदी मानलं जातं. खरंतर बरीच माणसं आनंदी असतात.

अमेरिकेतील प्यू संशोधन संस्थेने २००६ साली एक अभ्यास उपक्रम हाती घेतला आणि त्यांना आढळून आले की अदमासे ८४ टक्के माणसे खुश असतात.

आनंदाचे अनुकूल वातावरण तयार करीत असताना आत्मविश्वास, नव्या ध्येयांच्या दिशेने वाटचाल हे विचार महत्वाचे ठरतात. या अर्थाने माणसे आनंदी असतात. आनंद स्वतःमधील चांगुलपणाला वाव देत असतो आणि माणसातील अत्युत्तमाला वाट करून देत असतो. अशी माणसे समाजात अधिक मिसळतात, इतरांना सहकार्य करतात आणि नैतिकतेने वागत असतात.

इतरांचे मूल्यांकन करताना सकारात्मक दृष्टिकोन बाळगत असतात. चर्चेत मनापासून सहभागी होतात तर स्वतःबद्दलची माहिती दडवून ठेवीत नाही ही निरीक्षणे केसेबीर आणि डीएनेर यांनी २००८ च्या आपल्या संशोधनात नोंदविली आहेत.

### एक सोप्पा प्रयोग आनंदाच्या मागे जाणाऱ्यांसाठी करता येतो-

बरीच माणसे इम्पॅक्ट बायस (आपल्या भावनिक प्रतिक्रियांची तीव्रता आणि कालावधी जास्त मानण्याचा पूर्वग्रह). गिल्बर्ट आणि विल्सन यांनी २००२ साली ही संकल्पना मांडली. थोडक्यात काही माणसांचा असा विश्वास असतो की भविष्यातील काही घटना उदा- कार विकत घेणे, नवं घर घेणे, विवाह ठरणे /होणे, एखाद्या परीक्षेत उत्तीर्ण होणे इत्यादी आपल्याला आनंदी करतात.

अर्थात आनंदाची अपेक्षित पातळी गाठणे हे त्या भावनेच्या कालावधीवर आणि तीव्रतेवर अवलंबून असते. याचे कारण म्हणजे नव्या परिस्थितीशी पटकन जुळवून घेण्याची आपली प्रवृत्ती. यामुळे मोठ्या सकारात्मक किंवा नकारात्मक घटनां किंवा जीवन बदलांमुळेही लोक लवकरच आनंदाच्या एका स्थिर स्तरावर परत येतात.

असं म्हणतात की कुंपणापलीकडील शेत अधिक हिरवं असतं. आनंद हा जीवनमार्ग मानण्यापेक्षा आहे हा क्षण उसासून जगणे अधिक महत्वाचे असते. आनंदाचा मागोवा जरूर घ्यावा पण जीवनातील आधीच घडून गेलेल्या आनंदी घटनांची आठवण चेहेऱ्यावर हसू आणते हेही ध्यानी असू द्यावे.

उदा- अधिक पैसे असते तर अधिक सुखी झालो असतो अशी समजूत प्रायः असते. पण या प्रयोगात एक संधी घ्यायचीय-

ज्या गोष्टींनी भूतकाळात प्रत्यक्षात आनंदी केलं त्यांची तुलना आपल्या मते भविष्यातील कोणत्या घटना आपल्याला आनंदी करतील यांच्याशी करायची आहे.

(१) एखादी घटना, प्रसंग आपल्याला आनंदी करू शकतील यांचे चित्र नजरेसमोर आणावे. नवीन खरेदी, सहल, नोकरीत पदोन्नती इ त्या एखाद्या कागदावर लिहून काढाव्या. त्यांचे फायदेही - पैशांची बचत, नवी नाती इ लिहून काढावेत.

(२) यानंतर असे काही प्रसंग आठवून बघा- महाविद्यालयातील पदवी प्राप्तीचा दिवस, कुटुंबात नव्या पाहुण्याचे आगमन, जिवलग मित्राची अनपेक्षित भेट इ त्यावेळी मनात काय भावना आल्या होत्या आणि मनातील आनंद नेमका कशामुळे आणि किती होता याचीही कागदावर नोंद करावी.

(३) यावरून आनंदाच्या खऱ्या स्तोत्रांविषयी निष्कर्ष काढता येतात.

एक विशिष्ट प्रकारचे जीवन जगायचे असे मानवाचे प्रमुख ईप्सित असते. यामागे एक वस्तुनिष्ठ तत्व असते. आनंद हा आत्म्याचा आविष्कार असतो कारण तो आपल्या सद्गुणांचा परिपाक असतो. या सिद्धांताचा एक महत्वाचा घटक असतो- सद्गुण. थोडक्यात आनंदाचा पिच्छा पुरविताना चांगले आणि नैतिक चारित्र्य आवश्यक असते. मैत्र हा तसाच एक शोध मानला जातो आनंदी करण्याचा. कारण त्यांत संतोष असतो, तृप्ती असते. अरिस्टोटल मानतो की आयुष्यभरातील आनंद म्हणजे तात्कालिक आनंदाच्या असंख्य प्रसंगांची उतरंड असते.

मानवाचे परिपूर्ण आविष्करण असते. अरिस्टोटल मानतो की शिक्षणातून चारित्र्य निर्माण होते जे परिपूर्णत्वाचा आभास देते आणि त्यातून जीवनाचा मार्ग आणि जीवनाचा अर्थ सापडतो. मग हे अमूल्य असते. ही व्यक्तीची अभिव्यक्ती असते. त्यामध्ये समर्पण आणि झोकून देणं अपेक्षित असते. त्यातून कृतार्थतेचा अनुभव येतो आणि उद्देशांशी जुळवून घेतले गेलेले जगणे असते. सक्षम होणे, आव्हानांना झेलणे अशा जाणिवांनी समृद्ध व्हायला होते.

### सापळ्यातून सुटका-

आनंद कसा दिसतो- स्वप्नपूर्ती सारखा, स्वतःचे अपत्य होण्यासारखा? तो अशा बाह्य घटकांशी नक्कीच जोडला गेलेला असतो. प्रत्यक्षात पफ च्या मते तो आंतरिक असतो. त्याची काही वैशिष्ट्ये- स्वीकार हे पहिले पाऊल. सत्याचा स्वीकार- जसे आहे तसा, आणि त्यावरील उत्कट, विनाअट प्रेम. हा स्वीकार कृतकृत्यता आणतो. बदल अपरिहार्य असतो हेही त्याबरोबर ओघानेच आले. खरी आनंदी व्यक्ती जुळवून घेण्यात कमीपणा मानत नाही.जीवनाचे क्षणभंगुरत्व समजून घेण्यात असते. कारण शेवटी बरे-वाईट, भलेबुरे सारेच क्षणभंगुर असते. त्यामुळे हेही दिवस जातील यावर विश्वास ठेवायला शिकावे लागते.

### तेव्हा आनंदी क्षण निर्माण करण्याचे तंत्र अंगिकारले पाहिजे-

(१) छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधणे

(२) दिवसाची सुरुवात स्मितहास्याने करणे

(३) स्नेहबंध जपणे, विकसित करणे

(४) स्वतःला सुखावणाऱ्या गोष्टींमध्ये गुंतून जाणे

(५) आशीर्वादांचा हिशेब ठेवणे आणि त्याबद्दल कृतज्ञ असणे

(६) सकारात्मकता निवडणे आणि हरघडी प्रसन्न राहणे

(७) आयुष्य समृद्ध करण्यासाठी पावले टाकणे

(८) हेतू निर्माण करणे आणि त्यांच्या साध्यासाठी कृती आराखडा तयार करणे

(९) मनानुभूती (या क्षणात जगणं शिकणे)

(१०) स्वतःशी चांगले वागणे

(११) आवश्यक असेल तेव्हा निःसंकोच मदत मागणे

(१२) सोडून द्या प्रवृत्तीचा अंगिकार

(१३) निसर्गाचा घटक बनणे

(१४) हसा आणि आनंदी राहा.

(१५) लाटेबरोबर पोहणे

# संसाराचा घाट। सोपा झाला ।।

(भाग-४९)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८



मायबापहो, त्याप्रमाणे या देहरूपी पाषाणात आत्मारामरूपी आत्मरूप परमेश्वर लपलेला आहे. पण त्यावर विकार, अहंकाररूपी पुटं इतकी चढलेली आहेत की, आमचं मन व बुद्धी त्या आत्मारामाचं मुळ आत्मरूपच विसरून गेलेत. त्यामुळे संसारातील मृगजळी सुखाच्या मागे फुकाची वणवण सरू आहे आपल्या साऱ्यांचीच. त्यामुळे हा बध्द जीव जन्म-मरणाच्या चक्रात युगानुयुगे अडकून पडला आहे. त्यातून सुटका होण्यासाठी नरदेह हाच एकमेव मार्ग आहे. पण त्यातून सुटका कशी करून घ्यावी याचं ज्ञान आम्हाला नाही. म्हणून आम्ही अज्ञानाच्या अंधारात चाचपडत आहोत.

ज्याक्षणी आमच्या देहरूपी पाषाणाला संतरूपी किंवा सद्गुरूरूपी शिल्पकाराचा परिस स्पर्श होईल त्याक्षणी सारे निरर्थक असे विकार आणि अहंकार गळून पडतील आणि भव्य दिव्य अशा आत्मरूपाचं म्हणजेच आत्मारामाचं दर्शन होईल. आणि नामदेव महाराजांनी म्हटल्याप्रमाणे...

**नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।। त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीतील नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।** या ओवीची अनुभूती यायला लागेल आणि आपला क्षरा कडून अक्षरा कडे, मूर्ता कडून अमूर्ताकडे, देहा कडून आत्म्याकडे, संसारा कडून परमार्थाकडे अध्यात्मिक प्रवासाला सुरुवात होते.

**वाचाळता गेली । मौनता लाभली ।।**
**साधना गावली । स्थितप्रज्ञा ।।२।।**

जेव्हा संत कृपा होते किंवा गुरू कृपा होते तेव्हा संसारातून मन हळुहळू मुक्त व्हायला लगतं, कारण त्यला आता खरं सुख कशात आहे हे चांगलच ज्ञात झालेलं आहे. त्यामुळे दुःखाचं मुळ असणाऱ्या आणि अशाश्वत अशा सुखाच्या भ्रमक संसाराचा कंटाळा येतो. आता त्याचा प्रवास शाश्वत सुखाचा शोध घेत अध्यात्माच्या दिशेने चालू होतो. संत संगती त्याला हवी हवीशी वाटते. पैसा हा नाशवंत संसारासाठी लागतो तर नामस्मरण हे अविनाशी परमार्थासाठी लगतं हे त्याला चांगलच समजलं असलं तरी संताच्या शिकवणी नुसार संसार करून परमार्थ साधावा म्हणजेच नाशवंताकडून (देहा कडून) अविनाशाकडे (आत्म्याकडे) प्रवास करणे होय. यालाच 'आत्मरूप दर्शन' म्हणावे आणि हेच मानवी जीवनाचे सार आहे. हे संत कृपेने त्याला समजते. या वाटेवर चालत असताना आपली वायफळ बडबड आपोआप कमी कमी होत जाते आणि मौनता आपल्या हृदयात स्थिरावू लागते. आपले मौनतेशी संधान साधल्यामुळे आपल्या अंगी स्थितप्रज्ञता केव्हा रूजायला लगते ते आपल्यालाही कळत नाही कारण आता आपलं बोट सद्गुरूंनी किंवा संतांनी धरलेलं असतं त्यामुळे आपल्या मुळ स्वभावात असणारी वाचाळता निघून गेली आणि सद्गुरू किंवा संत कृपेने तिची जागा मौनता घेते आणि साधनेसाठी मौनतेच्या पुढची आवश्यक पायरी म्हणजे स्थितप्रज्ञता अंगी स्थिरावते.

तेव्हा कुठे आत्मरूप दर्शनासाठी आवश्यक असणारी साधना गवसते. आणि पुढे आपसूकच....

**आत्म मग्न झाले । स्वरूप जाणले ।।**
**अद्वैती निमाले । द्वैत सारे ।।३।।**

आता मन बुद्धीसह आत्ममग्न होऊ लागते. पाय चालतात ती फक्त पंढरीची वाट ,वाणी बोलते ते फक्त राम कृष्ण हरि आणि मनाला ध्यास लागतो तो फक्त परब्रह्म परमात्मा पांडुरंगाच्या भेटीचा. वारीत तो आपल्याच नादात पावली,रिंगण खेळतो. मुखाने हरिनाम करत करत आत्ममग्न होऊन जातो त्याला आता ठायी ठायी परब्रह्म परमात्मा पांडुरंगच दिसु लागतो. त्या परमात्म्याचं रूप काळजात साठवायला जावं तर तोच तर आत्माराम आहे हे समजतं. 'तो' आणि 'मी' यातील अंतर गळून पडतं. 'तू' ते 'मी' आणि 'मी' ते 'तू' होऊन जातं. देव पहावयासी गेलो देव होऊनिया ठेलो किंवा पाया पडु गेले तव पाऊलचि न दिसे ही अवस्था माऊली अन् तुकोबा आपल्याला समजावून सांगतात. तेव्हा याची अनुभूती येते. पंढरीत विटेवर उभ्या असलेल्या अद्वैतात सारे द्वैत एकरूप होऊन जातात. कर्म , ज्ञान आणि भक्ती तोच होऊन जातो. उरतो तो केवळ आपला श्वास तोही राम कृष्ण हरि साठीच.

**तुळस मंजिरी । फुलली अंतरी ।।**
**गंध भिमा तिरी । गंधाळला ।।४।।**

तू सहजासहजी कूणालाही फुकट भेटत नहीस हे मला चांगलंच ठाऊक आहे विठ्ठला, आणि मला हेही माहीत आहे की, तू काही तरी घेतल्याशिवाय काहीच देत नाहीस. जन्मभरीच्या श्वासा इतुके मोजियले हरिनाम । बाई मी विकत घेतला श्याम ।। हाच भक्तिभावाचा व्यवहार तुला प्रिय आहे. म्हणूनच उरलेले माझे सारे श्वास तुझ्याच नावाने केले आहेत मी. त्यामुळे एक झाले विठ्ठला की माझ्या अंतःकरणाच्या वृंदावनात तुळस बहरून आलेली आहे. नुसती तुळसच बहरली नाही तर ती असंख्य मंजीरीने फुलली आहे. तीचा आनंद गगनात मावेनासा झालाय. तिच्या गंधाने मला वेड लावलय. पण तो कुठं हरवलाय कुणास ठाऊक? अंतःकरणात तुळस, मंजिरी फुललीय तर खरी पण तीचा गंध मात्र कुठं रेंगाळलाय कुणास ठाऊक? म्हणून टाळांच्या गजरात मन या तुळस मंजिरीच्या गंधाचा मागोवा घेत निघालं आणि एका ठिकाणी समाधिस्थ झाल्यागत स्थिरावलं तर तो भिमेचा घाट निघावा? तर या भिमा तीरावर माझ्या तुळस मंजिरीचा गंध गंधाळत असलेला जाणवलं. त्याच्या मागे मागे गुमान चालत गेलो तर सरळ गाभाऱ्यातच? समोर ते अनुपम्य असं साजिरं गोजिरं तुळस मंजिरीची माळा गळ्यात परिधान केलेलं ते काळं सावळं रूप पाहिलं आणि अनिमिष लोचनांनी नुसता पाहतच राहिलो. हृदयात ते रूप साठवत राहिलो तेव्हा आपसूकच डोळ्यातू इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. नामदेवांचे शब्द घंटारवाप्रमाणे धीर गंभीरपणे परावाणी होऊन गाभाऱ्यात घुमु लागले,

**जन्मोजन्मी आम्ही बहुपुण्य केले ।**
**तेव्हा या विठ्ठले कृपा केली ।।**

वाटलं तुकोबाराया तुमचं म्हणनं अगदी खरं आहे की,

**याजसाठी केला होता अट्टाहास ।**
**शेवटचा दिवस गोड व्हावा ।।**

क्षणभर असं वाटलं हाच दिवस शेवटचा व्हावा आपला. पण माझ्या ज्ञानाईनं आठवण करून दिली की, आवर स्वतःला घरी मोगऱ्याच्या दोन कळ्या वाट पाहत आहेत तुझी. ते घर, तो दुःखाचं आगार असलेला संसार नकोसा वाटायला हवा होता आत्ता. असा विचार क्षणभर डोक्यात आला. पण दुसऱ्याच क्षणी...


**जीवा शिवा भेट । सापडली वाट ।।**
**संसाराचा घाट । सोपा झाला ।।५।।**

आता द्वैतातलं अंतर गळून पडलं होतं. जन्मोजन्मीच्या पूर्व पुण्याईने जीवा शिवाची भेट घडून आली. आणि काय आश्चर्य पहा सर्व दुःखाचं मुळ असणारा नकोसा झालेला संसार आता हवाहवासा वाटु लागलाय. तसेच त्याचा अतिशय अवघड आणि क्लिष्ट वाटणारा घाटही आता सोपा वाटु लागलाय. एवढंच नाही तर अतिशय सुंदर वाटु लागलाय. जीवा शिवाची भेट झाल्यानंतर संसाराची जी वाट सापडली ती साधीसुधी वाट नव्हतीच तर...

**असोनि संसारी जीव्हे वेगु करी ।**
**वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।**

अशी झाली आहे. आता ही सापडलेली वाट साधीसुधी नव्हतीच संसाराचाच स्वर्ग करणारी आहे. संसारातून थेट मोक्षा पर्यंत घेऊन जाणरी ही वाट आहे. आणखी काय हवय या पामर जीवाला? नम्रतेनं पुन्हा पुन्हा माथा लीन होतो तुझ्या चरणांवर. आणि हृदयाच्या गाभाऱ्यातून शब्द येतात. **राम कृष्ण हरि...**

(लेखकाने ज्या अभंग रचनेचे निरूपण केले आहे ती अभंग रचना लेखकाचीच आहे.)



## गीत

गुंतता हृदय हे। हरपले भान हे ।।धृ।।
सतार तारेतून। झरे मुक्त भावना।
सुरम्य कवन हे ।।१।।
ताला सुरांचे गीत। उमले अधरात।
आनंदने गायिले हे ।।२।।
एकतारीच्या सवे। मीरा तन्मय गायनी।
आळविते नाम हे ।।३।।
राधेच्या मनी वसे। बासुरी स्वर नादे।
परब्रह्म स्वरूपे ।।४।।
नील नभ दिगंती। अनिल वाहे वसंती।
धुंद भावगीत हे ।।५।।
सार्थकता मनाला। समर्पण सर्वदा।
जीवन पावक हे ।।६।।
हरपले भान हे। गुंतता हृदय हे।।

रेखा भिवगडे

## उषा हासरी

माघामधल्या सोनसकाळी पसरली चादर
दाट धुक्याची धुसरशा धुक्यात उगवली
प्रसन्न अशी उषा हासरी
ब्रह्ममुहूर्त केशरी रंगतो पक्षी
गाता मंजुळ गाणी अरुणाचा मोद विलसतो
प्राचीच्या कमल नयनी
चराचरात अमृत शिंपीत दवबिंदू
हे तृणांकुरात सुगंधित परिमळ मोहक
सर्वा मन करती हर्षित
प्रभात वेळी फुलाफुलातूनी गंध हासतो
पाकळी सारूनी वाहते निर्झरी प्रेम
संजीवनी घंटा किण किण येई कानी
प्रशांत वेळी रम्य सकाळी झुल गुलाबी
लेऊन आली बहरलेल्या फुलाफुलांतून
गंध बहरतो अवनीच्या गाली

साधना शेंडे



# रशिया-युक्रेन संघर्षाच्या बदलत्या छटा : पुतीन, ट्रम्प आणि जागतिक सत्ता समीकरण

**ट्रम्प, पुतीन आणि जागतिक सत्ता समीकरण डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेताच, रशिया-युक्रेन युद्धासंबंधी अमेरिकेच्या भूमिकेतही ३६० अंशांचा अपेक्षित बदल दिसून आला. संघर्षावर तोडगा काढण्यासाठी अमेरिकेच्या नेतृत्वात सौदीच्या रियाधमध्ये, तर युरोपीय देशांची फ्रान्सच्या पॅरिसमध्येही बैठक संपन्न झाली. तेव्हा, या दोन्ही बैठकींचे फलित, रशिया-युक्रेन युद्धावरुन पडलेले गट-तट आणि भारताची भूमिका याचा विश्लेषण करणारा हा लेख...**

परराष्ट्रकारण

**अनिकेत भावठाणकर**



एक हजार दिवसांहून अधिक काळ अविरतपणे सुरु असलेल्या रशिया-युक्रेन संघर्षाने जागतिक सत्ताकारण प्रभावित झाले. या संघर्षात युक्रेन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे अमेरिका व युरोपच्या मदतीवर अवलंबून आहे. त्यातच डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या जेमतेम महिन्याभरात युक्रेनसंदर्भात निर्णयांचा धडाकाच लावला. या आठवड्याच्या सुरुवातीला ट्रम्प यांचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माईक वॉल्ट्झ आणि ट्रम्प यांचे मध्य-पूर्वचे दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे रशियन परराष्ट्रमंत्री सर्गेई लॅव्हरोव्ह आणि पुतीन यांचे परराष्ट्र धोरण सल्लागार युरी उशाकोव्ह यांच्याशी चर्चा केली.

दुसरीकडे, युक्रेनच्या मुद्द्यावर बाजूला पडल्याने अस्वस्थ झालेल्या युरोपियन नेतृत्वाने पॅरिस येथे तातडीची बैठक घेतली. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि जर्मनीचे चान्सलर ओलाफ शॉल्झ यांच्या नेतृत्वातील ही बैठक कोणत्याही सहमतीविना पार पडली. रियाध येथील बैठक युक्रेनविषयी, मात्र युक्रेनविना पार पडल्याने त्यांचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्सकी यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या दौर्यात युक्रेन आणि रशिया लष्करी संघर्षात भारताची भूमिका तटस्थता अथवा सत्तासमतोलाची नाही, तर स्थैर्य आणि शांतीची आहे, असे अगदी स्पष्टपणे नमूद केले. या बैठकांनंतर, दुसर्या महायुद्धानंतर निर्मिलेली जागतिक व्यवस्था बदलत असल्याची चाहूल लागली आहे. नवी जागतिक व्यवस्था आकार घेत आहे. त्यात अमेरिका, रशिया, युरोप, युक्रेन तसेच, भारत व चीन यांच्या भूमिकांचा वेध घेणे आवश्यक ठरते.

युक्रेनमधील लष्करी संघर्षाचे एक कारण जॉर्ज बुश (ज्यू.) प्रशासनाने युक्रेनला अमेरिका आणि युरोप यांच्यातील 'नाटो' या राजकीय आणि लष्करी आघाडीचे सदस्यत्व देण्याच्या आश्वासनात आहे. 'नाटो'चा पूर्व युरोपात होणारा विस्तार आपल्या हितांच्या विरोधात असल्याची रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भावना आहे. रियाध बैठकीपूर्वीच युक्रेनला 'नाटो' सदस्यत्व देण्याविषयी ट्रम्प यांनी नकार दर्शवून त्या आश्वासनावर बोळा फिरवला. ज्यायोगे पुतीन यांच्या प्रमुख मागणीला बळच मिळाले. अर्थात, एक बैठक आणि टेलिफोन संभाषणानंतर हा संघर्ष संपेल, अशी आशा बाळगणे बाळबोधपणाचे आहे. रियाधमधील बैठकीचा मतितार्थ, अमेरिका आणि रशिया यांच्यातील उच्चस्तरीय संवादाच्या पुनर्स्थापनेत आहे. या महिन्याच्या शेवटी ट्रम्प यांनी पुतीन यांच्याशी भेटीची शक्यता ध्वनित केली आहे. त्यामुळे पाश्चात्य जगातील रशियाच्या विलगीकरणाची प्रक्रिया मोडकळीला आली. ट्रम्प यांनी लष्करी संघर्षासाठी युक्रेनच्या नेतृत्वाला जबाबदार ठरवले. रशियाने त्यांच्या ताब्यात असलेली युक्रेनची जवळपास १८ टक्के जमीन परत करण्याची मागणी धुडकावली आहे. ट्रम्प प्रशासनाने त्यासाठी अनुकूल भूमिका घेतली आहे. युक्रेनला संरक्षणाची हमी देण्यासाठीदेखील ट्रम्प उत्सुक नाहीत.

या प्रस्तावात रशियाने दुरुस्ती सुचवून संघर्षाच्या मूळ कारणांना संबोधित करीत, कायमस्वरूपी शांततेचा आग्रह धरला आहे. थोडक्यात, युरोपियन नेतृत्वाच्या विरुद्ध भूमिका घेतली आहे. अमेरिकेत रशियाविरोध हा दोन्ही राजकीय पक्षातील सामायिक धागा आहे. तोच धागा आता कमकुवत होताना दिसत आहे. थोडक्यात, चीनसोबत शीतयुद्ध होण्याची आशंका असताना, रशिया पूर्णपणे चीनच्या कह्यात जाणार नाही, याची काळजी ट्रम्प यांनी घेतली असे म्हणता येईल. याउलट, पुतीन यांची मनीषा १९९१ सालापूर्वीच्या सोव्हिएत महासंघाप्रमाणे वर्चस्वाची आहे. त्यासाठी ट्रम्प अप्रत्यक्षपणे मदतच करत असल्याचा समज युरोपात दृढ होत आहे. ट्रम्प यांच्या निवडीनंतर युरोपात चिंतेचा सूर आहेच. युरोपियन नेतृत्वाच्या अपेक्षेपेक्षा अधिक वेगाने रशिया-अमेरिका यांच्यात घडामोडी घडत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विकलांग झालेल्या युरोपने त्यांना अपेक्षित अशा लोकशाही मूल्यनिर्मितीवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला पुढे नेले. मुख्यत्वे, अमेरिकन आर्थिक योगदान आणि ट्रान्स-अटलांटिक मूल्यांच्या आधारे 'नाटो'ची निर्मिती करून युरोपने दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतःच्या संरक्षणाची पूर्तता केली. अमेरिकन उप-राष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हेन्स यांच्या म्युनिकमधील भाषणाने या ट्रान्स-अटलांटिक मूल्यांच्या अभेद्यतेला धक्का दिला. त्यांनी युरोपात लोकशाही स्वातंत्र्याचा र्हास होत असल्याचे खडे बोल सुनावले. सुरक्षा परिषद असूनही युक्रेनचा विषय केवळ एका वाक्यात संपवून युरोपियन नेत्यांच्या आणि विचारवंतांच्या दुःखावर मीठ चोळले. याच परिषदेत भारताच्या परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी युरोपियन देशांच्या दुट्टपीपणावर बोट ठेवत, भारत हे लोकशाहीच्या प्रगतीचे प्रारूप असल्याचे ढासून सांगितले.

इतरांसाठी जागतिक मानदंड ठरवणाऱ्या युरोपियन नेतृत्वाला व्हेन्स यांची भाषा अनपेक्षित आणि मूल्याधारित सामर्थ्य हातातून निसटून चाललेल्या जाणिवेतून आल्याचे वाटते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळापासून युरोपियन देशांनी 'नाटो'साठी आर्थिक योगदान वाढवावे, हा तगादा धरला होता. बायडन प्रशासनानेदेखील तोच मार्ग शांततेत पुढे ठेवला होता. दुसऱ्या कार्यकाळात ट्रम्प अधिक आक्रमक झाले आहेत. रियाध येथील बैठकीत त्यांनी 'ट्रान्स-अटलांटिक भागीदारी पणाला लागली,' असे म्हणावे लागेल. काळाची पाऊले ओळखण्यात युरोपातील नेतृत्व बेसावध राहिले. युरोपातील सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था, जर्मनीत रविवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी निवडणूक आहे. जर्मनीतील इतिहास बघता, नवीन सरकार स्थापनेसाठी किमान एक ते दोन महिने लागतात. सध्याच्या वेगवान घडामोडी पाहता, युरोपकडे वेळच उपलब्ध नाही. अशावेळी राजकीय अस्थिरतेमुळे समस्या जटिल होत आहे. त्यामुळेच पॅरिस येथील बैठकीत अमेरिकाविना युक्रेनमध्ये सैन्य पाठवण्यावर कुठलाही निर्णय झाला नाही. रियाधमधील बैठकीनंतर ट्रम्प प्रशासनाने युरोपियन नेतृत्वाला वृत्तांत दिला आहे. युरोपसाठी त्यातल्या त्यात ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. सर्वांत अवघड परिस्थिती युक्रेनच्या झेलेन्स्की यांची झाली आहे. लष्करी संघर्षात त्यांनी बायडन प्रशासनावर विश्वास ठेवला. बायडन प्रशासनाने ज्या बाबी शांततेत केल्या असत्या, त्याच अमेरिकन राष्ट्रीय हितांच्या गोष्टी ट्रम्प आक्रमकपणे पार पाडत आहेत.

ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांना 'हुकूमशहा' संबोधून, युक्रेनमध्ये निवडणुका घेण्याची गरज व्यक्त केली. या गोष्टी पुतीन यांच्या पथ्यावर पडणार आहेत. युद्धसमाप्तीनंतर युक्रेनमधील नैसर्गिक साधनसंपत्तीचा लाभ अमेरिकन उद्योगधंद्यांना व्हावा, अशीच ट्रम्प यांची इच्छा. झेलेन्स्की यांना युद्धसमाप्तीसाठी अमेरिकेने समोर ठेवलेल्या अटी वसाहतवादाची आठवण करून देत आहेत. थोडक्यात, दुसर्या महायुद्धानंतर स्थापित आणि शीतयुद्धानंतर अजिंक्य समजली जाणारी उदारमतवादी व्यवस्थेची चौकट आता डळमळू लागली आहे. या सत्तासमीकरणात चीनची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. युक्रेन संघर्षाने रशियाचे चीनवरील अवलंबित्व वाढले आहे. ट्रान्स-अटलांटिक भागीदार या संघर्षात गुंतल्याने चीनला व्यापार, तंत्रज्ञान आणि कर्जाच्या माध्यमातून जगावर आपली पकड मजबूत करण्यासाठी मोकळे रान मिळाले होते. अमेरिका-रशिया चर्चेने, चीन सोबतच्या शीतयुद्धात पुतीन यांची भूमिका 'वाईल्ड कार्ड'सारखी झाली आहे. या सर्व गोंधळात चीनसोबत व्यापार करार करण्याची ट्रम्प यांची इच्छा, येत्या काळात जागतिक सत्तासमीकरणाला अनपेक्षित वळण देऊ शकते. या सर्वांमध्ये सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारताची भूमिका काय?

भारतासाठी ही परिस्थिती आव्हानासारखी आहे. मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे, रशिया-युक्रेन संघर्षात भारताची भूमिका हितसंबंधांच्या रक्षणासाठी लक्ष घालण्याची आणि इतरवेळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याची आहे. भारतीय विचारांप्रमाणे याला 'उपेक्षा उपाय' म्हणतात. नव्या बदलत्या सत्तासमीकरणात, भारतासाठी उपेक्षा उपायाचे दोन महत्त्वाचे तत्त्वे आहेत- संयम आणि दूरदृष्टी. पहिल्या टप्प्यात भारताने कोणत्याही संघर्षात उडी घेतली नाही, कोणत्याही एका गटाच्या बाजूने उभे राहण्यापेक्षा स्वतःचे राष्ट्रीय हित लक्षात ठेवत, स्वतंत्र परराष्ट्र धोरण चालू ठेवले. पण, दुसर्या टप्प्यात, जर जागतिक परिस्थिती पूर्णतः बदलली, तर भारताला केवळ पर्यवेक्षक बनून न राहता योग्य वेळी पुढे जावे लागेल.

अमेरिकेने जर पुन्हा चीनसोबत सामोपचाराच्या भूमिकेला प्राधान्य दिले, तर भारतासाठी ते अवघड ठरू शकते. कारण, त्यामुळे भारताचा जागतिक सत्ता समीकरणांतील स्थान कमकुवत होऊ शकते. इतिहास पाहता, रशिया-युक्रेनमध्ये २०१४-२०२२ सालच्या दरम्यान जवळपास ३० वेळा शस्त्रसंधी झाली आणि त्याचे उल्लंघनदेखील झाले आहे. ट्रम्प यांच्या पुढाकाराने होऊ शकणार्या कराराने लष्करी संघर्ष २०२७-२८ सालापर्यंत थंड होईल. पण, त्यानंतर त्या संघर्षाला नवे रूप प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतासाठी संयम ठेवत, आपल्या हितसंबंधांनुसारच जागतिक रणनीती आखावी लागेल. (लेखक आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक आहेत.)



# विकासाबरोबरच शून्य उत्सर्जनावरही भर

**भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या आणि २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्याच्या दुहेरी संकल्पनेसह पुढे जात आहे. त्यासाठी हवामान बदलामुळे जाणवणाऱ्या उष्णतेच्या लाटा आणि पूर, पुरवठा साखळीतील व्यत्यय आदी घटनांमधून टिकाऊपणाच्या उद्दिष्टांना सामोरे जावे लागेल. अशा परिस्थितीत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी काही उपाय ठेवणे आवश्यक आहे.**

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

गेल्या वर्षी मान्सूनमध्ये आसाम ते बिहार आणि गुजरात ते आंध्र प्रदेशपर्यंत अनेक ठिकाणी देशाने विनाशकारी पूर पाहिला. याआधी उत्तर भारतातील बहुतांश भागात कडक उन्हाचा सामना करावा लागत होता. २०२५ हे वर्षही तसेच राहण्याची शक्यता आहे. ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदे (सीईईडब्ल्यू) च्या अभ्यासानुसार ७५ टक्के भारतीय जिल्हे पूर, दुष्काळ आणि चक्रीवादळासारख्या तीव्र हवामानाच्या परिणामांचे केंद्र आहेत. तीव्र हवामानातील घटनांची वारंवारता वाढत जाते, तसतसे असुरक्षिततेचे सूक्ष्म मूल्यांकन करून स्थानिक स्तरावरील अनुकूलन योजना विकसित करण्याची तातडीची गरज आहे. देशाच्या काही भागात यावर काम सुरू झाले आहे.

भारताची स्वच्छ ऊर्जेची कहाणी कौतुकास्पद आहे. अजीवाश्म ऊर्जेची स्थापित क्षमता नोव्हेंबर २०२४ पर्यंत २०५.५ गीगावॉटवर पोहोचली आहे, जी एकूण स्थापित क्षमतेच्या सुमारे ४५ टक्के आहे. तथापि, एकूण ऊर्जा मिश्रणामध्ये मोठ्या प्रकल्पांवर आधारित अक्षय ऊर्जा क्षमता अधिक प्रमाणात जोडण्यासाठी नावीन्यपूर्ण अंदाज आणि ऊर्जा साठवण, लवचीकता आणि बाजार यंत्रणा आवश्यक असेल. ग्रामीण भागात सौर ड्रायर (मूल्यवर्धनासाठी फळे आणि भाजीपाला सुकविण्यासाठी) आणि सौर यंत्रमाग यांसारख्या विकेंद्रित नवीकरणीय ऊर्जेसाठी मोठ्या संधी आहेत.

'सीईईडब्ल्यू डेटा'नुसार, ग्रामीण भारतातील आजीविका सक्षम करणाऱ्या स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानासाठी ५० अब्ज डॉलरहून अधिक बाजारपेठेची संधी आहे. आज देश ऊर्जा सुरक्षा निर्माण करण्यासाठी आणि संक्रमणाला गती देण्यासाठी कमी-कार्बन तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या पुरवठा साखळींच्या स्वदेशीकरण आणि विविधीकरणावर लक्ष केंद्रित करत आहे. २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जन लक्ष्य गाठण्यासाठी भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. व्यवसाय सुलभता, कौशल्य विकास आणि निर्यात लवचीकता यासाठी सरकारने 'डिजिटल एमएसएमई डेटाबेस' तयार केला पाहिजे. शिवाय, भारताच्या 'इनोव्हेशन इकोसिस्टिम'लाही मोठ्या प्रमाणावर चालना देण्याची गरज आहे.

उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने (पोलाद, सिमेंट, खते किंवा ॲल्युमिनियमसारखे जड उद्योग) घट्ट मानल्या जाणाऱ्या क्षेत्रांना 'डीकार्बोनाईज' करण्यासाठी संशोधन आणि विकासावरील खर्चात लक्षणीय वाढ केली पाहिजे. यामध्ये ग्रीन हायड्रोजन आणि कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज यासारख्या नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. याची अंमलबजावणी करण्यासाठी अतिरिक्त, कमी जोखीम, कमी खर्च आणि दीर्घकालीन वित्तपुरवठा याद्वारे आर्थिक संसाधनांच्या कम तरतेवर मात करणे आवश्यक आहे. 'सीईईडब्ल्यू'च्या 'सेंटर फॉर एनर्जी फायनान्स'च्या २०२१ च्या अंदाजानुसार, भारताला २०७० पर्यंत निव्वळ-शून्य लक्ष्य साध्य करण्यासाठी १०.१ ट्रिलियन डॉलर (२०२० च्या किमतीनुसार) ची आवश्यकता असेल. या प्रमाणात वित्तपुरवठा करण्यासाठी विविध उदयोन्मुख वित्तपुरवठा साधने आणि यंत्रणांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

ग्रीन बाँड, वित्तपुरवठा, निसर्गसंवर्धन कार्यासाठी कर्जाची अदलाबदल आणि इकोसिस्टिम सेवांसाठी देयके आदींचा त्यात समावेश होतो. एकंदरीत विकसित भारत म्हणजे सर्व भागधारकांनी एकत्रितपणे विकासाभिमुख, हरित आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करणे. यामध्ये स्थानिक समुदाय आणि स्थानिक सरकार तसेच स्थानिक कृतीसाठी राज्यस्तरीय नियोजन, ऊर्जा सुरक्षेसाठी केंद्रीय धोरण, कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी खासगी क्षेत्राची भूमिका आणि शाश्वत गुंतवणुकीला गती देण्यासाठी तसेच जोखीम कमी करण्यासाठी धोरणात्मक मदतीचा समावेश आहे.

चांगल्या भविष्याची कल्पना करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यास आकार देणे. भारत ही एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था आहे. येथे विकास आणि गरिबी निर्मूलनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हरितगृह वायू उत्सर्जन वाढण्याची शक्यता आहे. २०१९ पर्यंत भारताचे ऐतिहासिक संचयी उत्सर्जन हे पूर्व-औद्योगिक कालखंडातील जगातील एकत्रित कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जनाच्या चार टक्क्यांपेक्षा कमी आहे. जगातील १७ टक्के लोकसंख्या येथे राहत असूनही उत्सर्जन कमी ठेवण्यात आपल्याला यश आले.

आजही आपले वार्षिक दरडोई उत्सर्जन जागतिक सरासरीच्या केवळ एक तृतीयांश इतके आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या फ्रेमवर्क 'कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज' (सीओपी) मध्ये भारताने २०७० पर्यंत शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठण्याचे जाहीर केले. पॅरिस कराराच्या कलम ४ मधील परिच्छेद १९ ओळखून भारताचे दीर्घकालीन कमी-कार्बन विकास धोरण संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदलाच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शनला सादर केले आहे आणि ते २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन पातळी गाठण्याच्या उद्दिष्टाची पुष्टी करते. देशाच्या यासंदर्भातील धोरणामध्ये ऊर्जा प्रणालींचा कमी-कार्बन विकास, एकात्मिक, कार्यक्षम आणि सर्वसमावेशक वाहतूक प्रणाली विकसित करणे, इमारतींमध्ये शहरी रचना, ऊर्जा आणि भौतिक कार्यक्षमता आणि शाश्वत शहरीकरणाला चालना देणे आणि सामाजिकआर्थिक आणि पर्यावरणीय विचारांच्या अनुषंगाने जंगल आणि वनस्पतींचे आच्छादन वाढवणे या उपाययोजनांचा समावेश आहे. यातील प्रत्येक संक्रमणाच्या संदर्भात भारताच्या 'लो-कार्बन ग्रोथ स्ट्रॅटेजी' दस्तावेजात संबंधित आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय संदर्भ, विद्यमान धोरणे आणि कार्यक्रम आधीच अंमलात आणले जात आहेत. हवामान बदलाच्या आव्हानाचा सामना करताना देशांच्या कामगिरीच्या आधारे अनेक निर्देशांक तयार करण्यात आले आहेत. तथापि, भारत आणि जगासाठी या निर्देशांकांची कार्यपद्धती, संकल्पनात्मक चौकट आणि परिणाम याबाबत अनेक मतभेद आहेत. देशातील वेगाने वाढणाऱ्या पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. २४ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील १३१ शहरांमध्ये हवेची गुणवत्ता सुधारण्यावर भर आहे. २०२५-२६ पर्यंत हवेची गुणवत्ता मानके साध्य करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. आतापर्यंत हवेच्या गुणवत्तेचे परीक्षण करण्यासाठी १,३६६ 'मॉनिटरिंग स्टेशन' स्थापित करण्यात आली आहेत.

'कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंट इन एनसीआर' आणि संलग्न क्षेत्रांनी (सीएक्यूएम) 'एनसीआर'मधील वायू प्रदूषण रोखण्यासाठी एक धोरण तयार केले आहे तसेच 'एनसीआर'साठी औद्योगिक आणि इतर अनुप्रयोगांसाठी मान्यताप्राप्त इंधनांची मानक यादी तयार केली आहे. देशाने १ एप्रिल २०२० पासून इंधन आणि वाहनांसाठी बीएस ४ ते बीएस ६ नियम लागू केले आहेत. परवडणाऱ्या वाहतुकीसाठी शाश्वत पर्याय हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस असून तो बाजारात उपलब्ध करून देण्यावर भर आहे. भारतात (हायब्रीड आणि) इलेक्ट्रिक वाहनांचा जलद अवलंब आणि उत्पादन करण्यासाठी ई-वाहनांवर सबसिडी दिली जात आहे. जलशक्ती मंत्रालय राष्ट्रीय नदी संवर्धन योजना राबवते. भारताने 'रामसर कन्व्हेन्शन'च्या चौकटीत पाणथळ जमिनींच्या यादीत १० पाणथळ जागा जोडल्या आणि ऑगस्ट २०२२ पर्यंत भारतातील रामसर साईट्सची एकूण संख्या ७५ वर पोहोचली. ती आशियामध्ये सर्वोच्च आहे.

सरकारने 'सिंगल यूज प्लॅस्टिक' नष्ट करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. १ जुलै २०२२ पासून ओळखल्या जाणाऱ्या एकेरी वापराच्या प्लॅस्टिकच्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय वन धोरण (एनएफपी), १९८८ च्या अनुषंगाने देशाच्या डोंगराळ आणि पर्वतीय प्रदेशातील एकूण भूभागाच्या किमान एक तृतीयांश क्षेत्रफळ वृक्षाच्छादित करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्य आणि केंद्र सरकारने मनरेगा आणि अन्य योजनांमधून वृक्षारोपणावर भर दिला आहे.

आंध्र प्रदेश, आसाम, हरयाणा, ओडिशा, राजस्थान, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांमध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी २५ दशलक्ष डॉलर खर्चातून आंतरराष्ट्रीय विकास एजन्सी (यूएसएड) द्वारे 'ट्री आऊट ऑफ फॉरेस्ट' कार्यक्रम भारतात सुरू करण्यात आला आहे. पर्यावरणीय सेवा, विशेषतः कार्बन जप्ती आणि ग्रामीण लोकसंख्येसाठी सर्वसमावेशक उपजीविका आणि आर्थिक संधी वाढविण्यासाठी जंगलांच्या बाहेर वृक्ष लागवडीचा विस्तार करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)